
# इतिहास व नागरिकशास्त्र

## इयत्ता आठवी














शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी-४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. २९.१२.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# इतिहास व नागरिकशास्त्र

## इयत्ता आठवी

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

8V2ZNL

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q.R.Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व प्रत्येक पाठामध्ये असलेल्या Q.R.Code द्वारे त्या पाठासंबंधित अध्ययन-अध्यापनासाठी उपयुक्त दृक्-श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०१८

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११ ००४.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्‌धृत करता येणार नाही.


**इतिहास विषय समिती**

डॉ. सदानंद मोरे, अध्यक्ष
श्री. मोहन शेटे, सदस्य
श्री. पांडुरंग बलकवडे, सदस्य
डॉ. शुभांगना अत्रे, सदस्य
डॉ. सोमनाथ रोडे, सदस्य
श्री. बापूसाहेब शिंदे, सदस्य
श्री. बाळकृष्ण चोपडे, सदस्य
श्री. प्रशांत सरुडकर, सदस्य
श्री. मोगल जाधव, सदस्य-सचिव

**नागरिकशास्त्र विषय समिती**

डॉ. श्रीकांत परांजपे, अध्यक्ष
प्रा. साधना कुलकर्णी, सदस्य
डॉ. प्रकाश पवार, सदस्य
प्रा. अजिंक्य गायकवाड, सदस्य
प्रा. संगिता आहेर, सदस्य
डॉ. मोहन काशीकर, सदस्य
श्री. वैजनाथ काळे, सदस्य
श्री. मोगल जाधव, सदस्य-सचिव

**इतिहास व नागरिकशास्त्र अभ्यास गट**

श्री. राहुल प्रभू
श्री. संजय वझरेकर
श्री. सुभाष राठोड
सौ. सुनीता दळवी
प्रा. शिवानी लिमये
श्री. भाऊसाहेब उमाटे
डॉ. नागनाथ येवले
श्री. सदानंद डोंगरे
श्री. रवींद्र पाटील
सौ. रूपाली गिरकर
डॉ. मिनाक्षी उपाध्याय
डॉ. रावसाहेब शेळके
डॉ. सतीश चापले
श्री. विशाल कुलकर्णी
प्रा. शेखर पाटील
श्री. रामदास ठाकर
डॉ. अजित आपटे
डॉ. मोहन खडसे
सौ. शिवकन्या कदेरकर
श्री. गौतम डांगे
डॉ. व्यंकटेश खरात
श्री. रविंद्र जिंदे
डॉ. प्रभाकर लोंढे
डॉ. मंजिरी भालेराव
प्रा. शशि निघोजकर

**लेखन गट**

श्री.राहुल प्रभू
श्री.भाऊसाहेब उमाटे
श्री. प्रशांत सरुडकर
प्रा.शिवानी लिमये
श्री. संजय वझरेकर
प्रा.साधना कुलकर्णी

**मुखपृष्ठ व सजावट**

श्री.दिलीप कदम

**नकाशाकार**

श्री. रविकिरण जाधव

**अक्षरजुळणी**

मुद्रा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

**कागद :** ७० जी.एस.एम. क्रिमवोव्ह

**मुद्रणादेश :** N/PB/2018-19/25,000

**मुद्रक :** ADARSHA VIDYARTHI PRAKASHAN, PUNE

**संयोजक**

श्री. मोगल जाधव
विशेषाधिकारी, इतिहास व नागरिकशास्त्र
सौ. वर्षा सरोदे
विषय सहायक, इतिहास व नागरिकशास्त्र
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**निर्मिती**

श्री. सच्चितानंद आफळे,
मुख्य निर्मिती अधिकारी
श्री. प्रभाकर परब,
निर्मिती अधिकारी
श्री. शशांक कणिकदळे,
सहायक निर्मिती अधिकारी

**प्रकाशक**

**श्री. विवेक उत्तम गोसावी,**
**नियंत्रक**
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई-२५.

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन-अधिनायक जय हे
भारत-भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत-भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

विद्यार्थी मित्रांनो,

इयत्ता तिसरी ते पाचवीपर्यंत इतिहास व नागरिकशास्त्र विषयाचे अध्ययन तुम्ही 'परिसर अभ्यास'मध्ये केले आहे. इयत्ता सहावीपासून अभ्यासक्रमात इतिहास व नागरिकशास्त्र हे स्वतंत्र विषय आहेत. इयत्ता सहावीपासून या दोन्ही विषयांचा समावेश एकाच पाठ्यपुस्तकात करण्यात आला आहे. इयत्ता आठवीचे पाठ्यपुस्तक तुमच्या हाती देताना आम्हांला आनंद वाटतो.

पाठ्यपुस्तकाची रचना, विषय नीट समजावा, मनोरंजक वाटावा आणि आपल्या पूर्वजांनी केलेल्या कार्यातून प्रेरणा मिळावी या हेतूने केलेली आहे. या पाठ्यपुस्तकाच्या अभ्यासाने ज्ञानाबरोबरच तुमचे अध्ययन अर्थपूर्ण होईल असे आम्हांला वाटते. त्यासाठी पाठ्यपुस्तकात रंगीत चित्रे, नकाशे दिलेले आहेत. पाठ्यपुस्तकातील प्रत्येक पाठ लक्षपूर्वक अभ्यासावा. त्यातील जो भाग तुम्हांला समजणार नाही तो भाग शिक्षक, पालक यांच्याकडून समजावून घ्यावा. दिलेल्या चौकटींतील मजकूर तुमची जिज्ञासा वाढवणारा आहे ! तुम्हांला अधिक जाणून घ्यायचे असेल तर 'ॲप'च्या माध्यमातून क्यू.आर.कोडद्वारे प्रत्येक पाठासंबंधी उपयुक्त दृक्‌-श्राव्य साहित्य आपणांस उपलब्ध होईल. त्याचा अध्ययनासाठी निश्चितच उपयोग होईल. इतिहास हा विषय रंजक करण्याचा प्रयत्न केला असून त्यामुळे तुम्हांला या विषयाची गोडी निश्चितपणे लागेल.

इतिहासाच्या भागात 'आधुनिक भारताचा इतिहास' दिलेला आहे. इतिहासातील नवे प्रवाह आणि शिक्षणाची राष्ट्रीय गाभातत्त्वे, अध्ययन निष्पत्ती यांचा मेळ घालून या पाठ्यपुस्तकाचे लेखन केलेले आहे. आधुनिक भारताच्या इतिहासात स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या तत्त्वांचा आविष्कार कसा होत गेला, हे पाठ्यपुस्तकाच्या अभ्यासातून स्पष्ट होऊ शकेल. पाठ्यपुस्तकात आधुनिक भारताच्या इतिहासाच्या साधनांचा परिचय आहे. तसेच भारतात इंग्रजी सत्तेचा विस्तार कसा होत गेला याचा आढावा घेतलेला आहे. इंग्रजी सत्तेच्या जोखडातून भारताला स्वतंत्र करण्यासाठी भारतीय जनतेने दिलेला अविस्मरणीय लढा, केलेला त्याग याची माहिती इतिहासाच्या भागात दिलेली आहे.

नागरिकशास्त्राच्या भागात संसदीय शासनपद्धतीची ओळख करून देण्यात आलेली आहे. आपल्या देशातील कारभार संविधान, कायदे व नियम यांच्यानुसार चालतो हे सांगितले आहे. पाठ्यपुस्तकात भारताची संसद, केंद्रीय कार्यकारी मंडळ, भारतातील न्यायव्यवस्था, राज्यशासनाचा कारभार, नोकरशाही संरचना व या सर्वांची समाजाच्या लोकशाहीकरणाच्या प्रक्रियेतील भूमिका स्पष्ट केली आहे.

**(डॉ.सुनिल मगर)**
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक : १८ एप्रिल २०१८, अक्षय्य तृतीया
भारतीय सौर दिनांक : २८ चैत्र १९४०

# शिक्षकांसाठी

इयत्ता सहावी आणि सातवीच्या अभ्यासक्रमात अनुक्रमे प्राचीन आणि मध्ययुगीन भारताचा इतिहास आपण अभ्यासला. इयत्ता आठवीच्या इतिहासात भारतातील वसाहतीकरण व निर्वसाहतीकरणाची प्रक्रिया तसेच स्वातंत्र्योत्तर कालखंडातील संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाचा समावेश आहे. स्वातंत्र्यलढ्यामागची वैचारिक प्रेरणा, भारतामध्ये राष्ट्रवादाचा उदय आणि विकास, स्वातंत्र्यसेनानींचे योगदान अभ्यासल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय जबाबदारीचे भान व राष्ट्राभिमान वृद्धिंगत होईल.

इतिहास हा शास्त्रशुद्ध अभ्यासविषय असून त्यात इतिहासाच्या साधनांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. कालखंडानुसार इतिहासाच्या साधनांचे बदलते स्वरूप विचारात घेऊन पहिल्या घटकात इतिहासाची साधने समाविष्ट करण्यात आली आहेत. युरोपातील प्रबोधनयुग व क्रांतियुगामुळे साम्राज्यवाद वाढीस लागून आशिया, आफ्रिका खंडात वसाहतीकरणाची प्रक्रिया वाढीस लागली. भारतही या पाश्चात्त्य साम्राज्यवादी महत्त्वाकांक्षेला कसा बळी पडला, ब्रिटिश राजवटीचे भारतावर कोणते परिणाम झाले, पुढील काळात भारतीयांची अस्मिता जागृत होऊन स्वातंत्र्याची प्रेरणा कशी मिळाली याचा आपण विचार करणार आहोत.

भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे अध्यापन करताना १८५७ चा स्वातंत्र्यलढा, राष्ट्रीय सभेची स्थापना, जहाल व मवाळ कालखंडातील राष्ट्रीय सभेचे कार्य, गांधीयुगातील सत्याग्रहाच्या मार्गाने झालेल्या चळवळी, सशस्त्र क्रांतिकारी चळवळ, आझाद हिंद सेनेचा लढा, भारताला स्वातंत्र्यप्राप्ती, संस्थानांचे विलिनीकरण, फ्रेंच व पोर्तुगीज वसाहतींची मुक्ती अशा घटनांची समग्र माहिती विद्यार्थ्यांना दृक्-श्राव्य साधने (चित्रपट, माहितीपट, अनुबोधपट, ध्वनीफिती इत्यादी) क्षेत्रभेटी, प्रदर्शने, संचयिका, वृत्तपत्रे या माध्यमातून पुरवता येईल.

राजकीय घडामोडींचा विचार करतानाच भारताच्या सामाजिक व आर्थिक क्षेत्रात कसे बदल होत गेले, सामाजिक व राजकीय समतेचा विचार भारतीयांमध्ये कसा रूजला, याचा परिचय विद्यार्थ्यांना करून देता येईल. भारतीय इतिहासाची पार्श्वभूमी अभ्यासताना महाराष्ट्र राज्य निर्मितीच्या घडामोडी व संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाचा विचार आपल्याला करायचा आहे.

इयत्ता सातवीच्या नागरिकशास्त्राच्या भागात आपण संविधानातून व्यक्त होणारे तत्त्वज्ञान, मूल्ये यांचा अभ्यास केलेला आहे. इयत्ता आठवीच्या नागरिकशास्त्राच्या भागात संविधानाने निर्माण केलेली शासनपद्धती, प्रशासकीय व्यवस्था, न्यायदान यंत्रणा आणि न्यायदान पद्धती याचा विचार केलेला आहे. प्रस्तुत आशय समकालीन घडामोडींच्या आधारे शिकवावा. त्याची सांगड संविधानातील तत्त्वज्ञानाशी आणि त्यातून प्रतिबिंबित होणाऱ्या मूल्ये आणि आदर्शांशी घालावी.

संविधान हा एक प्रवाही दस्तावेज असून त्याद्वारे लोकशाही व कायद्याचे अधिराज्य प्रत्यक्षात येते याची विद्यार्थ्यांना जाणीव करून द्यावी. यामुळे विद्यार्थ्यांच्या सामाजिक व आर्थिक जाणिवा अधिक प्रगल्भ होण्यास मदत होईल. लोकशाही संस्था आणि विविध राजकीय प्रक्रिया यांच्यातील संबंध शोधणे विद्यार्थ्यांना शक्य होईल. पाठ्यपुस्तकातील दिलेल्या आशयाच्या आधारे चर्चा, गटचर्चा, प्रकल्प, भित्तिपत्रके, एकाच विषयाच्या आधारे अनेक राजकीय पैलू समजून घेता येतील असे उपक्रम विद्यार्थ्यांकडून करून घेता येतील.

पाठ्यपुस्तकाची रचना करताना ज्ञानरचनावादी शिक्षण आणि कृतियुक्त अध्यापन यांना विशेष महत्त्व दिले आहे. यासाठी विद्यार्थ्यांसाठी पाठ्यघटकांविषयी अधिक व रंजक माहितीच्या चौकटी पाठात देण्यात आलेल्या आहेत. त्याचबरोबर चला चर्चा करूया, करून पहा यांतून विद्यार्थी अध्ययन प्रक्रियेत कसा सक्रिय राहिल याचा विचार केला आहे. विद्यार्थ्यांच्या कृतिशीलतेला, विचारशक्तीला आणि स्वमतप्रकटीकरणाला वाव मिळेल या दृष्टिकोनातून स्वाध्याय व उपक्रमांची मांडणी करण्यात आलेली आहे. पाठविषयाबाबत अतिरिक्त पूरक माहिती देण्यासाठी QR Code चा समावेश पाठ्यपुस्तकात करण्यात आला आहे, त्याचा वापर करून आपल्याला प्रभावी अध्यापन करणे सुलभ ठरेल.

# इतिहास

## (आधुनिक भारताचा इतिहास)

### अनुक्रमणिका


| क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | इतिहासाची साधने | १ |
| २. | युरोप आणि भारत | ५ |
| ३. | ब्रिटिश सत्तेचे परिणाम | १० |
| ४. | १८५७ चा स्वातंत्र्यलढा | १५ |
| ५. | सामाजिक व धार्मिक प्रबोधन | २१ |
| ६. | स्वातंत्र्य चळवळीच्या युगास प्रारंभ | २५ |
| ७. | असहकार चळवळ | ३१ |
| ८. | सविनय कायदेभंग चळवळ | ३६ |
| ९. | स्वातंत्र्यलढ्याचे अंतिम पर्व | ४० |
| १०. | सशस्त्र क्रांतिकारी चळवळ | ४५ |
| ११. | समतेचा लढा | ५० |
| १२. | स्वातंत्र्यप्राप्ती | ५६ |
| १३. | स्वातंत्र्यलढ्याची परिपूर्ती | ५९ |
| १४. | महाराष्ट्र राज्याची निर्मिती | ६२ |


**S.O.I. Note :** The following foot notes are applicable : (1) © Government of India, Copyright : 2018. (2) The responsibility for the correctness of internal details rests with the publisher. (3) The territorial waters of India extend into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line. (4) The administrative headquarters of Chandigarh, Haryana and Punjab are at Chandigarh. (5) The interstate boundaries amongst Arunachal Pradesh, Assam and Meghalaya shown on this map are as interpreted from the "North-Eastern Areas (Reorganisation) Act. 1971," but have yet to be verified. (6) The external boundaries and coastlines of India agree with the Record/Master Copy certified by Survey of India. (7) The state boundaries between Uttarakhand & Uttar Pradesh, Bihar & Jharkhand and Chattisgarh & Madhya Pradesh have not been verified by the Governments concerned. (8) The spellings of names in this map, have been taken from various sources.

# अध्ययन निष्पत्ती

| सुचवलेली शैक्षणिक प्रक्रिया | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|
| **अध्ययनार्थ्यास जोडीने / गटामध्ये / वैयक्तिकरीत्या अध्ययनाच्या संधी देणे व त्यास पुढील गोष्टींसाठी प्रवृत्त करणे.**<br>• ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीला भारतीय सत्ताधीशांच्या अंतर्गत वंशपरंपरागत झगड्यात का पडणे महत्वाचे वाटले यांसारख्या विविध गोष्टींवर व घटनांवर प्रश्न उभे राहणे.<br>• वसाहतवादी प्रशासनाची केंद्रे व भारतीय स्वतंत्रता संग्रामातील महत्त्वाची ठिकाणे, अशा ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाच्या ठिकाणांना भेट देणे.<br>• गांधीजींची अहिंसेची संकल्पना व तिचा भारताच्या स्वातंत्र्य/राष्ट्रीय चळवळीवरील परिणाम,<br>• भारतीय स्वातंत्र्यचळवळीतील महत्त्वाच्या घटना दर्शवणारी कालरेषा,<br>• चौरीचौरा घटनेवर आधारित भूमिका पालनाचे आयोजन,<br>• 'वसाहतवादी कालखंडात नगदी पिके घेतल्याने जास्त बाधित झालेली क्षेत्रे' भारताच्या नकाशात दाखवणे,यांसारखे प्रकल्प व कृती/उपक्रम आयोजित करणे.<br>• देशी व ब्रिटिश लेख, आत्मचरित्रे, चरित्रे, कादंबऱ्या, चित्रे, छायाचित्रे, समकालीन लिखाण, कागदपत्रे, वृत्तपत्रांतील लेख, चित्रपट, माहितीपट व आधुनिक लिखाण अशा साधनांची ओळख तत्कालीन विविध चळवळींचा इतिहास समजण्यासाठी व पुनर्रचना करण्यासाठी करणे.<br>• स्व-मूल्यमापनासाठी अध्यापन शास्त्रीयदृष्ट्या नावीन्यपूर्ण व निकषसंदर्भीय प्रश्नांची (उदा., 'प्लासीच्या लढाईमागील कारणे काय होती?') ओळख करून देणे. | **अध्ययनार्थी**<br>• इतिहासाची विविध साधने ओळखतात आणि त्यांचा या काळातील इतिहासाच्या पुनर्लेखनासाठी उपयोग स्पष्ट करतात.<br>• विविध स्रोत, विविध प्रदेशांसाठी उपयोगात आणली गेलेली नामावली आणि त्या त्या काळात घडलेल्या ऐतिहासिक घटना यांच्या आधारे 'आधुनिक कालखंड', 'मध्ययुगीन कालखंड' आणि 'प्राचीन कालखंड' यांमधील फरक स्पष्ट करू शकतात.<br>• ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी ही सर्वाधिक बलशाली सत्ता कशी बनली हे स्पष्ट करतात.<br>• विविध प्रदेशांतील ब्रिटिश कृषी धोरणांमधील फरक स्पष्ट करून सांगतात. उदा., निळीचा उठाव.<br>• एकोणविसाव्या शतकातील आदिवासी समाजाच्या रचना आणि त्यांचे पर्यावरणाशी असलेले नाते यांचे वर्णन करतात.<br>• आदिवासी समाजाच्या संदर्भातील ब्रिटिशांच्या प्रशासकीय धोरणांचे स्पष्टीकरण देतात.<br>• १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्याचा उगम, स्वरूप आणि विस्तार तसेच त्यापासून घेतलेला बोध यांचे स्पष्टीकरण देतात.<br>• ब्रिटिश सत्तेच्या काळात प्राचीन, नागरी व व्यापारी केंद्रे आणि हस्तव्यवसायावर आधारित उद्योग लयाला जाऊन नवीन नागरी व्यापारी केंद्रे आणि उद्योगधंदे विकसित कसे झाले या गोष्टीचे विश्लेषण करतात.<br>• भारतातील नवीन शिक्षणव्यवस्थेचे संस्थात्मीकरण कसे झाले हे स्पष्ट करतात.<br>• जातिव्यवस्था, स्त्रियांचे स्थान, विधवांचा पुनर्विवाह, बालविवाह, सामाजिक सुधारणा आणि या प्रश्नांच्या संदर्भातील ब्रिटिश धोरणे आणि कायदे यांचे विश्लेषण करतात.<br>• कलेच्या क्षेत्रात आधुनिक काळात घडून आलेल्या प्रमुख घडामोडींची रूपरेषा सांगू शकतात.<br>• सन १८७० ते स्वातंत्र्यप्राप्ती या काळातील वाटचालीचा आढावा घेतात.<br>• राष्ट्रउभारणीच्या प्रक्रियेतील ठळक घटकांचे विश्लेषण करतात. |

# १. इतिहासाची साधने

प्राचीन व मध्ययुगीन भारताच्या इतिहासाच्या साधनांचा अभ्यास आपण केलेला आहे. यावर्षी आपण आधुनिक भारताच्या इतिहासाच्या साधनांचा अभ्यास करणार आहोत. इतिहासाच्या साधनांमध्ये भौतिक, लिखित आणि मौखिक साधनांचा समावेश होतो. त्याचप्रमाणे आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित दृक्, श्राव्य आणि दृक्-श्राव्य अशा साधनांचाही समावेश होतो.

**भौतिक साधने :** इतिहासाच्या भौतिक साधनांमध्ये विविध वस्तू, वास्तू, नाणी, पुतळे आणि पदके इत्यादी साधनांचा समावेश करता येईल.

**इमारती व वास्तू :** आधुनिक भारताच्या इतिहासातील कालखंड हा युरोपीय विशेषतः ब्रिटिश सत्ताधीश आणि संस्थानिकांच्या राज्यकारभाराचा काळ मानला जातो. या काळात विविध इमारती, पूल, रस्ते, पाणपोया, कारंजे यांसारख्या वास्तू बांधल्या गेल्या. या इमारतींमध्ये प्रशासकीय कचेऱ्या, अधिकाऱ्यांची तसेच नेत्यांची व क्रांतिकारकांची निवासस्थाने, संस्थानिकांचे राजवाडे, किल्ले, तुरुंग यांसारख्या इमारतींचा समावेश होतो. या वास्तूंपैकी अनेक इमारती आज सुस्थितीत पाहावयास मिळतात. काही वास्तू या राष्ट्रीय स्मारके म्हणून घोषित केलेल्या आहेत, तर काही इमारतींमध्ये संग्रहालये उभारण्यात आली. उदा., अंदमान येथील सेल्युलर जेल.

या वास्तूंना भेटी दिल्यानंतर आपणांस तत्कालीन इतिहास, स्थापत्यशास्त्र, वास्तूच्या स्वरूपावरून त्या वेळची आर्थिक संपन्नता याविषयी माहिती मिळते. जसे अंदमान येथील सेल्युलर जेलला भेट दिल्यावर स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या क्रांतिकार्याविषयी, मुंबईतील मणिभवनला किंवा वर्धा येथील सेवाग्राम आश्रमास भेट दिल्यावर गांधीयुगाच्या इतिहासाविषयी माहिती मिळते.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

**वस्तुसंग्रहालये आणि इतिहास :** इतिहासाच्या अभ्यासासाठी वस्तुसंग्रहालयांमधून विविध वस्तू, चित्रे, छायाचित्रे यांसारख्या विविध गोष्टींचे जतन केलेले असते. पुण्यातील आगाखान पॅलेस येथील गांधी स्मारक संग्रहालयात आपणांस महात्मा गांधींच्या वापरातील अनेक वस्तू, कागदपत्रे पहावयास मिळतात.



आगाखान पॅलेस, पुणे


**पुतळे आणि स्मारके :** स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात अनेक व्यक्तींची स्मारके पुतळ्यांच्या रूपात उभारली गेली. हे पुतळेदेखील आधुनिक भारताच्या इतिहासाच्या अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. विविध पुतळ्यांवरून आपणांस त्या काळातील राज्यकर्ते, समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती यांच्याविषयी माहिती मिळते. पुतळ्याच्या दर्शनी पाटीवर संबंधित व्यक्तीचे पूर्ण नाव, जन्म-मृत्यूची नोंद, त्या व्यक्तीचे थोडक्यात कार्य, जीवनपट यांविषयीची माहिती मिळते. महात्मा जोतीराव फुले, लोकमान्य टिळक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांप्रमाणे विविध घटनांच्या स्मृतिप्रीत्यर्थ उभारलेली स्मारकेसुद्धा संबंधित घटना, घटना काळ, त्या घटनेशी निगडित

व्यक्ती इत्यादी माहिती देतात. उदा., विविध ठिकाणची हुतात्मा स्मारके.

**करून पहा.**

तुमच्या नजीकच्या परिसरात असणारी स्मारके आणि पुतळे यांविषयी माहिती मिळवा. त्यावरून तुम्हांला त्या घटनेची अथवा व्यक्तीविषयी कोणती माहिती मिळते याची नोंद करा.

**लिखित साधने :** आधुनिक भारताच्या इतिहासाच्या लिखित साधनांमध्ये खालील बाबींचा समावेश होतो.




**वृत्तपत्रे व नियतकालिके :** वृत्तपत्रांमधून आपणांस समकालीन घटनांविषयी माहिती मिळते. त्याचबरोबर एखाद्या घटनेचे सखोल विश्लेषण, मान्यवरांची मतमतांतरे, अग्रलेख प्रसिद्ध होत असतात. आपल्याला त्या काळातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक घडामोडींची माहिती मिळते. स्वातंत्र्यपूर्व काळात ज्ञानोदय, ज्ञानप्रकाश, केसरी, दीनबंधु, अमृतबझार पत्रिका यांसारखी वृत्तपत्रे लोकजागृतीची महत्त्वपूर्ण साधने होती. या वृत्तपत्रांद्वारे आपल्याला ब्रिटिश सरकारची भारताविषयीची धोरणे, त्यांचे भारतावरील परिणाम यांविषयीचा अभ्यास करता येतो. ब्रिटिश काळात वृत्तपत्रे केवळ राजकीयच नव्हे तर सामाजिक प्रबोधनाची साधने म्हणूनही काम करत होती. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी 'निबंधमाला' या मासिकातून, लोकहितवादी उर्फ गोपाळ हरी देशमुख यांनी 'प्रभाकर' या साप्ताहिकातून लिहिलेली शतपत्रे यांतून विविध सामाजिक व सांस्कृतिक विषयांवर भाष्य केले.

**चला जाणून घेऊया...**


**डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि वृत्तपत्रे :** डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी १९२० च्या जानेवारी महिन्यात 'मूकनायक' हे पाक्षिक सुरू केले. परंतु त्यांना पुढील विद्याभ्यासाकरिता इंग्लंडला जावे लागल्यामुळे त्यांनी हे पत्र आपल्या सहकाऱ्याकडे सोपवले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी एप्रिल १९२७ मध्ये 'बहिष्कृत भारत' हे पत्र सुरू केले. सामान्य जनतेचे प्रबोधन व संघटन करण्यासाठी बहिष्कृत भारत या पत्रातून त्यांनी लिखाण केले. याशिवाय 'जनता' व 'प्रबुद्ध भारत' अशी आणखी दोन वृत्तपत्रे चालवली.




**नकाशे व आराखडे :** नकाशा हे देखील इतिहासाचे महत्त्वाचे साधन मानले जाते. नकाशावरून आपणांस शहरांचे किंवा एखाद्या ठिकाणाचे बदलणारे स्वरूप अभ्यासता येते. ब्रिटिश काळात स्थापन झालेल्या सर्व्हे ऑफ इंडिया या स्वतंत्र विभागाने भारताचे, भारताच्या विविध प्रांतांचे, शहरांचे शास्त्रशुद्ध पद्धतीने सर्वेक्षण करून नकाशे तयार केलेले आहेत. नकाशांप्रमाणे वास्तुविशारदांनी तयार केलेले आराखडे हे देखील इमारत स्थापत्यशास्त्राच्या तसेच एखाद्या भागाच्या विकासाचे टप्पे

अभ्यासण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरतात. उदा., मुंबई पोर्ट ट्रस्ट या विभागाकडे मुंबई बंदराचे मूळ आराखडे आहेत. हे बंदर पुढे विकसित करताना वास्तुविशारद आणि अभियंत्यांनी केलेल्या आराखड्यांवरून आपणांस मुंबईच्या नागरी विकासाची माहिती मिळू शकते.

**मौखिक साधने :** आधुनिक भारताच्या इतिहासाच्या मौखिक साधनांमध्ये खाली दिलेल्या साधनांचा समावेश होतो.




**स्फूर्तिगीते :** स्वातंत्र्यचळवळीच्या काळात अनेक स्फूर्तिगीतांची रचना केली गेली. त्यांपैकी अनेक गीते आज लिखित स्वरूपात उपलब्ध आहेत. परंतु अनेक अप्रकाशित स्फूर्तिगीते स्वातंत्र्यसैनिकांना मुखोद्गत आहेत. या स्फूर्तिगीतांमधून आपल्याला स्वातंत्र्यपूर्व काळातील परिस्थिती, स्वातंत्र्य आंदोलनामागील प्रेरणा यांविषयी माहिती मिळते.

**पोवाडे :** पोवाड्यांमधून ऐतिहासिक घटनेची तसेच व्यक्तींच्या कार्याविषयी माहिती मिळते. ब्रिटिश अमदानीत १८५७ चा स्वातंत्र्यलढा, विविध क्रांतिकारकांनी केलेले पराक्रम यांवर आधारित पोवाडे रचले गेले. लोकांमध्ये प्रेरणा, चैतन्य निर्माण करण्यासाठी या पोवाड्यांचा उपयोग करण्यात येत असे. स्वातंत्र्यलढ्याप्रमाणेच सत्यशोधक समाजाने पोवाड्यांच्या माध्यमातून केलेली शोषित वर्गातील जागृती, संयुक्त महाराष्ट्र लढा यांसारख्या घटनांवर आधारित पोवाड्यांची रचना केलेली आहे.



**करून पहा.**

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळाशी संबंधित स्फूर्तिगीतांचा व पोवाड्यांचा संग्रह करा व त्यांचे सादरीकरण करा.

**दृक्, श्राव्य आणि दृक्-श्राव्य साधने :** आधुनिक काळात तंत्रज्ञानाच्या विकासामुळे छायाचित्रण, ध्वनिमुद्रण, चित्रपट इत्यादी कलांचा विकास झाला. अर्थात त्यातून निर्माण झालेली छायाचित्रे, ध्वनिमुद्रिते (रेकॉर्ड्स), चित्रपट यांचा वापर इतिहासाची साधने म्हणून करता येतो.

**छायाचित्रे :** छायाचित्रे ही आधुनिक भारताच्या इतिहासाची दृक् स्वरूपाची साधने आहेत. छायाचित्रण कलेचा शोध लागल्यानंतर विविध व्यक्ती, घटना त्याचप्रमाणे वस्तू व वास्तू यांची छायाचित्रे काढण्यात येऊ लागली. या छायाचित्रांमधून आपणांस व्यक्ती तसेच प्रसंग जसे होते किंवा घडले, त्याची दृश्य स्वरूपात माहिती मिळते. मध्ययुगीन काळातील व्यक्ती कशा दिसत होत्या किंवा घटना कशा घडल्या यांची चित्रे उपलब्ध आहेत; परंतु सदर चित्रे किती विश्वसनीय आहेत त्याबाबत प्रश्न उपस्थित केले जातात. त्या तुलनेत छायाचित्रे ही अधिक विश्वसनीय मानली जातात. व्यक्तींच्या छायाचित्रांवरून ती व्यक्ती कशी दिसत होती, तिचा पेहराव कसा होता याविषयी माहिती मिळते. प्रसंगाच्या छायाचित्रांमधून संबंधित प्रसंग नजरेसमोर उभा राहतो तर वास्तू किंवा वस्तूच्या छायाचित्रांमधून त्यांचे स्वरूप लक्षात येते.

**ध्वनिमुद्रिते (रेकॉर्ड्स) :** छायाचित्रण कलेप्रमाणे ध्वनिमुद्रण तंत्राचा शोधही महत्त्वाचा आहे. ध्वनिमुद्रिते किंवा रेकॉर्ड्स ही इतिहासाची श्राव्य स्वरूपाची साधने आहेत. आधुनिक काळात नेत्यांनी किंवा महत्त्वाच्या व्यक्तींनी केलेली भाषणे, गीते ध्वनिमुद्रित स्वरूपात उपलब्ध आहेत. त्यांचा वापर इतिहासाची साधने म्हणून केला जाऊ शकतो. उदा., स्वतः रवींद्रनाथ टागोरांनी गायलेले 'जन गण मन' हे राष्ट्रगीत किंवा सुभाषचंद्र बोस यांचे भाषण यांचा वापर आधुनिक भारताच्या इतिहासाच्या अभ्यासात श्राव्य साधने म्हणून करता येतो.

**चित्रपट :** चित्रपट हा आधुनिक तंत्रज्ञानाचा एक आगळा आविष्कार मानला जातो. विसाव्या शतकात चित्रपट तंत्रज्ञानात मोठ्या प्रमाणात प्रगती झाली. दादासाहेब फाळकेंनी इ.स.१९१३ मध्ये भारतीय चित्रपटसृष्टीची मुहूर्तमेढ रोवली. भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील दांडी यात्रा, मिठाचा सत्याग्रह, चलेजाव आंदोलन यांसारख्या ऐतिहासिक प्रसंगांच्या ध्वनी चित्रफिती उपलब्ध आहेत. या चित्रफितींमुळे घडलेली घटना आपल्याला जशीच्या तशी पाहायला मिळते.

प्राचीन आणि मध्ययुगीन काळाच्या तुलनेत आधुनिक भारताच्या इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी विपुल प्रमाणात आणि विविध प्रकारची साधने उपलब्ध आहेत. या कालखंडातील भौतिक साधने बऱ्याच प्रमाणात सुस्थितीत आहेत. अभिलेखागारात जतन करून ठेवलेली अनेक लिखित साधनेही उपलब्ध आहेत. लिखित साधनांचा वापर करताना मात्र, ते विचार कोणत्या विचारांनी प्रेरित आहेत, एखाद्या घटनेकडे पाहण्याचा साधनकर्त्याचा दृष्टिकोन काय आहे, हे तपासून घ्यावे लागते. अशा साधनांचे जतन करणे आवश्यक आहे. ऐतिहासिक साधनांचे जतन केल्यामुळे इतिहासाचा हा समृद्ध वारसा आपल्याला भावी पिढ्यांकडे सोपवता येईल.

## स्वाध्याय

**१. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

(१) इतिहासाच्या साधनांमधील .......... साधने आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित आहेत.
(अ) लिखित (ब) मौखिक
(क) भौतिक (ड) दृक्-श्राव्य

(२) पुण्यातील .......... या गांधी स्मारक संग्रहालयात गांधीजींच्या इतिहासाविषयी माहिती मिळते.
(अ) आगाखान पॅलेस (ब) साबरमती आश्रम
(क) सेल्युलर जेल (ड) लक्ष्मी विलास पॅलेस

(३) विसाव्या शतकातील आधुनिक तंत्रज्ञानाचा एक आगळा आविष्कार म्हणजे .......... होय.
(अ) पोवाडा (ब) छायाचित्र
(क) मुलाखती (ड) चित्रपट

**२. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**


(१) ब्रिटिश काळात वृत्तपत्रे सामाजिक प्रबोधनाची साधने म्हणूनही काम करत होती.

(२) चित्रफिती या आधुनिक भारताच्या इतिहासाच्या अभ्यासात अतिशय विश्वसनीय साधने मानली जातात.

**३. टीपा लिहा.**

(१) छायाचित्रे (२) वस्तुसंग्रहालये आणि इतिहास
(३) श्राव्य साधने

**४. पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.**




**उपक्रम**

(१) भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील विविध घटनांच्या छायाचित्रांचा आंतरजालाच्या साहाय्याने संग्रह करा.

(२) स्वातंत्र्यलढ्यातील प्रसिद्ध नेते आणि त्यांची चरित्रे यांविषयी माहिती मिळवून त्यांचे वाचन करा.

8VBVQ9


# २. युरोप आणि भारत

आधुनिक कालखंडामध्ये युरोपमध्ये घडणाऱ्या विविध घडामोडींचे पडसाद भारतात उमटत होते. त्यामुळे आधुनिक भारताच्या इतिहासाचा कालखंड अभ्यासताना आपल्याला या काळात युरोपात घडणाऱ्या घटनांचा अभ्यास करावा लागतो.

**प्रबोधनयुग :** युरोपीय इतिहासात मध्ययुगाचा अखेरचा टप्पा म्हणजेच इसवी सनाचे १३ वे ते १६ वे शतक प्रबोधनयुग म्हणून ओळखले जाते. या कालखंडात प्रबोधन, धर्मसुधारणा चळवळ आणि भौगोलिक शोध या घटनांमुळे आधुनिक युगाचा पाया घातला गेला. म्हणूनच या काळाला 'प्रबोधनयुग' असे म्हणतात.

प्रबोधनयुगात युरोपातील कला, स्थापत्य, तत्वज्ञान इत्यादी क्षेत्रांत ग्रीक व रोमन परंपरांचे पुनरुज्जीवन घडून आले. यातूनच सर्वांगीण प्रगतीला चालना मिळाली. प्रबोधनकाळात मानवतावादाला चालना मिळाली. माणसाचा माणसाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. धर्माऐवजी माणूस हा सर्व विचारांचा केंद्रबिंदू ठरला.

**लिओनार्दो-द-विंची :** हे प्रबोधनकाळातील अष्टपैलू व्यक्तिमत्व मानले जाते. तो अनेक शास्त्रे व कलांमध्ये पारंगत होता.



शिल्पकला, स्थापत्यकला, गणित, अभियांत्रिकी, संगीत, खगोलशास्त्र यांसारख्या विविध विषयांवर त्याचे प्रभुत्व होतेच परंतु तो चित्रकार म्हणून जगप्रसिद्ध ठरला. त्याच्या 'मोनालिसा' व 'द लास्ट सपर' या चित्राकृती अजरामर ठरल्या.

प्रबोधन चळवळीने मानवी जीवनाची सर्वच क्षेत्रे व्यापून टाकली. ज्ञान, विज्ञान तसेच विविध कलांच्या क्षेत्रांत आपणांस प्रबोधन चळवळीचा आविष्कार पाहायला मिळतो. प्रबोधनकालीन कला व साहित्यामधून मानवी भावभावना आणि संवेदनांचे चित्रण होऊ लागले. लोकांना समजेल अशा प्रादेशिक भाषांमधून साहित्य निर्माण होऊ लागले. इ.स.१४५० च्या सुमारास जर्मनीच्या जोहान्स गुटेनबर्ग याने छपाई यंत्राचा शोध लावला. छपाई यंत्राच्या शोधामुळे नवे विचार, नव्या संकल्पना व ज्ञान समाजात सर्वांपर्यंत पोहचू लागले.

**धर्मसुधारणा चळवळ :** स्वतंत्र बुद्धीने विचार करणाऱ्या विचारवंतांनी रोमन कॅथलिक चर्चच्या जुन्या धार्मिक कल्पनांवर हल्ला चढवला. लोकांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन ख्रिस्ती धर्मगुरू कर्मकांडांचे स्तोम माजवत असत. धर्माच्या नावावर लोकांना लुबाडत. या विरोधात युरोपात जी चळवळ सुरू झाली तिला 'धर्मसुधारणा चळवळ' असे म्हणतात. या चळवळीमुळे धार्मिक क्षेत्रात माणसाचे स्वातंत्र्य व बुद्धिप्रामाण्य या तत्वांना महत्त्व प्राप्त झाले.

**भौगोलिक शोध :** इ.स.१४५३ मध्ये ऑटोमन तुर्कांनी बायझन्टाइन साम्राज्याची राजधानी असलेले कॉन्स्टॅन्टिनोपल (इस्तंबूल) जिंकून घेतले. या शहरातून आशिया व युरोप यांना जोडणारे खुश्कीचे व्यापारी मार्ग जात. तुर्कांनी हे मार्ग बंद केल्यामुळे युरोपीय देशांना आशियाकडे जाणाऱ्या नव्या मार्गाचा शोध घेणे आवश्यक वाटू लागले. यातूनच भौगोलिक शोधांचे नवे पर्व सुरू झाले.

**हे जाणून घेऊया.**

**भौगोलिक शोध :** पंधराव्या शतकात युरोपीय दर्यावर्दी भारताकडे जाणाऱ्या जलमार्गाचा शोध घेण्यासाठी सागरी सफरीवर निघाले.

- इ.स.१४८७ मध्ये भारताचा शोध घेण्यासाठी बार्थोलोम्यू डायस हा पोर्तुगीज खलाशी निघाला. परंतु तो आफ्रिकेच्या दक्षिण टोकापर्यंत म्हणजे केप ऑफ गुड होप पर्यंत पोहचला.
- इ.स.१४९२ मध्ये भारताचा पश्चिमेकडे जाऊन शोध घेण्याच्या प्रयत्नात ख्रिस्तोफर कोलंबस अमेरिका खंडाच्या पूर्व किनाऱ्यावर पोहचला.
- इ.स.१४९८ मध्ये पोर्तुगीज खलाशी वास्को-द-गामा आफ्रिकेच्या दक्षिण टोकाला वळसा घालून भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील कालिकत बंदरात येऊन पोहचला.



**करून पहा.**

- जगाच्या नकाशा आराखड्यात दर्यावर्दींनी शोधलेले नवे सागरी मार्ग व प्रदेश दाखवा.

**युरोपातील वैचारिक क्रांती :** प्रबोधन काळात झालेल्या बदलांमुळे युरोपची मध्ययुगाकडून आधुनिक युगाकडे वाटचाल सुरू झाली. याच काळात युरोपमध्ये वैचारिक क्रांती घडून आली. पूर्वीचे अज्ञान व अंधश्रद्धा यातून समाज बाहेर पडू लागला. प्रस्थापित रूढी व परंपरा आणि घडणाऱ्या घटनांकडे चिकित्सक दृष्टिकोनातून पाहिले जाऊ लागले. या संपूर्ण बदलांना 'वैचारिक क्रांती' असे संबोधले जाते. या वैचारिक क्रांतीतून युरोपमध्ये वैज्ञानिक क्षेत्रामध्ये संशोधनाला चालना मिळाली.

**राजकीय क्षेत्रातील क्रांती :** आधुनिक कालखंडाच्या सुरुवातीच्या टप्प्यात युरोपमध्ये अनेक राजकीय स्थित्यंतरे घडून आली. १८ व्या तसेच १९ व्या शतकात घडलेल्या अनेक क्रांतिकारक घटनांमुळे हा कालखंड 'क्रांतियुग' म्हणून ओळखला जातो. या काळात इंग्लंडमध्ये संसदीय लोकशाहीचा विकास झाला. कॅबिनेट पद्धतीच्या स्वरूपात बदल झाला. इ.स. १६८९ च्या बिल ऑफ राईट्समुळे राजाच्या अधिकारावर मर्यादा घातल्या गेल्या. पार्लमेंटचे सार्वभौमत्व प्रस्थापित झाले.

**अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध :** युरोपात घडणाऱ्या क्रांतिकारक घडामोडींच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेतील स्वातंत्र्ययुद्धाचाही विचार करणे महत्वाचे ठरते. अमेरिका खंडाच्या शोधानंतर युरोपीय देशांनी आपले लक्ष या खंडाकडे वळवले. साम्राज्यवादी युरोपीय देशांनी अमेरिका खंडाचे विविध प्रदेश ताब्यात घेऊन तेथे आपल्या वसाहती स्थापन केल्या. इंग्लंडने उत्तर अमेरिकेच्या पूर्व किनारपट्टीवर तेरा वसाहती स्थापन केल्या. सुरुवातीस इंग्लंडचे या वसाहतींवर नाममात्र वर्चस्व होते. परंतु पुढील काळात इंग्लंडच्या पार्लमेंटने अमेरिकन वसाहतींवर जाचक बंधने व कर लादण्यास सुरुवात केली. अमेरिकन वसाहतीतील स्वातंत्र्यप्रिय जनतेने याला विरोध केला. इंग्लंडने वसाहतींना दडपण्यासाठी वसाहतींविरोधात युद्ध पुकारले. अमेरिकन वसाहतींनी जॉर्ज वॉशिंग्टनच्या नेतृत्वाखाली सैन्य संघटित करून प्रतिकार केला. अखेरीस वसाहतींच्या सैन्याचा विजय झाला. ही घटना 'अमेरिकेचे स्वातंत्र्ययुद्ध' म्हणून ओळखली जाते. यातूनच अमेरिकेची संयुक्त संस्थाने हा संघराज्य शासनपद्धती, लिखित राज्यघटना असणारा व लोकशाही व्यवस्था असलेला नवा देश अस्तित्वात आला.

**फ्रेंच राज्यक्रांती :** इ.स.१७८९ मध्ये फ्रान्समधील जनतेने तेथील अनियंत्रित अशा अन्यायकारक राजेशाही आणि सरंजामशाहीविरुद्ध उठाव केला आणि प्रजासत्ताकाची स्थापना केली. ही घटना 'फ्रेंच राज्यक्रांती' म्हणून ओळखली जाते. फ्रेंच राज्यक्रांतीने जगाला स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांची देणगी दिली.

जगाच्या इतिहासातील राजकीय क्रांतीमध्ये अमेरिकन स्वातंत्र्ययुद्ध आणि फ्रेंच राज्यक्रांतीला

विशेष महत्वाचे स्थान आहे.

**औद्योगिक क्रांती :** अठराव्या शतकाच्या उत्तरार्धापासून युरोपातील औद्योगिक क्षेत्रात क्रांतिकारक बदल घडू लागले. बाष्पशक्तीवर चालणाऱ्या यंत्रांच्या साहाय्याने उत्पादन होऊ लागले. छोट्या घरगुती उद्योगधंद्यांची जागा मोठ्या कारखान्यांनी घेतली. हातमागाऐवजी यंत्रमागाचा वापर सुरू झाला. आगगाडी आणि आगबोटीसारखी वाहतुकीची नवी साधने आली. यंत्रयुग अवतरले. यालाच 'औद्योगिक क्रांती' असे म्हणतात.

इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीला प्रारंभ झाला आणि नंतर ती टप्प्याटप्प्याने पाश्चात्त्य जगात पसरली. या काळात इंग्लंडची औद्योगिक भरभराट इतकी झाली, की इंग्लंडचे वर्णन 'जगाचा कारखाना' असे केले जाऊ लागले.

**भांडवलशाहीचा उदय :** नव्या सागरी मार्गांच्या शोधानंतर युरोप व आशियाई देशांमधील व्यापाराच्या नव्या पर्वाला सुरुवात झाली. सागरी मार्गाने पूर्वेकडील देशांशी व्यापार करायला अनेक व्यापारी पुढे आले. मात्र एकट्या व्यापाऱ्यास जहाजातून माल परदेशी पाठवणे शक्य नव्हते. त्यामुळे अनेक व्यापारी एकत्र येऊन त्यांनी व्यापार सुरू केला. यातूनच भागभांडवल असणाऱ्या अनेक व्यापारी कंपन्या उदयास आल्या. पौर्वात्य देशांशी होणारा व्यापार फायदेशीर होता. या व्यापारातून देशांची आर्थिक भरभराट होत असे. त्यामुळे युरोपातील राज्यकर्ते व्यापारी कंपन्यांना लष्करी संरक्षण व व्यापारी सवलती देऊ लागले. या व्यापारामुळे युरोपीय देशांमध्ये धनसंचय वाढीस लागला. या संपत्तीचा उपयोग भांडवलाच्या रूपात व्यापार व उद्योगधंद्यांमध्ये केला जाऊ लागला. यामुळे युरोपीय देशांत भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा उदय झाला.

**वसाहतवाद :** एका देशातील काही लोकांनी दुसऱ्या भूप्रदेशातील एखाद्या विशिष्ट भागात वस्ती करणे म्हणजे वसाहत स्थापन करणे होय. आर्थिक व लष्करीदृष्ट्या बलशाली देशाने आपल्या सामर्थ्याच्या बळावर एखादा भूप्रदेश व्यापणे आणि त्या ठिकाणी आपले राजकीय वर्चस्व प्रस्थापित करणे म्हणजेच 'वसाहतवाद' होय. युरोपीय देशांच्या याच वसाहतवादी प्रवृत्तीतून साम्राज्यवाद उदयास आला.

**साम्राज्यवाद :** विकसित राष्ट्राने अविकसित राष्ट्रावर आपले सर्वांगीण वर्चस्व प्रस्थापित करणे व अनेक नव्या वसाहती स्थापन करणे म्हणजेच 'साम्राज्यवाद' होय. आशिया व आफ्रिका खंडांतील अनेक राष्ट्रे युरोपीय राष्ट्रांच्या या साम्राज्यवादी महत्त्वाकांक्षेला बळी पडली.

**ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचा भारतातील साम्राज्यवाद :** भारतात व्यापारी मक्तेदारी मिळवण्यासाठी युरोपीय सत्तांमध्ये अटीतटीची स्पर्धा होती. इ.स.१६०० मध्ये इंग्रजांनी भारतात व्यापार करण्यासाठी ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना केली होती. या कंपनीने जहांगीर बादशाहाकडून परवानगी मिळवून सुरत येथे वखार स्थापन केली. या कंपनीमार्फत भारताचा इंग्लंडशी व्यापार चालत असे.

**इंग्रज व फ्रेंच संघर्ष :** भारतातील व्यापारी स्पर्धेत इंग्रज आणि फ्रेंच एकमेकांचे प्रतिस्पर्धी होते. या स्पर्धेमुळे इंग्रज आणि फ्रेंच यांच्यात तीन युद्धे झाली. ती युद्धे 'कर्नाटक युद्धे' म्हणून ओळखली जातात. तिसऱ्या कर्नाटक युद्धात इंग्रजांनी फ्रेंचांचा निर्णायक पराभव केला. त्यामुळे ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीला भारतात प्रबळ युरोपीय स्पर्धक उरला नाही.

**बंगालमध्ये ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या सत्तेचा पाया :** बंगाल प्रांत हा भारतातील अत्यंत समृद्ध असा प्रांत होता. इ.स.१७५६ साली सिराज उद्दौला हा बंगालच्या नवाबपदी आला. ईस्ट इंडिया कंपनीचे अधिकारी मुघल बादशाहाकडून बंगाल प्रांतात मिळालेल्या व्यापारी सवलतीचा गैरवापर करत. इंग्रजांनी नवाबाची परवानगी न घेता कोलकाता येथील आपल्या वखारीभोवती तटबंदी उभारली. यामुळे सिराज उद्दौलाने इंग्रजांवर चाल करून कोलकात्याची वखार काबीज केली. या घटनेने

इंग्रजांमध्ये असंतोष निर्माण झाला. रॉबर्ट क्लाईव्ह याने मुत्सद्देगिरीने नवाबाचा सेनापती मीर जाफर यास नवाब पदाचे आमिष दाखवून आपल्या बाजूने वळवले. इ.स.१७५७ मध्ये प्लासी येथे नवाब सिराज उद्दौला व इंग्रज सैन्याची गाठ पडली. परंतु मीर जाफरच्या नेतृत्वाखाली नवाबाचे लष्कर युद्धात न उतरल्यामुळे सिराज उद्दौलाचा पराभव झाला.

इंग्रजांच्या पाठिंब्याने मीर जाफर बंगालचा नवाब बनला. पुढे त्याने विरोध करताच त्याचा जावई मीर कासीम यास त्यांनी नवाब बनवले. मीर कासीमने इंग्रजांच्या बेकायदेशीर व्यापाराला आळा घालण्याचा प्रयत्न करताच त्यांनी पुन्हा मीर जाफरला नवाबपद दिले.

बंगालमधील इंग्रजांच्या कारवायांना लगाम घालण्यासाठी मीर कासीम, अयोध्येचा नवाब शुजा उद्दौला आणि मुघल बादशाह शाहआलम यांनी इंग्रजांविरुद्ध एकत्र मोहीम काढली. इ.स.१७६४ मध्ये बिहार येथील बक्सार येथे युद्ध झाले. त्यात इंग्रजांचा विजय झाला. या लढाईनंतर अलाहाबादच्या तहानुसार बंगालच्या सुभ्यात दिवाणी म्हणजेच महसूल गोळा करण्याचा अधिकार ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीला मिळाला. अशा प्रकारे भारतातील इंग्रजी सत्तेचा पाया बंगालमध्ये घातला गेला.

**इंग्रज-म्हैसूर संघर्ष :** म्हैसूर राज्यातील हैदरअलीने उठाव करून म्हैसूरचे राज्य ताब्यात घेतले. हैदरअलीच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा टिपू सुलतान म्हैसूरच्या सत्तेवर आला. त्याने इंग्रजांविरुद्धचा लढा शर्थीने लढवला. अखेर १७९९ मध्ये श्रीरंगपट्टण येथे झालेल्या युद्धात टिपू सुलतान मरण पावला. अशा रीतीने म्हैसूरच्या प्रदेशावर इंग्रजांचे वर्चस्व निर्माण झाले.


टिपू सुलतान

**सिंधवर इंग्रजांचा ताबा :** भारतातील आपली सत्ता सुरक्षित करण्यासाठी इंग्रज वायव्य सरहद्दीकडे वळले. रशिया भारतावर अफगाणिस्तानातून आक्रमण करेल अशी त्यांना भीती होती, म्हणून इंग्रजांनी अफगाणिस्तानवर आपला प्रभाव प्रस्थापित करण्याचे ठरवले. अफगाणिस्तानकडे जाणारे मार्ग सिंधमधून जात होते. यामुळे सिंधचे महत्त्व इंग्रजांच्या ध्यानात आले आणि १८४३ साली त्यांनी सिंध गिळंकृत केला.

**शीख सत्तेचा पाडाव :** एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी पंजाबमधील सत्ता रणजितसिंहाच्या हाती होती. रणजितसिंहाच्या मृत्यूनंतर त्याचा अल्पवयीन मुलगा दलीपसिंग गादीवर बसला. त्याच्या वतीने त्याची आई राणी जिंदन राज्याचा कारभार पाहू लागली, मात्र सरदारांवर तिचा अंकुश राहिला नाही. ही संधी साधून इंग्रजांनी काही शीख सरदारांना फितूर केले. इंग्रज पंजाबवर आक्रमण करणार, असा शिखांचा समज झाल्यामुळे त्यांनी इंग्रजांवर हल्ला केला. या पहिल्या शीख-इंग्रज युद्धात शिखांचा पराभव झाला. दलीपसिंगाला इंग्रजांनी गादीवर कायम ठेवले. पंजाबवरील इंग्रजांचा वाढता प्रभाव काही स्वातंत्र्यप्रिय शिखांना मान्य नव्हता. मुलतानचा अधिकारी मूलराज याने इंग्रजांविरुद्ध बंड केले. हजारो शीख सैनिक इंग्रजांविरुद्ध युद्धात उतरले. या दुसऱ्या युद्धातही शीख पराभूत झाले. १८४९ मध्ये इंग्रजांनी पंजाबचा प्रदेश आपल्या राज्याला जोडला.


रणजितसिंह

मराठ्यांची सत्ता ही भारतातील महत्त्वाची प्रबळ सत्ता होती. मराठ्यांचा पराभव करून इंग्रजांनी भारतातील आपल्या सत्तेचा पाया मजबूत कसा केला याचा अभ्यास आपण पुढील पाठामध्ये करणार आहोत.

## स्वाध्याय

### १. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.

(१) इ.स.१४५३ मध्ये ऑटोमन तुर्कांनी ............ हे शहर जिंकून घेतले.

(अ) व्हेनिस (ब) कॉन्स्टॅन्टिनोपल
(क) रोम (ड) पॅरिस

(२) औद्योगिक क्रांतीला प्रारंभ ......... मध्ये झाला.

(अ) इंग्लंड (ब) फ्रान्स
(क) इटली (ड) पोर्तुगाल

(३) इंग्रजांच्या बेकायदेशीर व्यापाराला आळा घालण्याचा प्रयत्न ........... याने केला.

(अ) सिराज उद्‌दौला (ब) मीर कासीम
(क) मीर जाफर (ड) शाहआलम

### २. पुढील संकल्पना स्पष्ट करा.

(१) वसाहतवाद (२) साम्राज्यवाद
(३) प्रबोधनयुग (४) भांडवलशाही

### ३. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.

(१) प्लासीच्या लढाईत सिराज उद्‌दौलाचा पराभव झाला.

(२) युरोपीय देशांना आशियाकडे जाणाऱ्या नव्या मार्गाचा शोध घेणे आवश्यक वाटू लागले.

(३) युरोपातील राज्यकर्ते व्यापारी कंपन्यांना लष्करी संरक्षण व व्यापारी सवलती देऊ लागले.

### ४. पाठाच्या मदतीने पुढील तक्ता पूर्ण करा.

| दर्यावर्दी | कार्य |
|---|---|
| ................. | आफ्रिकेच्या दक्षिण टोकापर्यंत पोहचला. |
| ख्रिस्तोफर कोलंबस | .................... .................... |
| ................. | भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील कालिकत बंदरात पोहचला. |

#### उपक्रम

प्रबोधनकाळातील प्रसिद्ध चित्रकार, साहित्यिक, शास्त्रज्ञ यांच्या कार्याविषयी संदर्भग्रंथ तसेच आंतरजालाच्या साहाय्याने माहिती व चित्रे मिळवून वर्गात प्रकल्प सादर करा.

8VKRRH

# ३. ब्रिटिश सत्तेचे परिणाम

या पाठात आपण इंग्रज सत्तेचे भारतावर झालेले परिणाम अभ्यासणार आहोत.

**ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना :** भौगोलिक शोधांमुळे युरोपीय सत्ता भारताच्या किनाऱ्यावर कशा येऊन पोचल्या हे आपण पाहिले आहे. पोर्तुगीज, डच, फ्रेंच, ब्रिटिश असे सर्व युरोपीय भारताची बाजारपेठ काबीज करण्याच्या सत्तास्पर्धेत उतरले. इंग्रज भारतात व्यापाराच्या निमित्ताने आले तेव्हा भारतात आधीच असलेल्या पोर्तुगिजांचा त्यांना कडवा विरोध झाला. नंतरच्या काळात इंग्रज-पोर्तुगीज संबंध मैत्रीचे होऊन विरोध कमी झाला. परंतु, भारतावर वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या स्पर्धेत इंग्रजांना फ्रेंच, डच व स्थानिक सत्ताधीशांच्या विरोधाला तोंड द्यावे लागले.

**इंग्रज व मराठे :** मुंबई हे इंग्रजांचे पश्चिम भारतातील प्रमुख केंद्र होते. त्याच्या जवळपासचा प्रदेश मिळवण्याचा त्यांचा प्रयत्न होता; परंतु या प्रदेशावर मराठ्यांची घट्ट पकड होती. माधवराव पेशवे यांच्या मृत्यूनंतर त्यांचा चुलता रघुनाथरावाने पेशवेपदाच्या लालसेपोटी इंग्रजांची मदत मागितली. त्यामुळे मराठ्यांच्या राजकारणात इंग्रजांचा शिरकाव झाला.

१७७४ ते १८१८ या दरम्यान मराठे व इंग्रज यांच्यात तीन युद्धे झाली. पहिल्या युद्धात मराठा सरदारांनी एकजुटीने इंग्रजांना तोंड दिले. त्यामुळे मराठ्यांची सरशी झाली. १७८२ साली सालबाईचा तह होऊन पहिले इंग्रज-मराठा युद्ध संपले.

**तैनाती फौज :** १७९८ मध्ये लॉर्ड वेलस्ली गव्हर्नर जनरल म्हणून भारतात आला. सर्व भारतावर इंग्रजांचे वर्चस्व प्रस्थापित करण्याचे त्याचे धोरण होते. त्यासाठी त्याने अनेक भारतीय सत्ताधीशांशी तैनाती फौजेचे करार केले. या करारांन्वये भारतीय सत्ताधीशांना इंग्रजांच्या लष्करी मदतीचे आश्वासन देण्यात आले. मात्र त्यासाठी काही अटी घातल्या. भारतीय राज्यकर्त्यांनी त्यांच्या राज्यात इंग्रजांचे लष्कर ठेवावे. त्या लष्कराच्या खर्चासाठी रोख रक्कम किंवा तेवढ्या उत्पन्नाचा प्रदेश कंपनीला तोडून द्यावा. त्यांनी इतर सत्ताधीशांशी इंग्रजांच्या मध्यस्थीनेच संबंध ठेवावे, आपल्या दरबारी इंग्रजांचा रेसिडेंट (प्रतिनिधी) ठेवावा अशा त्या अटी होत्या. भारतातील काही सत्ताधीशांनी ही पद्धत स्वीकारली व आपले स्वातंत्र्य गमावले.

१८०२ मध्ये दुसऱ्या बाजीराव पेशव्याने इंग्रजांशी तैनाती फौजेचा करार केला. हा करार वसईचा तह म्हणून प्रसिद्ध आहे; परंतु हा तह काही मराठा सरदारांना मान्य नव्हता. त्यामुळे दुसरे इंग्रज-मराठा युद्ध झाले. त्यातील विजयानंतर इंग्रजांचा मराठी राज्यातील हस्तक्षेप वाढू लागला. तो असह्य होऊन दुसऱ्या बाजीरावाने इंग्रजांविरुद्ध युद्ध पुकारले. या युद्धात त्याचा पराभव झाला. १८१८ मध्ये त्याने शरणागती पत्करली. दरम्यान मुघलांची राजधानी दिल्ली प्रत्यक्षात दौलतराव शिंदे यांच्या नियंत्रणाखाली होती. शिंद्यांच्या फौजेचा पराभव करून जनरल लेक याने मुघल बादशहाला ताब्यात घेऊन हिंदुस्थान जिंकला.


छत्रपती प्रतापसिंह

**छत्रपती प्रतापसिंह :** पेशवाईचा अस्त झाला तरी साताऱचे छत्रपती प्रतापसिंह गादीवर होते. इंग्रजांनी छत्रपती प्रतापसिंहाशी तह करून ग्रँड डफ या अधिकाऱ्याची त्यांना राज्यकारभारात मदत करण्यासाठी नेमणूक केली. परंतु नंतर त्यांना गादीवरून पदच्युत करून काशी येथे ठेवण्यात आले. तेथेच त्यांचा १८४७ मध्ये मृत्यू झाला.

छत्रपती प्रतापसिंहांचे कारभारी रंगो बापूजी गुप्ते यांनी इंग्लंडपर्यंत जाऊन या अन्यायाविरुद्ध दाद मागण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांच्या न्याय मिळवण्याच्या प्रयत्नांना यश आले नाही. पुढे लॉर्ड

डलहौसीने दत्तकविधान नामंजूर करून १८४८ मध्ये सातारचे राज्य खालसा केले.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

छत्रपती प्रतापसिंह यांनी सातारा शहरात येवतेश्वराच्या देवालयाच्या मागील बाजूस व महादरा येथे तलाव बांधून त्याचे पाणी शहरात खेळवले. शहरात रस्ते बांधले. रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना झाडे लावली. मुलामुलींना संस्कृत, मराठी, इंग्रजी शिकण्यासाठी पाठशाळा बांधली. तेथेच एक छापखाना काढला आणि अनेक उपयुक्त ग्रंथ छापून घेतले. १८२७ साली राजनीतीविषयक 'सभानीति' नावाचा एक ग्रंथ लिहून छापला. त्यांनी साताऱ्याहून महाबळेश्वर ते प्रतापगडापर्यंत रस्ता तयार केला. तोच रस्ता पुढे महाडपर्यंत नेण्यात आला. छत्रपती प्रतापसिंह हे दररोज रोजनिशी स्वतः लिहीत असत.

## ब्रिटिश सत्तेचे भारतावरील परिणाम

**दुहेरी राज्यव्यवस्था :** रॉबर्ट क्लाइव्हने १७६५ साली बंगालमध्ये दुहेरी राज्यव्यवस्था अस्तित्वात आणली. महसूल गोळा करण्याचे काम कंपनीने हाती घेतले, तर शांतता व सुव्यवस्था राखण्याचे काम बंगालच्या नवाबाकडे ठेवले. यालाच 'दुहेरी राज्यव्यवस्था' असे म्हणतात.

दुहेरी राज्यव्यवस्थेचे दुष्परिणाम कालांतराने दिसू लागले. सामान्य जनतेकडून कररूपाने वसूल केलेले पैसे कंपनीतील अधिकाऱ्यांनी स्वतःच्या खिशात घातले. भारतातील व्यापाराचा मक्ता फक्त ईस्ट इंडिया कंपनीला दिल्यामुळे इंग्लंडमधील अनेक व्यापाऱ्यांना कंपनीचा हेवा वाटत होता. कंपनीच्या भारतावरील कारभारावर इंग्लंडमध्ये टीका होऊ लागली तेव्हा कंपनीच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी इंग्लंडच्या पार्लमेंटने काही महत्त्वाचे कायदे केले.

**पार्लमेंटने केलेले कायदे :** १७७३ च्या रेग्युलेटिंग ॲक्टनुसार बंगालच्या गव्हर्नरला 'गव्हर्नर जनरल' असा हुद्दा देण्यात आला. या ॲक्टनुसार लॉर्ड वॉरन हेस्टिंग्ज हा गव्हर्नर जनरल झाला. मुंबई व मद्रास इलाख्यांच्या धोरणावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार त्याला मिळाला. त्याच्या मदतीला चार सदस्यांची समिती नेमण्यात आली.

१७८४ मध्ये पिटचा भारतविषयक कायदा मंजूर झाला. कंपनीच्या भारतातील राज्यकारभारावर पार्लमेंटचे नियंत्रण ठेवण्यासाठी एक कायम स्वरूपाचे नियामक मंडळ स्थापन करण्यात आले. कंपनीला भारतातील राज्यकारभाराविषयी आदेश देण्याचा अधिकार या मंडळाला देण्यात आला. १८१३, १८३३ व १८५३ मध्ये कंपनीच्या कारभारात फेरबदल करणारे कायदे पार्लमेंटने केले. अशा प्रकारे कंपनीच्या प्रशासनावर ब्रिटिश सरकारचे अप्रत्यक्ष नियंत्रण अस्तित्वात आले.

इंग्रज सत्तेच्या आगमनापाठोपाठ नवी प्रशासकीय पद्धत भारतात रूढ झाली. मुलकी नोकरशाही, लष्कर, पोलीस दल व न्यायसंस्था हे इंग्रजांच्या भारतातील प्रशासनाचे प्रमुख आधारस्तंभ होते.

**मुलकी नोकरशाही :** भारतात इंग्रजांची सत्ता दृढ करण्यासाठी इंग्रजांना नोकरशाहीची गरज होती. लॉर्ड कॉर्नवालिस याने नोकरशाहीची निर्मिती केली. मुलकी नोकरशाही हा इंग्रजी शासनाचा महत्त्वाचा घटक बनला. कंपनीच्या अधिकाऱ्यांनी खासगी व्यापार करू नये, असा नियम त्याने घालून दिला. त्यासाठी त्याने अधिकाऱ्यांचे पगार वाढवले.

प्रशासनाच्या सोईसाठी त्याने इंग्रजांच्या ताब्यातील प्रदेशांची जिल्हावार विभागणी केली. जिल्हाधिकारी हा जिल्हा शासनाचा प्रमुख असे. महसूल गोळा करणे, न्याय देणे, शांतता व सुव्यवस्था राखणे ही त्याची जबाबदारी असे. अधिकाऱ्यांची भरती इंडियन सिव्हिल सर्व्हिसेस (आय.सी.एस.) या स्पर्धात्मक परीक्षेद्वारे केली जाऊ लागली.

**लष्कर व पोलीस दल :** भारतातील इंग्रजांच्या ताब्यातील प्रदेशांचे संरक्षण करणे, नवे प्रदेश हस्तगत करणे व भारतातील इंग्रजांविरोधी उठाव मोडून काढणे ही लष्कराची कामे होती. देशात कायदा व सुव्यवस्था राखणे हे पोलीस दलाचे काम असे.

**न्यायव्यवस्था :** इंग्लंडमधील न्यायव्यवस्थेच्या धर्तीवर इंग्रजांनी भारतात नवी न्यायव्यवस्था स्थापन केली. प्रत्येक जिल्ह्यात मुलकी खटल्यासाठी दिवाणी न्यायालय व फौजदारी खटल्यासाठी फौजदारी न्यायालय स्थापन केले. त्यांच्या निर्णयांच्या फेरविचारासाठी उच्च न्यायालये स्थापन केली.

**कायद्यापुढील समानता :** भारतामध्ये पूर्वी ठिकठिकाणी वेगवेगळे कायदे होते. न्यायदानात जातींनुसार भेदभाव केला जाई. लॉर्ड मेकॉलेच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या विधिसमितीने कायद्याची संहिता तयार केली. सर्व भारतात एकच कायदा लागू केला. कायद्यापुढे सर्व समान आहेत, हे तत्त्व इंग्रजांनी रूढ केले.

या पद्धतीतसुद्धा काही दोष होते. युरोपीय लोकांवरील खटले चालवण्यासाठी स्वतंत्र न्यायालये व वेगळे कायदे अस्तित्वात होते. नवे कायदे सामान्य लोकांना समजत नसत. न्याय ही सामान्य लोकांसाठी खूपच खर्चिक बाब होती. खटले वर्षानुवर्षे चालत.

**इंग्रजांची आर्थिक धोरणे :** प्राचीन काळापासून भारतावर आक्रमणे होत राहिली. अनेक आक्रमक भारतामध्ये स्थायिक झाले. ते भारतीय संस्कृतीशी समरस झाले. त्यांनी जरी येथे राज्य केले, तरी भारताच्या अर्थव्यवस्थेत मूलभूत बदल केले नाहीत. इंग्रजांचे मात्र तसे नव्हते.

इंग्लंड हे आधुनिक राष्ट्र होते. औद्योगिक क्रांतीमुळे तेथे भांडवलशाही अर्थव्यवस्था रूढ झाली होती. या व्यवस्थेला पोषक अशी अर्थव्यवस्था त्यांनी भारतात रुजवली. त्यामुळे इंग्लंडचा आर्थिक लाभ झाला; परंतु भारतीयांचे मात्र आर्थिक शोषण होऊ लागले.

**जमीन महसूलविषयक धोरण :** इंग्रजी अंमल सुरू होण्यापूर्वी खेड्यातील अर्थव्यवस्था स्वयंपूर्ण होती. शेती व इतर उद्योग यांच्याद्वारे गावाच्या गरजा गावातच भागत असत. जमीन महसूल हे राज्याच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन होते. इंग्रजपूर्व काळात पिकानुरूप शेतसारा आकारला जात असे. पीक चांगले आले नाही तर शेतसाऱ्यात सूट मिळे. महसूल प्रामुख्याने धान्यरूपाने घेतला जाई. शेतसारा भरण्यास उशीर झाला तरी शेतकऱ्यांकडून जमीन काढून घेतली जात नसे.

उत्पन्न वाढवण्यासाठी इंग्रजांनी महसूल पद्धतीत महत्त्वाचे बदल केले. इंग्रजांनी जमिनीची मोजणी करून जमिनीच्या क्षेत्रानुसार शेतसाऱ्याची आकारणी निश्चित केली. रोख रकमेत व ठरावीक वेळेत शेतसारा भरावा अशी सक्ती केली. शेतसारा वेळेत न भरल्यास शेतकऱ्यांची जमीन जप्त केली जाईल, असा नियम केला. महसूल गोळा करण्याची इंग्रजांची पद्धत भारताच्या वेगवेगळ्या भागांत वेगवेगळी होती. सर्वत्र शेतकऱ्यांचे शोषण होत असे.


**नव्या जमीन महसूलव्यवस्थेचे परिणाम :** नव्या जमीन महसूलव्यवस्थेचे अनिष्ट परिणाम ग्रामीण जीवनावर झाले. शेतसारा भरण्यासाठी येईल त्या किमतीला शेतकरी पीक विकू लागले. व्यापारी व दलाल वाजवीपेक्षा कमी दराने त्यांचा माल खरेदी करू लागले. प्रसंगी शेतकऱ्यांना सारा भरण्यासाठी सावकाराकडे जमीन गहाण टाकून कर्ज घ्यावे लागे. त्यामुळे शेतकरी कर्जबाजारी झाले. कर्जफेड झाली नाही तर त्यांना आपल्या जमिनी विकाव्या लागत. सरकार, जमीनदार, सावकार, व्यापारी हे सर्व शेतकऱ्यांचे शोषण करत असत.

**शेतीचे व्यापारीकरण :** पूर्वी शेतकरी प्रामुख्याने अन्नधान्य पिकवत असत. हे अन्नधान्य त्यांना घरच्या वापरासाठी व गावाची गरज भागवण्यासाठी उपयोगी पडत असे. कापूस, नीळ, तंबाखू, चहा इत्यादी नगदी पिकांना इंग्रज सरकार उत्तेजन देऊ लागले. अन्नधान्याच्या लागवडीपेक्षा नफा मिळवून

देणारी व्यापारी पिके घेण्यावर जो भर दिला जाऊ लागला, त्या प्रक्रियेला 'शेतीचे व्यापारीकरण' असे म्हणतात.

**दुष्काळ :** १८६० ते १९०० या काळात भारतात मोठे दुष्काळ पडले; परंतु इंग्रज राज्यकर्त्यांनी दुष्काळ निवारणासाठी पुरेसे प्रयत्न केले नाहीत. तसेच पाणीपुरवठ्याच्या योजनांवर फारसा खर्चही केला नाही.

**वाहतूक व दळणवळण व्यवस्थेत सुधारणा :** इंग्रजांनी व्यापारवृद्धी आणि प्रशासनाची सोय यांसाठी भारतात वाहतूक व दळणवळण यांच्या आधुनिक सोईसुविधा निर्माण केल्या. कोलकाता व दिल्ली यांना जोडणारा महामार्ग त्यांनी बांधला. १८५३ साली मुंबई-ठाणे रेल्वे मार्गावर आगगाडी धावू लागली. त्याच वर्षी तारायंत्राद्वारे संदेश पाठवण्याची यंत्रणा इंग्रजांनी भारतात सुरू केली. या यंत्रणेने भारतातील प्रमुख शहरे आणि लष्करी ठाणी एकमेकांना जोडली गेली. त्याचप्रमाणे इंग्रजांनी डाकव्यवस्थाही सुरू केली.




मुंबई-ठाणे रेल्वे (१८५३)

या सर्व सुधारणांमुळे भारतीय समाजजीवनावर दूरगामी परिणाम झाले. देशाच्या विविध भागांमधील लोकांचा परस्परांशी संपर्क वाढला. त्यामुळे त्यांच्यातील एकतेची भावना वाढण्यास हातभार लागला.

**भारतातील जुन्या उद्योगधंद्यांचा ऱ्हास :** भारतातून इंग्लंडला जाणाऱ्या मालावर इंग्रज सरकार जबरदस्त कर आकारत असे. उलट इंग्लंडमधून भारतात येणाऱ्या मालावर अतिशय कमी कर आकारण्यात येई. तसेच इंग्लंडमधून येणारा माल हा यंत्रावर तयार झालेला असे. त्यामुळे त्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणात व कमी खर्चात होई. अशा स्वस्त मालाशी स्पर्धा करणे भारतीय कारागिरांना कठीण झाले. परिणामी भारतातील पारंपरिक उद्योगधंदे बंद पडले व अनेक कारागीर बेकार झाले.

**भारतात नव्या उद्योगधंद्यांचा विकास :** इंग्रज सरकारचा पाठिंबा, व्यवस्थापनाचा अनुभव व भांडवल इत्यादी गोष्टींच्या अभावामुळे भारतीय उद्योजक मोठ्या संख्येने पुढे येऊ शकले नाहीत; परंतु अशा अडचणींवर मात करून काही भारतीयांनी उद्योगांची उभारणी केली.

१८५३ मध्ये कावसजी नानाभॉय दावर यांनी मुंबईत पहिली कापड गिरणी सुरू केली. १८५५ मध्ये बंगालमधील रिश्रा येथे तागाची पहिली गिरणी सुरू झाली. १९०७ साली जमशेदजी टाटा यांनी जमशेदपूर येथे टाटा आयर्न अँड स्टील कंपनीचा पोलाद निर्मितीचा कारखाना स्थापन केला.



जमशेदजी टाटा

भारतामध्ये कोळसा, धातू, साखर, सिमेंट व रासायनिक द्रव्ये या उद्योगांनाही सुरुवात झाली.

**सामाजिक व सांस्कृतिक परिणाम :** एकोणिसाव्या शतकात युरोपमध्ये मानवतावाद, बुद्धिवाद, लोकशाही, राष्ट्रवाद, उदारमतवाद या मूल्यांवर आधारित नवे युग साकारले होते. पाश्चिमात्य जगातील या परिवर्तनाचे पडसाद भारतातसुद्धा उमटणे स्वाभाविक होते. इंग्रजांना प्रशासन चालवण्यासाठी भारतातील समाजाची ओळख करून घ्यायची होती. त्यासाठी त्यांनी येथील परंपरा, इतिहास, साहित्य, कला तसेच येथील संगीत, प्राणी-पक्षी यांचाही अभ्यास करण्यास

सुरुवात केली. १७८४ साली विल्यम जोन्स या इंग्रज अधिकाऱ्याने कोलकाता येथे 'एशियाटिक सोसायटी ऑफ बंगाल' ही संस्था स्थापन केली. मॅक्सम्युलर हा जर्मन विचारवंत भारतीय धर्म, भाषा, इतिहास यांचा गाढा अभ्यासक होता. या उदाहरणांमुळे आपणही आपला धर्म, इतिहास, परंपरा यांचा अभ्यास करायला हवा, अशी जाणीव नवशिक्षित भारतीयांमध्ये होऊ लागली.

इंग्रजांनी भारतात अनेक कायदे केले. १८२९ मध्ये लॉर्ड बेंटिंकने सतीबंदीचा कायदा केला. १८५६ मध्ये लॉर्ड डलहौसीने विधवा पुनर्विवाहाला मान्यता देणारा कायदा केला. हे कायदे समाजसुधारणेस पूरक ठरले.

प्रशासन चालवण्यासाठी ब्रिटिशांना इंग्रजी शिक्षण घेतलेल्या भारतीयांची गरज होती. लॉर्ड मेकॉलेच्या शिफारशीनुसार १८३५ मध्ये भारतात इंग्रजी शिक्षण सुरू करण्यात आले. नव्या शिक्षणाद्वारे नवे पाश्चात्त्य विचार, आधुनिक सुधारणा, विज्ञान व तंत्रज्ञान यांची भारतीयांना ओळख करून देण्यात आली. १८५७ साली कोलकाता, मुंबई, मद्रास (चेन्नई) येथे विद्यापीठांची स्थापना करण्यात आली. पाश्चात्त्य शिक्षण घेतलेल्या मध्यमवर्गाने भारतातील सामाजिक प्रबोधनाच्या चळवळीचे नेतृत्व केले.

## स्वाध्याय

**१. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

(१) पोर्तुगीज, ........... , फ्रेंच, ब्रिटिश हे भारताची बाजारपेठ काबीज करण्याच्या सत्तास्पर्धेत उतरले.
(अ) ऑस्ट्रियन (ब) डच
(क) जर्मन (ड) स्वीडीश

(२) १८०२ मध्ये ......... पेशव्याने इंग्रजांशी तैनाती फौजेचा करार केला.
(अ) थोरले बाजीराव (ब) सवाई माधवराव
(क) पेशवे नानासाहेब (ड) दुसरा बाजीराव

(३) जमशेदजी टाटा यांनी ........... येथे टाटा आयर्न अँड स्टील कंपनीचा पोलाद निर्मितीचा कारखाना स्थापन केला.
(अ) मुंबई (ब) कोलकाता
(क) जमशेदपूर (ड) दिल्ली

**२. पुढील संकल्पना स्पष्ट करा.**

(१) मुलकी नोकरशाही
(२) शेतीचे व्यापारीकरण
(३) इंग्रजांची आर्थिक धोरणे

**३. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

(१) भारतातील शेतकरी कर्जबाजारी झाले.
(२) भारतातील जुन्या उद्योगधंद्यांचा ऱ्हास झाला.

**४. पाठाच्या मदतीने पुढील तक्ता पूर्ण करा.**

| व्यक्ती | कार्ये |
|---|---|
| लॉर्ड कॉर्नवालिस | ......................... |
| ......................... | सतीबंदीचा कायदा केला. |
| लॉर्ड डलहौसी | ......................... |
| ......................... | 'एशियाटिक सोसायटी ऑफ बंगाल'ची स्थापना |

**उपक्रम**

ब्रिटिशांनी केलेल्या प्रशासन, शिक्षण, वाहतूक व दळणवळण यांमधील सुधारणांची सचित्र माहिती तयार करा.

8VUHTJ

# ४. १८५७ चा स्वातंत्र्यलढा

१८५७ साली इंग्रज सत्तेला हादरवून टाकणारा मोठा लढा भारतात झाला. हा लढा काही अचानक उद्‌भवला नाही. त्यापूर्वीही भारतात इंग्रजांविरुद्ध अनेक लढे झाले होते. १८५७ च्या लढ्याची व्याप्ती आणि त्यामागची भूमिका लक्षात घेऊन स्वातंत्र्यवीर सावरकरांनी ज्या पुस्तकातून ही मांडणी केली त्या ‘१८५७ चे स्वातंत्र्यसमर’ या पुस्तकाने पुढे अनेक क्रांतिकारकांना ब्रिटिशांविरुद्ध लढण्याची प्रेरणा दिली.

**१८५७ पूर्वीचे लढे :** भारतात ज्या ज्या भागात इंग्रजांची सत्ता स्थापन झाली, तेथील लोकांना इंग्रज शासनाचे दुष्परिणाम भोगावे लागले. कंपनीच्या सत्तेमुळे आपले सर्व स्तरांतून शोषण होत आहे याची जाणीव भारतीयांच्या मनात निर्माण होऊ लागली आणि या सत्तेविरुद्ध असंतोषही वाढत गेला.

शेतकरी व सामान्य जनता कंपनी सरकारच्या काळात कंगाल झाली. अशातच १७७० मध्ये बंगाल प्रांतात मोठा दुष्काळ पडला. इंग्रजी राज्यकर्त्यांचे जनतेशी वर्तन मात्र उदासीन व संवेदनशून्य राहिले. सन १७६३ ते १८५७ या काळात बंगालमध्ये प्रथम संन्याशांच्या व त्यानंतर फकिरांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी लढे दिले. असेच लढे गुजरात, राजस्थान, महाराष्ट्र व दक्षिण भारततही झाले.



उमाजी नाईक

उमाजी नाईक यांनी दिलेला लढाही असाच उग्र होता. उमाजींनी आपल्या रामोशी बांधवांना व स्थानिक युवकांना संघटित करून इंग्रजांविरुद्ध बंड केले. त्यांनी एक जाहीरनामा काढून इंग्रजांविरुद्ध लढा देण्याचे व इंग्रजी सत्ता झुगारून देण्याचे आवाहन केले. पुणे, सातारा, अहमदनगर, सोलापूर, नाशिक, भोर इत्यादी भागांत त्यांनी आपला दरारा निर्माण केला. १८३२ मध्ये कंपनी सरकारने उमाजी नाईक यांना अटक केली. त्यांना पुणे येथे फाशी देण्यात आले.

भारतातील आदिवासी व वन्य जमातींनीही इंग्रज सत्तेला आव्हान दिले. या जमातींचा उदरनिर्वाह जंगलातील संपत्तीवर होत होता. ब्रिटिशांनी कायद्याने त्यांच्या हक्कांवर गदा आणली. परिणामी बिहार, छोटा नागपूर परिसरातील कोलाम, ओडिशातील गोंड, बिहारमध्ये संथाळ यांनी ब्रिटिशांच्या विरोधात लढे दिले. महाराष्ट्रातील भिल्ल, कोळी, रामोशी यांनी इंग्रजांविरुद्ध लढे दिले. कोल्हापूर परिसरात गडकऱ्यांनी, तर कोकणात फोंड-सावंतांनी इंग्रजी सत्तेला आव्हान दिले. १८५७ सालापूर्वी देशाच्या

**माहीत आहे का तुम्हांला ?**

**पाइकांचा उठाव :** ओडिशात मध्ययुगीन काळापासून पाइक पद्धती अस्तित्वात होती. तिथल्या निरनिराळ्या स्वतंत्र राजांचे जे खडे सैनिक होते, त्यांना ‘पाईक’ असे म्हणत. राजांनी या पाइकांना जमिनी कसण्यास मोफत दिल्या होत्या. त्या कसून ते आपला उदरनिर्वाह करत. त्या बदल्यात युद्धाचा प्रसंग उद्‌भवला तर त्यांनी आपल्या राजांच्या बाजूने लढाईला उभे राहायचे अशी अट होती.

इ.स. १८०३ मध्ये इंग्रजांनी ओडिशा जिंकून घेतले. इंग्रजांनी पाइकांच्या वंशपरंपरागत जमिनी काढून घेतल्या. त्यामुळे पाइक संतापले. तसेच इंग्रजांनी लावलेल्या करांमुळे मिठाच्या किमतीत वाढ होऊन सामान्य लोकांचे जीवन असह्य झाले. याचा परिणाम इ.स.१८१७ मध्ये इंग्रजांविरुद्ध पाइकांनी सशस्त्र उठाव केला. या उठावाचे नेतृत्व बक्षी जगनबंधू विद्याधर यांनी केले.

निरनिराळ्या भागांत काही जमीनदार आणि राजेरजवाड्यांनीही लढे दिले.

ईस्ट इंडिया कंपनीच्या फौजेत अनेक भारतीय सैनिक होते. कंपनीकडून त्यांना दुजाभावाची वागणूक दिली जात असे. त्यांचे वेतन व भत्ते इंग्रजी सैनिकांच्या तुलनेत अत्यंत अल्प होते. १८०६ साली वेल्लोर येथे तर १८२४ साली बराकपूरच्या उठावाने उग्र रूप धारण केले होते.

हे सर्व लढे त्या त्या परिसरात झाले. ते स्थानिक स्वरूपाचे व एकाकी होते. इंग्रजांनी बळाचा उपयोग करून ते मोडून काढले. लोकांचा असंतोष दडपला गेला. पण तो नाहीसा झाला नाही. हा वणवा १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धात भडकला. ब्रिटिश कंपनी सत्तेविरुद्ध अनेक ठिकाणी लढे उभे राहिले. दारूच्या कोठारावर ठिणगी पडावी आणि त्याचा मोठा स्फोट व्हावा अशी अवस्था झाली. भारतातील विविध वर्गांमध्ये साठलेला असंतोष या लढ्याच्या रूपाने बाहेर पडला आणि त्याचा उद्रेक अभूतपूर्व अशा सशस्त्र लढ्याने झाला.

**१८५७ च्या लढ्याची कारणे :** इंग्रजपूर्व काळात भारतात अनेक राजवटी होत्या. त्यामध्ये बदल झाला, तरी गावगाडा पूर्वीसारखा चालू राहिला. इंग्रजांनी मात्र प्रचलित व्यवस्था बदलून नवीन व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला. गावगाड्याचे बदलत असलेले स्वरूप पाहून जनतेच्या मनात अस्थिरता व असुरक्षिततेची भावना निर्माण झाली होती.

**आर्थिक कारणे :** इंग्रजांनी आर्थिक उत्पन्न वाढवण्यासाठी नवीन महसूल पद्धत अमलात आणली. शेतकऱ्यांकडून जबरदस्तीने महसुलाची वसुली केली जायची. पर्यायाने शेतीव्यवस्था कोलमडून पडली. इंग्लंडच्या बाजारपेठेतील माल भारतात खपवून आर्थिक लाभ घेण्याचे ब्रिटिशांचे धोरण होते. त्यांनी येथील उद्योगधंद्यांवर जाचक कर बसवले. भारतात विकसित झालेला हस्तकला व कापड उद्योग दिवाळखोरीत निघाला. अनेक भारतीय कारागीर बेकार झाले. या सर्वांच्या मनात इंग्रजांविरुद्ध असंतोष वाढत गेला.

**सामाजिक कारणे :** इंग्रज आपल्या चालीरिती, परंपरा, रूढी यांत हस्तक्षेप करत आहेत, असे भारतीयांना वाटू लागले. सतीबंदी, विधवाविवाह हे कायदे जरी सामाजिक दृष्टीने योग्य असले, तरी ते आपल्या जीवनपद्धतीमध्ये हस्तक्षेप करत आहेत अशी समजूत भारतीयांनी करून घेतली. त्यामुळे ते असंतुष्ट बनले.

**राजकीय कारणे :** १७५७ पासून इंग्रजांनी अनेक भारतीय राज्ये ताब्यात घेतली होती. पुढे डलहौसीने अनेक संस्थाने विविध कारणांनी खालसा केली. गैरकारभाराचे निमित्त पुढे करून अयोध्येच्या नवाबाला पदच्युत केले, तर सातारा, नागपूर, झाशी ही संस्थाने तेथील राजाचा दत्तकपुत्रांचा वारसा हक्क नामंजूर करून खालसा केली. डलहौसीच्या या धोरणाने भारतीयांमध्ये अविश्वासाचे वातावरण वाढत गेले.

**हिंदी सैनिकांतील असंतोष :** हिंदी सैनिकांना इंग्रज अधिकारी तुच्छतेने वागवत. सैन्यात सुभेदारापेक्षा वरचे पद त्यांना दिले जात नसे. गोऱ्या सैनिकांपेक्षा त्यांचा पगार कमी असे. त्यांना सुरुवातीला दिले जाणारे भत्तेही इंग्रजांनी हळूहळू कमी केले. अशा अनेक कारणांमुळे हिंदी सैनिकांत असंतोष वाढत गेला.

**तात्कालिक कारण :** ब्रिटिशांनी १८५६ साली हिंदी सैनिकांना लांब पल्ल्याच्या एन्फिल्ड बंदुका दिल्या. त्यात वापरण्यासाठी नवी काडतुसे दिली. त्या काडतुसांवरील आवरण दाताने तोडावे लागे. या आवरणाला गाईची व डुकराची चरबी लावलेली असते अशी बातमी चहूकडे पसरली. यामुळे हिंदू व मुस्लीम सैनिकांच्या धार्मिक भावना दुखावल्या व सैनिकांमध्ये असंतोष निर्माण झाला.

**वणवा पेटला :** चरबी लावलेली काडतुसे वापरण्यास ज्या सैनिकांनी विरोध केला त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई झाली व त्या सैनिकांना जबर शिक्षा करण्यात आल्या. बराकपूरच्या छावणीतील



मंगल पांडे

मंगल पांडे यांनी इंग्रज अधिकाऱ्याच्या अन्यायी वृत्तीला विरोध करण्याच्या भावनेने ब्रिटिश अधिकाऱ्यावर गोळी झाडली. मंगल पांडे यांना अटक करून फाशी देण्यात आली. ही बातमी वणव्यासारखी चहूकडे पसरली. मेरठ छावणीतील हिंदी सैनिकांची पूर्ण पलटणच बंड करून उठली. सैनिक दिल्लीच्या रोखाने निघाले. वाटेत हजारो नागरिक उत्स्फूर्तपणे त्यांना मिळत गेले. १२ मे १८५७ रोजी सैनिकांनी दिल्लीचा ताबा घेतला. त्यांनी मुघल बादशाह बहादुरशाह यांच्याकडे लढ्याचे नेतृत्व दिले. भारताचा सम्राट म्हणून त्यांच्या नावाने द्वाही फिरवण्यात आली.

**लढ्याची व्याप्ती :** दिल्ली ताब्यात येताच सैनिकांचा आत्मविश्वास वाढला. भारतात इतर ठिकाणी असणाऱ्या सैनिकांनाही यामुळे प्रेरणा मिळाली. लवकरच उठावाचे लोण उत्तर भारतामध्ये पसरले. बिहारपासून राजपुतान्यापर्यंत इंग्रज छावण्यातील हिंदी सैनिकांनी बंडाचे निशाण उभारले. लखनौ, अलाहाबाद, कानपूर, बनारस, बरेली, झाशी या ठिकाणी उठावास प्रारंभ झाला. पुढे हे लोण दक्षिण भारतातही पसरले. नागपूर, सातारा, कोल्हापूर, नरगुंद अशा ठिकाणी उठाव झाले. सातारा छत्रपतींचे वारसदार शहाजी प्रतापसिंह व कारभारी रंगो बापूजी, कोल्हापूरचे चिमासाहेब, नरगुंदचे बाबासाहेब भावे, अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेरजवळील भागोजी नाईक इत्यादी या लढ्यात अग्रभागी होते. नाशिक जिल्ह्यातील पेठ, सुरगाण्याच्या राणीसारख्या स्त्रियाही त्यात सामील झाल्या. १८५७ साली खानदेशात कजारसिंग यांच्या नेतृत्वाखाली भिल्लांनी उठाव केला, तर सातपुडा परिसरात शंकरशहांनी लढ्याचे नेतृत्व केले. खानदेशातील उठावात चारशे भिल्ल स्त्रिया सहभागी झाल्या होत्या.

**लढ्याचे नेतृत्व :** १८ व्या शतकात मुघल साम्राज्य दुबळे झाल्यानंतर नादिरशाह, अब्दालीसारख्या परकीयांनी हिंदुस्थानवर आक्रमण करावयास सुरुवात केली. मुघल साम्राज्य त्यांना प्रतिकार करू शकत नाही हे लक्षात आल्यावर मराठ्यांनी परकीय आक्रमणापासून हिंदुस्थानच्या रक्षणाची जबाबदारी आपल्या शिरावर घेतली. त्याच भूमिकेतून मराठे अब्दालीविरुद्ध पानिपतावर लढले. १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्यात मुघल साम्राज्याचा वारसदार बहादुरशाह इंग्रजांविरुद्ध लढण्यास असमर्थ आहे. हे लक्षात आल्यानंतर बहादुरशाहाचे नेतृत्व मान्य करून नानासाहेब पेशवे, झाशीची राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे यांनी १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्याची सूत्रे आपल्या हातात घेतली. याचाच परिणाम या स्वातंत्र्यलढ्यात हिंदू-मुस्लीम बांधवांचे ऐक्य झाल्याचे दिसून येते. मौलवी अहमद उल्ला, कुंवरसिंह, मुघल सेनापती बख्तखान, बेगम



नानासाहेब पेशवे



तात्यासाहेब टोपे



राणी लक्ष्मीबाई



बेगम हजरत महल



कुंवरसिंह




हजरत महल यांनी विविध ठिकाणी उठावाचे नेतृत्व केले. दिल्ली, कानपूर, लखनौ, झाशी तसेच पश्चिम बिहारमधील उठावाचे स्वरूप विशेष उग्र होते.

**बीमोड :** भारतीय इंग्रजांशी प्राणपणाने लढले. यांमध्ये सैनिक, जमीनदार, राजे, सेनापती व जनताही होती. हिंदी सैनिकांच्या नियोजित वेळेपूर्वीच उठाव सुरू झाला. सुरुवातीला हिंदी सैनिकांना यश मिळत गेले. परंतु इंग्रजी सत्तेची सैन्य संख्या व प्रशासकीय ताकद मोठी होती. इंग्रजांनीही उठावाचा बीमोड साम, दाम, दंड, भेद या नीतीप्रमाणे केला. या धक्क्यातून इंग्रजी सत्ता लवकरच सावरली आणि त्यांनी पुढील सहा महिन्यांतच गेलेली ठिकाणे परत मिळवली. राणी लक्ष्मीबाई, कुंवरसिंह, अहमदउल्ला हे धारातीर्थी पडले. बहादुरशाह यांना रंगून येथे कारावासात ठेवण्यात आले. नानासाहेब व बेगम हजरत महल यांनी नेपाळमध्ये आश्रय घेतला, तर तात्या टोपे दहा महिने इंग्रजांशी लढत राहिले. पण फितुरीमुळे ते सापडले. त्यांना फासावर जावे लागले. अशा रीतीने सन १८५८ च्या अखेरीपर्यंत इंग्रजांनी हा लढा कठोरपणे दडपून टाकला.



बहादुरशाह

जरी लढ्याची सुरुवात हिंदी सैनिकांच्या असंतोषातून झाली असली तरी पुढे शेतकरी, कारागीर, सामान्य जनता, आदिवासी इंग्रजांच्या विरोधात एकत्र आले. या अन्यायकारी राजवटीचा पाडाव करण्यासाठी सर्व भारतीयांनी हा संग्राम केला. या लढ्यात हिंदू, मुसलमान, विविध जाती-जमातींचे लोक मोठ्या ताकदीने उभे राहिले. इंग्रजांचे भारतातून उच्चाटन करणे हे सर्वांचे समान ध्येय होते. या पाठीमागे स्वातंत्र्याची प्रेरणा होती म्हणूनच या लढ्याला व्यापक राष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले.

**लढा अयशस्वी होण्याची कारणे :** १८५७ चा लढा खालील कारणामुळे अयशस्वी झाला.

- **लढ्याचा प्रसार भारतभर झाला नाही :** हा लढा संपूर्ण भारतात एकाच वेळी झाला नाही. उत्तर भारतात लढ्याची तीव्रता अधिक होती. उत्तरेकडेही राजपूताना, पंजाब, बंगालचा काही भाग, ईशान्य भारत हे प्रदेश लढ्यापासून अलिप्त राहिले.

- **सर्वमान्य नेत्याचा अभाव :** लढ्यात भारतीय पातळीवर इंग्रजांच्या विरोधात सर्वमान्य नेतृत्व निर्माण होऊ शकले नाही, त्यामुळे इंग्रज विरोधात एकसंधपणा आला नाही.

- **राजे-रजवाड्यांच्या पाठिंब्याचा अभाव :** इंग्रजी सत्तेचा त्रास जसा जनतेला होत होता तसाच तो संस्थानिकांनाही होत होता. त्यांपैकी काही सोडले तर इतर इंग्रजाशी एकनिष्ठ राहिले.

- **लष्करी डावपेचांचा अभाव :** भारतीय सैनिकांकडे शौर्य होते, परंतु योग्य वेळी योग्य डावपेच त्यांना आखता आले नाहीत. दिल्ली जिंकल्यानंतर ती टिकवता आली नाही. तसेच उठावकऱ्यांजवळ पुरेशी शस्त्रास्त्रे नव्हती. इंग्रजांकडे मोठी आर्थिक ताकद, शिस्तबद्ध सैन्य, अद्ययावत शस्त्रास्त्रे व अनुभवी सेनानी होते. दळणवळणाचा ताबा त्यांच्याच हातात असल्यामुळे त्यांच्या हालचाली जलद होत. यामुळेच भारतीय सैनिकांचा त्यांच्यापुढे निभाव लागला नाही. लढाया या केवळ शौर्यावर नाही तर लष्करी डावपेचांनीही जिंकाव्या लागतात.

- **आंतरराष्ट्रीय परिस्थिती इंग्रजांना अनुकूल :** इंग्रजांचे रशियाशी सुरू असलेले क्रिमियन युद्ध नुकतेच संपले होते. यामध्ये इंग्रजांचा विजय झाला होता. जगातील अनेक देशांशी त्यांचा व्यापार होता. इंग्रजांची आरमारी ताकद मोठी होती. याउलट उठावकऱ्यांची परिस्थिती होती.

## स्वातंत्र्यलढ्याचे परिणाम

**ईस्ट इंडिया कंपनीची राजवट संपली :** कंपनीच्या सत्तेमुळे भारतीयांच्या असंतोषात भर पडत गेली व त्यामुळेच इंग्रजी सत्तेपुढे १८५७ च्या लढ्याचे आव्हान उभे राहिले. याची जाणीव इंग्लंडच्या राणीला झाली. भारतातील इंग्रजी सत्ता कंपनीच्या हाती सुरक्षित नाही, असे वाटल्यामुळे १८५८ साली ब्रिटिश पार्लमेंटने कायदा करून ईस्ट इंडिया कंपनीची राजवट बरखास्त केली. गव्हर्नर जनरल हे पद जाऊन व्हाईसरॉय हे पद निर्माण करण्यात आले. लॉर्ड कॅनिंग हा शेवटचा गव्हर्नर जनरल व पहिला व्हाईसरॉय ठरला. तसेच भारताविषयी कारभार करण्यासाठी भारतमंत्री हे पद इंग्लंडच्या शासनात निर्माण करण्यात आले.

**राणीचा जाहीरनामा :** इंग्लंडची राणी व्हिक्टोरिया हिने भारतीयांना उद्देशून एक जाहीरनामा काढला. सर्व भारतीय आमचे प्रजाजन आहेत. वंश, धर्म, जात किंवा जन्मस्थान यावरून प्रजाजनात भेद करणार नाही. शासकीय नोकऱ्या देताना गुणवत्तेवर दिल्या जातील. धार्मिक बाबतीत कसलाही हस्तक्षेप करणार नाही. संस्थानिकांशी केलेले करार पाळले जातील. तसेच ती कोणत्याही कारणासाठी खालसा केली जाणार नाहीत, अशी ग्वाही या जाहीरनाम्यात देण्यात आली.

**भारतीय लष्कराची पुनर्रचना :** लष्करातील

इंग्रजी सैन्याचे प्रमाण वाढवण्यात आले. महत्त्वाच्या ठिकाणी इंग्रज अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्यात आल्या. तोफखाना हा पूर्णपणे इंग्रज अधिकाऱ्यांच्या ताब्यात ठेवण्यात आला. लष्करी तुकड्यांची जातवार विभागणी करण्यात आली. भारतीय सैनिक एकत्र येऊन इंग्रजी सत्तेच्या विरोधात उठाव करणार नाहीत अशी काळजी घेण्यात आली.

**धोरणात्मक बदल :** भारतीयांच्या सामाजिक व धार्मिक बाबतीत हस्तक्षेप न करण्याचे धोरण इंग्रजांनी स्वीकारले. त्याचबरोबर भारतीय समाज सामाजिक दृष्टीने एकसंध होणार नाही अशी काळजी घ्यायला सुरुवात केली. भारतीयांमध्ये जात, धर्म, वंश, प्रदेश या कारणांवरून नेहमी संघर्ष निर्माण होतील, एकमेकांविषयी भारतीयांची मने कलुषित होतील हे धोरण राबवले जाऊ लागले. 'फोडा आणि राज्य करा' हेच इंग्रजी राज्याचे सूत्र राहिले.

१८५७ च्या स्वातंत्र्यलढ्यामुळे इंग्रजी राज्यसत्तेला संघटित विरोध केला पाहिजे, असे भारतीयांना वाटू लागले. १८५७ चा स्वातंत्र्यलढा हा भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचे प्रेरणास्रोत ठरला.

## स्वाध्याय

**१. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

(उमाजी नाईक, स्वातंत्र्यसमर, लॉर्ड डलहौसी, भारतमंत्री, तात्या टोपे)

(१) स्वातंत्र्यवीर सावरकरांनी १८५७ च्या लढ्याला .......... हे नाव दिले.

(२) रामोशी बांधवांना संघटित करून .......... यांनी इंग्रजांविरुद्ध बंड केले.

(३) १८५७ च्या लढ्यानंतर भारताविषयी कारभार करण्यासाठी .......... हे पद इंग्लंडच्या शासनात निर्माण करण्यात आले.

(४) भारतातील संस्थाने ........... या गव्हर्नर जनरलने खालसा केली.

**२. पुढीलपैकी विधाने सकारण स्पष्ट करा.**

(१) इंग्रजांविरुद्ध पाइकांनी सशस्त्र उठाव केला.

(२) हिंदू व मुस्लीम सैनिकांमध्ये असंतोष निर्माण झाला.

(३) भारतीय सैनिकांचा इंग्रज सैन्यापुढे निभाव लागला नाही.

(४) स्वातंत्र्यलढ्यानंतर भारतीय लष्करी तुकड्यांची जातवार विभागणी करण्यात आली.

(५) इंग्रजांनी भारतीय उद्योगधंद्यांवर जाचक कर बसवले.

**३. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्यामागे कोणती सामाजिक कारणे होती ?

(२) १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्यात भारतीयांना अपयश का आले ?

(३) १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्याचे परिणाम लिहा.

(४) १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्यानंतर इंग्रजांनी कोणते धोरणात्मक बदल केले ?

**उपक्रम**

(१) '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' हे स्वातंत्र्यवीर सावरकरांनी लिहिलेले पुस्तक मिळवा आणि वाचा.

(२) भारताच्या नकाशा आराखड्यात १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्याची ठिकाणे दर्शवा.

8H4IV7

# ५. सामाजिक व धार्मिक प्रबोधन

इंग्रजी शिक्षणाच्या प्रसाराबरोबर नवे विचार, नवीन कल्पना, नवीन तत्त्वज्ञान यांचा प्रसार झाला. तसेच पाश्चिमात्य विचार, संस्कृती याची भारतीयांना ओळख झाली. यामुळे भारतीय समाजाच्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक अशा सर्वच क्षेत्रांत बदल झाले.


भारतीय समाजाचे मागासलेपण त्यांच्या अंधश्रद्धा, रूढिप्रियता, जातिभेद, उच्च-नीचतेच्या भ्रामक कल्पना, चौकस व चिकित्सक वृत्तीचा अभाव यांत आहे, याची जाणीव सुशिक्षित समाजाला होऊ लागली. देश प्रगतिपथावर नेण्यासाठी भारतीय समाजातील दोष व अनिष्ट प्रवृत्तींचे निर्मूलन करून मानवता, समता, बंधुता या तत्त्वांवर आधारित नवसमाज निर्माण करण्याची आवश्यकता होती. भारतीय समाजातील विविध प्रश्न दूर करण्यासाठी सुशिक्षित विचारवंत आपल्या लेखणीद्वारे जनजागृती करू लागले. तत्कालीन भारतात सुरू झालेल्या या वैचारिक जागृतीला 'भारतीय प्रबोधन' असे म्हणतात.

## धर्मसुधारणा व समाजसुधारणेचे पर्व

**ब्राह्मो समाज :** राजा राममोहन रॉय यांनी इ.स.१८२८ मध्ये बंगाल प्रांतात ब्राह्मो समाजाची स्थापना केली. त्यांनी अनेक भाषा व धर्मांचा अभ्यास केला होता. यातूनच त्यांची अद्वैतवादी विचारसरणी विकसित झाली. एकेश्वरवाद, उच्च-नीच असा भेदभाव न पाळणे, कर्मकांडास विरोध, प्रार्थनेचा मार्ग अनुसरणे ही ब्राह्मो समाजाची तत्त्वे होती. राजा राममोहन रॉय यांनी सती प्रथा, बालविवाह, पडदा पद्धती यांना विरोध केला. विधवा विवाह, स्त्रियांचे शिक्षण याचे समर्थन केले. कोलकाता येथे हिंदू कॉलेजची स्थापना केली. त्याचप्रमाणे 'संवाद कौमुदी' या वृत्तपत्राद्वारे जनजागृती केली.


राजा राममोहन रॉय

**प्रार्थना समाज :** दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनी इ.स.१८४८ साली मुंबई येथे परमहंस सभेची स्थापना केली. पुढे परमहंस सभा विसर्जित झाल्यानंतर तिच्याच काही सभासदांनी प्रार्थना समाज स्थापन केला. दादोबांचे बंधू डॉ.आत्माराम पांडुरंग हे प्रार्थना समाजाचे पहिले अध्यक्ष होते. या संस्थेस मुंबई विद्यापीठातील तरुण पदवीधर मिळाल्यामुळे त्याची प्रतिष्ठा वाढली.


दादोबा पांडुरंग तर्खडकर

न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, डॉ. रा. गो. भांडारकर यांनी प्रार्थना समाजाचे कार्य पुढे चालवले. मूर्तिपूजेला विरोध, एकेश्वरवाद, कर्मकांडाला विरोध ही प्रार्थना समाजाची तत्त्वे होती. उपासना व प्रार्थनेवर त्यांचा भर होता. प्रार्थना समाजाने सामाजिक सुधारणेसाठी अनाथालये, स्त्री शिक्षणसंस्था, कामगारांसाठी रात्रशाळा, दलितांसाठी संस्था सुरू केल्या. प्रार्थना समाजाचे सदस्य महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन' स्थापन करून त्या माध्यमातून सामाजिक समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला.

**सत्यशोधक समाज :** महात्मा जोतीराव फुले यांनी इ.स.१८७३ मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना केली. समतेच्या तत्त्वावर आधारित समाजनिर्मितीसाठी सत्यशोधक समाजाने कार्य केले. त्यांनी स्पृश्यास्पृश्यतेला विरोध केला. त्याचबरोबर बहुजन समाजाच्या शिक्षणाचा पुरस्कार,

स्त्री-शिक्षणाचा पुरस्कार केला. महात्मा जोतीराव फुले यांनी 'ब्राह्मणांचे कसब', 'गुलामगिरी', 'शेतकऱ्याचा आसूड', 'सार्वजनिक सत्यधर्म' अशा पुस्तकांच्या माध्यमातून समाज प्रबोधन केले. स्त्री-पुरुष अथवा माणसा-माणसांमध्ये भेद निर्माण करणाऱ्या चालीरितींवर कडक टीका केली.


महात्मा जोतीराव फुले

**आर्य समाज :** स्वामी दयानंद सरस्वती यांनी इ.स. १८७५ मध्ये आर्य समाजाची स्थापना केली. 'सत्यार्थ प्रकाश' हा वेदांवर भाष्य करणारा ग्रंथ लिहिला. प्राचीन वैदिक धर्म हाच खरा धर्म असून त्यात जातीपातींना स्थान नव्हते. स्त्री-पुरुष समानता होती, असे प्रतिपादन केले. 'वेदांकडे परत चला' असे आर्य समाजाचे ब्रीदवाक्य होते. आर्य समाजाच्या भारतभर शाखा उघडल्या. आर्य समाजाच्या माध्यमातून ठिकठिकाणी शिक्षण संस्था उघडल्या.


स्वामी दयानंद सरस्वती

**रामकृष्ण मिशन :** रामकृष्ण परमहंस यांचे शिष्य स्वामी विवेकानंद यांनी इ.स.१८९७ मध्ये रामकृष्ण मिशनची स्थापना केली. रामकृष्ण मिशनने लोकसेवेची कार्ये केली. दुष्काळग्रस्तांना मदत, रोगी, दीनदुबळ्यांना औषधोपचार, स्त्रीशिक्षण, आध्यात्मिक उन्नती या क्षेत्रांत मिशनने कार्य केले व आजही करत आहे. स्वामी विवेकानंद उत्तम वक्ते होते. त्यांनी इ.स.१८९३ मध्ये अमेरिकेतील शिकागो येथील विश्वधर्म परिषदेत हिंदू धर्माचे प्रतिनिधित्व केले. भारतातील तरुणांना 'उठा, जागे व्हा व ध्येय प्राप्त होईपर्यंत थांबू नका' हा संदेश त्यांनी दिला.


स्वामी विवेकानंद

**शीख समाजातील सुधारणा :** शिखांमधील धर्मसुधारणेसाठी अमृतसर येथे 'सिंगसभा' स्थापन झाली. या संस्थेने शीख समाजात शिक्षणप्रसार व आधुनिकीकरण घडवून आणले. पुढे 'अकाली चळवळी'ने शीख समाजातील सुधारणावादी परंपरा चालू ठेवली.

**स्त्रीविषयक सुधारणा :** ब्रिटिश सत्तेचा भारतात विस्तार झाला, त्याकाळात भारतातील स्त्रियांची परिस्थिती दयनीय होती. त्यांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. समानतेची वागणूक दिली जात नव्हती. बालविवाह, जरठ-कुमारी विवाह, हुंडा पद्धती, सती प्रथा, केशवपन, विधवा विवाहास विरोध अशा प्रथा समाजात होत्या. तत्कालीन गव्हर्नर लॉर्ड बेंटिंक याला सतीबंदीचा कायदा करण्यासाठी राजा राममोहन रॉय यांसारख्या समाजसुधारकांनी मदत केली. गोपाळ हरी देशमुख उर्फ लोकहितवादी यांनी शतपत्रातून स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार केला.



गोपाळ हरी देशमुख

१८४८ मध्ये महात्मा फुले यांनी पुणे येथील भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा काढली. त्यात त्यांना त्यांच्या पत्नी सावित्रीबाई यांची साथ लाभली. समाजातील कर्मठ लोकांनी केलेली टीका, निंदा पत्करूनही सावित्रीबाईंनी शिक्षणाचे कार्य सुरू ठेवले. महात्मा फुले यांनी स्वतःच्या घरात बालहत्या प्रतिबंधक गृह स्थापन केले. केशवपनाची पद्धत बंद व्हावी


सावित्रीबाई फुले

म्हणून नाभिकांचा संप घडवून आणला.

विधवांच्या पुनर्विवाहाला मान्यता मिळवून देण्यासाठी पं. ईश्वरचंद्र विद्यासागर, विष्णुशास्त्री पंडित व वीरेशलिंगम पंतलु यांनी विशेष प्रयत्न केले. गोपाळ गणेश आगरकर यांनी आपल्या सुधारक या वृत्तपत्रातून बालविवाह, संमतीवयाचा कायदा यावर परखड मते मांडली. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी मुंबई येथे देवदासी प्रथेविरुद्ध परिषद भरवली. ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री-पुरुष तुलना' या ग्रंथातून अत्यंत जहाल भाषेत स्त्रियांच्या हक्कांचा पुरस्कार केला. महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी पुण्यात 'अनाथ बालिकाश्रम' सुरू केला. विधवा, परित्यक्ता यांच्यासह सर्वच महिलांना शिक्षण घेऊन पायावर उभे राहता यावे हा त्यांचा हेतू होता. त्यांच्या प्रयत्नांमधूनच विसाव्या शतकातील भारतातील पहिले महिला विद्यापीठ उभे राहिले. पंडिता रमाबाईंनी 'शारदाश्रम' संस्थेची स्थापना करून दिव्यांग मुले, मुली, स्त्रिया यांच्या पालनपोषणाची जबाबदारी स्वीकारली. रमाबाई रानडे यांनी 'सेवासदन' संस्थेच्या माध्यमातून स्त्रियांसाठी परिचारिका अभ्यासक्रम सुरू केला. त्यांनी स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळावा म्हणून सरकारकडे मागणी केली. स्त्रियांवरील अन्यायाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या लेखनातून वाचा फोडली. महात्मा गांधींनी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला. स्त्रियांनी स्वातंत्र्य चळवळी दरम्यान मोलाचे योगदान दिले आहे.



वीरेशलिंगम पंतलु



महर्षी धोंडो केशव कर्वे


स्त्री सुधारणा चळवळींमुळे समाजातील अन्यायकारक प्रथा बंद पडण्यास मदत झाली. स्त्रियांच्या प्रश्नांना वाचा फुटली. स्त्रिया स्वतःचे विचार लेखनातून मांडू लागल्या. शिक्षणामुळे जीवनाच्या सर्व क्षेत्रांत त्यांचे कर्तृत्व फुलून यायला लागले.

**जरा विचार करा –**

- समाज सुधारकांनी स्त्री शिक्षणाची सुरुवात केली नसती तर?
- वर्तमानकाळात स्त्रियांच्या जीवनात शिक्षणामुळे कोणते परिवर्तन घडून आले आहे ?
- आजही स्त्री शिक्षणासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे असे तुम्हांला वाटते का ? जर होय, तर कोणते प्रयत्न करायला हवेत?

**मुस्लीम समाजातील सुधारणा चळवळ :** अब्दुल लतीफ यांनी मुस्लीम समाजातील धर्मसुधारणेला सुरुवात केली. त्यांनी बंगाल प्रांतात 'द मोहम्मदन लिटररी सोसायटी' या संस्थेची स्थापना केली.

सर सय्यद अहमद खान यांनी 'मोहम्मदन अँग्लो-ओरिएंटल कॉलेज' स्थापन केले. पुढे याचेच अलिगढ मुस्लीम विद्यापीठात रूपांतर झाले. त्यांनी पाश्चिमात्य विज्ञान व तंत्रज्ञानाचा पुरस्कार केला. पाश्चात्त्य शिक्षण आणि विज्ञान यांचा अंगीकार मुस्लीम समाजाने केल्याशिवाय त्याची प्रगती होणार नाही, असे त्यांचे ठाम मत होते.



सर सय्यद अहमद खान

**हिंदू समाजातील चळवळ :** हिंदू समाजाला सन्मानाचे स्थान मिळावे म्हणून १९१५ साली 'हिंदूमहासभा' या संघटनेची स्थापना झाली. पं. मदन मोहन मालवीय यांनी 'बनारस हिंदू विद्यापीठा'ची पायाभरणी केली. डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी १९२५ साली 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघा'ची नागपूर येथे स्थापना केली. हिंदुत्ववादी तरुणांची शिस्तबद्ध व चारित्र्यसंपन्न संघटना उभारणे हे त्यांचे ध्येय होते.

स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर यांनी रत्नागिरी येथे हिंदू धर्मातील सर्व जातींना मुक्त प्रवेश असणाऱ्या पतित पावन मंदिराची निर्मिती केली. सहभोजनादी कार्यक्रम राबवले.



डॉ.केशव बळीराम हेडगेवार

आधुनिक भारताच्या इतिहासात प्रबोधनाचा हा आविष्कार महत्वाचा आहे. स्वातंत्र्य, समता, राष्ट्रवाद या कल्पनांनी भारलेल्या सुधारकांनी राजकीय क्षेत्रात राष्ट्रव्यापी चळवळ उभी केली. तिचा अभ्यास आपण पुढील पाठात करणार आहोत.

### माहीत आहे का तुम्हांला ?

**प्रबोधनाचे इतर क्षेत्रांमधील आविष्कार :** सुधारणेच्या चळवळींप्रमाणेच प्रबोधनकाळात साहित्य, कला, विज्ञान यांसारख्या क्षेत्रांमध्ये घडून आलेली प्रगती महत्वाची होती. साहित्याच्या क्षेत्रात गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांना तर विज्ञानाच्या क्षेत्रात सी.व्ही. रामन यांना नोबेल पारितोषिक मिळाले. त्यावरून भारताच्या प्रगतीची कल्पना येते. अशा प्रगतीमुळे आधुनिक भारताची जडणघडण झाली. कथा–कादंबऱ्यांमधून स्वातंत्र्याची प्रेरणा मिळू लागली. समाजसुधारणेचा विचारही व्यक्त होऊ लागला.

या काळात स्त्रिया लेखन करू लागल्या. नवी वृत्तपत्रे व मासिके ही समाजसुधारणा व राजकीय जागृतीची वाहक ठरली.

कलेच्या क्षेत्रातही या काळात प्रगती झाली. संगीत अधिक लोकाभिमुख होऊ लागले. भारतीय शैली आणि पाश्चात्त्य तंत्रे यांचा मेळ घालून नवीन चित्रकला पुढे आली.

विज्ञानाविषयी अनेक ग्रंथ लिहिले जाऊ लागले. भारताच्या प्रगतीसाठी प्रयोगशीलता व वैज्ञानिक दृष्टीचे महत्त्व लोकांना उमगू लागले.

## स्वाध्याय

**१. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

(सर सय्यद अहमद खान, स्वामी विवेकानंद, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे)

(१) रामकृष्ण मिशनची स्थापना .......... यांनी केली.

(२) मोहम्मदन अँग्लो ओरिएंटल कॉलेजची स्थापना .......... यांनी केली.

(३) डिप्रेस्ड क्लासेस मिशनची स्थापना .......... यांनी केली.

**२. पुढील तक्ता पूर्ण करा.**

| समाजसुधारकाचे नाव | संस्था | वृत्तपत्र/ पुस्तक | संस्थेची कार्ये |
|---|---|---|---|
| राजा राममोहन रॉय | .......... | संवादकौमुदी | ........ |
| ............. | आर्यसमाज | ........... | ........ |
| महात्मा फुले | ........... | गुलामगिरी | ........ |

**३. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

(१) भारतात सामाजिक, धार्मिक परिवर्तनाच्या चळवळी सुरू झाल्या.

(२) महात्मा फुले यांनी नाभिकांचा संप घडवून आणला.

**४. टीपा लिहा.**

(१) रामकृष्ण मिशन

(२) सावित्रीबाई फुले यांच्या स्त्रीविषयक सुधारणा

**उपक्रम**

(१) 'स्त्रीशिक्षण' या विषयावर शाळेत निबंध स्पर्धा आयोजित करा.

(२) समाज सुधारकांच्या छायाचित्रांचा संग्रह करा.

8HDEMU

# ६. स्वातंत्र्य चळवळीच्या युगास प्रारंभ

इंग्रजी शिक्षणाचे भारतीय समाजजीवनावर संमिश्र परिणाम झाले. नवसुशिक्षित समाजाने घडवून आणलेल्या प्रबोधनामुळे राष्ट्रीयत्वाच्या भावनेचे बीजारोपण झाले. भारताच्या विविध भागांतील चळवळीमुळे वेगवेगळ्या प्रांतांतील राजकीय संस्थांचे एकसूत्रीकरण करणे, राजकीयदृष्ट्या जागृत असलेल्या विविध गटांना आणि व्यक्तींना एकत्र आणणे आणि राष्ट्राच्या हिताच्या प्रश्नांकडे लोकांचे लक्ष वेधून राष्ट्राच्या आकांक्षा प्रकट करणे यासाठी एक अखिल भारतीय स्तरावरील राजकीय संघटना उभी करण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली.

**ब्रिटिश राजवटीतील प्रशासकीय केंद्रीकरण :** ब्रिटिश प्रशासनामुळे भारतात खऱ्या अर्थाने एकछत्री अंमल सुरू झाला. देशभर समान धोरणे, सर्वांना कायद्यासमोर समान दर्जा यामुळे लोकांमध्ये एकराष्ट्रीयत्वाची भावना विकसित झाली. ब्रिटिशांनी आपल्या प्रशासनाच्या सोईसाठी व लष्कराच्या जलद हालचालींसाठी रेल्वे, रस्ते यांचे जाळे उभारले. परंतु या भौतिक सुविधांचा भारतीयांनाही फायदा झाला. भारताच्या विविध प्रांतांतील लोकांचा परस्परांशी अधिक संबंध येऊन त्यांच्यामधील संवाद वाढला व राष्ट्रभावना वाढीला लागली.

**आर्थिक शोषण :** भारताच्या संपत्तीचा ओघ अनेक मार्गांनी इंग्लंडकडे सुरू झाला. इंग्लंडच्या साम्राज्यवादी धोरणामुळे भारताचे आर्थिक शोषण होऊ लागले. शेतकऱ्यांना सक्तीने नगदी पिके घ्यावयास लावणे, शेतसाऱ्याचे ओझे, सततचे दुष्काळ यांमुळे भारतीय शेतीचा कणा मोडला. पारंपरिक उदयोगधंद्यांचा ऱ्हास झाल्याने बेकारी वाढली. भांडवलदारांकडून कामगार वर्गाचे शोषण होत होते. मध्यम वर्गावर नवनवे कर लादले. यामुळे लोकांच्या मनात असंतोष खदखदत होता.

**पाश्चात्त्य शिक्षण :** पाश्चात्त्य शिक्षणाच्या प्रसारामुळे न्याय, स्वातंत्र्य, समता, लोकशाही अशा नव्या कल्पनांची भारतीयांना ओळख झाली. बुद्धिनिष्ठा, विज्ञाननिष्ठा, मानवता, राष्ट्रवाद अशी मूल्ये भारतीयांनी आत्मसात केली. त्यामुळे आपल्या देशाचा कारभार करण्यासाठी आपण सक्षम असून या मूल्यांच्या आधारावर आपल्या देशाची उन्नती साधावी अशी भावना रुजू लागली. इंग्रजी भाषेमुळे भाषिक विविधतेने संपन्न असलेल्या भारताला संपर्काचे एक नवे माध्यम मिळाले.

**भारताच्या प्राचीन इतिहासाचा अभ्यास :**



डॉ.भाऊ दाजी लाड

कोलकाता येथे ब्रिटिशांनी 'एशियाटिक सोसायटी'ची स्थापना केली. अनेक भारतीय व पाश्चिमात्त्य विद्वानांनी भारतीय संस्कृतीचा अभ्यास सुरू केला. संस्कृत, फारसी आणि अन्य भारतीय भाषांमधील हस्तलिखिते तपासून त्यावरील संशोधने प्रसिद्ध केली. डॉ. भाऊ दाजी लाड, डॉ. रा.गो. भांडारकर अशा काही भारतीय विद्वानांनी प्राचीन भारतीय संस्कृतीचा सखोल अभ्यास केला. आपल्याला प्राचीन समृद्ध वारसा लाभला आहे हे समजल्याने भारतीयांची अस्मिता जागृत झाली. पुणे येथे 'भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर' ही संस्था गेल्या शंभर वर्षांपासून कार्यरत आहे.



डॉ. रा.गो. भांडारकर

**वृत्तपत्रांचे कार्य :** याच काळात इंग्रजी व प्रादेशिक भाषांमधून वृत्तपत्रे व नियतकालिके प्रसिद्ध होऊ लागली. या वृत्तपत्रांमधून राजकीय व सामाजिक

जागृती होऊ लागली. दर्पण, प्रभाकर, हिंदू, अमृत बझार पत्रिका, केसरी, मराठा अशा वृत्तपत्रांतून सरकारच्या धोरणावर टीका होऊ लागली.


व्योमेशचंद्र बॅनर्जी

**भारतीय राष्ट्रीय सभेची स्थापना :** २८ डिसेंबर १८८५ रोजी मुंबईतील गोकुळदास तेजपाल संस्कृत पाठशाळेत राष्ट्रीय सभेचे पहिले अधिवेशन भरवण्यात आले. भारतातील विविध प्रांतांतील ७२ प्रतिनिधी या अधिवेशनासाठी आले होते. कोलकाता येथील नामवंत वकील व्योमेशचंद्र बॅनर्जी हे या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. या सर्वांनी मिळून याच सभेत भारतीय राष्ट्रीय सभेची (इंडियन नॅशनल काँग्रेस) स्थापना केली. ॲलन ऑक्टेव्हिअन ह्यूम या ब्रिटिश अधिकाऱ्यानेही राष्ट्रीय सभेच्या स्थापनेत पुढाकार घेतला. भारतीयांना प्रशासनात अधिक प्रतिनिधित्व मिळावे, ब्रिटिश शासनाने लष्करी खर्चात कपात करावी, अशा मागण्यांची निवेदने ब्रिटिश सरकारकडे पाठवण्यात आली.

**राष्ट्रीय सभेची उद्‌दिष्टे :** भारताच्या निरनिराळ्या भागांतील लोकांना धर्म, वंश, जात, भाषा, भौगोलिक प्रदेश असे भेद विसरून एका व्यासपीठावर आणणे, परस्परांच्या समस्या जाणून घेऊन विचारविमर्श करणे, लोकांमध्ये ऐक्यभावना वृद्‌धिंगत करणे, राष्ट्राच्या उन्नतीसाठी प्रयत्न करणे ही राष्ट्रीय सभेची उद्‌दिष्टे होती.

**मवाळ युग (१८८५ ते १९०५) :** राष्ट्रीय सभेच्या स्थापनेनंतरच्या सुरुवातीच्या दशकात त्यांचे कार्य संथपणे पण सातत्याने सुरू होते. राष्ट्रीय सभेचे नेते वास्तववादी व उच्चशिक्षित होते. संघटन कार्यातून भक्कम पाया उभारला पाहिजे याची त्यांना जाणीव होती. पाश्चात्त्य विचारवंतांच्या उदारमतवादी तत्वज्ञानाचा, स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांचा त्यांच्यावर प्रभाव होता. त्यांचा सनदशीर मार्गांवर विश्वास होता. सनदशीर मार्गांनी मागणी केल्यास इंग्रज आपल्या मागण्यांना न्याय देतील, अशी त्यांना आशा वाटत होती. गोपाळ कृष्ण गोखले, फिरोजशहा मेहता, सुरेंद्रनाथ बॅनर्जी हे मवाळ पुढारी होत.

राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात प्रांतिक विधिमंडळात लोकप्रतिनिधी असावेत, सुशिक्षित भारतीयांना नोकऱ्या मिळाव्यात, वाढत्या लष्करी खर्चात कपात व्हावी, लोकांच्या कायदेशीर हक्कांचे रक्षण व्हावे म्हणून कार्यकारी संस्था व न्यायसंस्था यांची फारकत करावी असे विविध ठराव त्यांनी मांडले.

राष्ट्रीय चळवळीत फूट पाडण्यासाठी यानंतरच्या काळात ब्रिटिशांनी 'फोडा आणि राज्य करा' या नीतीचा अवलंब केला.

**जहाल युग (१९०५-१९२०) :** राजकीयदृष्ट्या जागृत असलेले भारतातील सर्व नेते जात, धर्म, भाषा, प्रांत सर्व भेद बाजूला सारून राष्ट्रीय सभेच्या व्यासपीठावर एकत्र येत होते. राष्ट्रसभेची उद्‌दिष्टे व सनदशीर मार्गांनी चळवळ पुढे नेण्यावर त्यांचे एकमत असले तरीही कार्यपद्‌धतीबाबत त्यांच्यात मतभेद होते. हे मतभेद तात्त्विक स्वरूपाचे होते. राजकीय चळवळीतील या मतभेदांवरून दोन प्रमुख राजकीय गट तयार झाले. शांततेच्या सनदशीर मार्गांचा पुरस्कार करणारे ते मवाळ व स्वातंत्र्यासाठी अधिक तीव्र संघर्ष केला पाहिजे असे मानणारे ते जहाल होत. लाला लजपतराय, बाळ गंगाधर टिळक व बिपिनचंद्र पाल हे जहाल पुढारी मानले जात.


लोकमान्य टिळक

सुरुवातीच्या काळात जहाल नेत्यांनी भारतीयांमध्ये राजकीय जागृती घडवून आणण्यासाठी वृत्तपत्रे, राष्ट्रीय उत्सव व राष्ट्रीय शिक्षण या मार्गांचा अवलंब केला. 'केसरी' व 'मराठा' या वृत्तपत्रांतून लोकमान्य टिळकांनी सरकारच्या दडपशाहीवर घणाघाती टीका केली. बंगाल प्रांतात 'अमृत बझार पत्रिका' हे जहाल मतवादी विचारांचे मुखपत्र होते. आपापसातील भेद


विसरून लोकांनी एकत्र यावे, त्यांच्यात विचारांचे आदान-प्रदान व्हावे, राष्ट्रपुरुषांच्या कार्यातून सामान्य जनतेला प्रेरणा मिळावी, या हेतूंनी टिळकांनी शिवजंयती व गणेशोत्सव या उत्सवांचे आयोजन केले. राजकीय कारणासाठी लोक एकत्र आले तर सरकार त्यांना बंदी घालेल, परंतु धार्मिक कारणासाठी लोक एकत्र आले तर सरकार त्यावर बंदी घालू शकणार नाही असे त्यांचे मत होते. टिळकांनी मंडालेच्या तुरुंगात 'गीतारहस्य' हा ग्रंथ लिहिला. त्याचा गाभा कर्मयोग असून लोकांनीही कृतिशील राहावे यावर त्यांचा भर होता. स्वभाषा, स्वसंस्कृतीविषयी प्रेम, आस्था बाळगणारी पिढी निर्माण व्हावी यासाठी जहाल नेत्यांनी शिक्षण संस्था स्थापन केल्या. लक्षावधी लोकांनी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेऊन सरकारला आव्हान देऊन संघर्ष केला तरच यश मिळेल असे जहाल नेत्यांचे मत होते. चळवळ अधिक तीव्र करावी यावर त्यांचे एकमत होते. पण त्यांनी सशस्त्र बंडाची भूमिका न घेता व्यापक जन आंदोलन उभारले पाहिजे असे आग्रहाने प्रतिपादन केले. मवाळांनी स्वातंत्र्य चळवळीचा पाया घातला आणि जहालांनी ही चळवळ पुढे नेली.

१८९७ मध्ये पुण्यात प्लेगच्या साथीने हाहाकार उडवला. शेकडो लोक मृत्युमुखी पडले. या साथीला आटोक्यात आणण्यासाठी रँड या अधिकाऱ्याची नेमणूक झाली. प्लेगचे रोगी शोधून काढण्यासाठी झडत्या घेण्याचे सत्र सुरू झाले. लोकांवर जुलूम जबरदस्ती केली. याचा बदला म्हणून चाफेकर बंधूंनी त्याचा वध केला. सरकारने टिळकांचा या कटाशी संबंध जोडायचा आटोकाट प्रयत्न केला. त्यात अपयश आले तरीही सरकारने सूडबुद्धीने लोकमान्य टिळकांना तुरुंगात टाकले.

**बंगालची फाळणी :** हिंदू-मुस्लीम समाजात दुहीचे बीज पेरून 'फोडा आणि राज्य करा' या नीतीचा अवलंब करायचे ब्रिटिशांनी ठरवले. तत्कालीन व्हॉईसरॉय लॉर्ड कर्झनने त्याला खतपाणी घातले. बंगाल हा एक मोठा प्रांत होता. या प्रांताचा कारभार करणे प्रशासकीयदृष्ट्या अवघड असल्याचे कारण पुढे करून लॉर्ड कर्झन याने १९०५ मध्ये बंगाल प्रांताची फाळणी जाहीर केली. या फाळणीमुळे मुस्लीम बहुसंख्याकांचा पूर्व बंगाल आणि हिंदू बहुसंख्याकांचा पश्चिम बंगाल अशी रचना झाली. फाळणीमुळे हिंदू-मुस्लिमांत फूट पाडून स्वतंत्रता चळवळ दुर्बल करणे हा छुपा हेतू होता.

**वंगभंग चळवळ :** बंगालमध्येच नव्हे तर संपूर्ण भारतात फाळणी विरोधात जनमत जागृत झाले. १६ ऑक्टोबर हा फाळणीचा दिवस राष्ट्रीय शोकदिन म्हणून पाळण्यात आला. भारतभर निषेधसभांद्वारे सरकारचा निषेध केला गेला. 'वंदे मातरम्' हे गीत सर्वत्र गायले जाऊ लागले. ऐक्याचे प्रतीक म्हणून रक्षाबंधनाचा कार्यक्रम घेण्यात आला. सरकारी शाळा, महाविद्यालयांवर बहिष्कार टाकून मोठ्या संख्येने विद्यार्थी या चळवळीत सामील झाले. वंगभंग आंदोलनाचे नेतृत्व सुरेन्द्रनाथ बॅनर्जी, आनंदमोहन बोस, रवींद्रनाथ टागोर इत्यादींनी केले. वंगभंग चळवळीने भारतीय राष्ट्रीय सभेची व्याप्ती वाढली. ती एक राष्ट्रीय चळवळ बनली. असंतोषाची तीव्रता पाहून १९११ साली ब्रिटिशांनी बंगालची फाळणी रद्द केली.

**राष्ट्रीय सभेची चतु:सूत्री :** १९०५ च्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाचे अध्यक्ष नामदार गोखले होते. त्यांनी वंगभंग आंदोलनास पाठींबा दिला. १९०६ च्या अधिवेशनाचे अध्यक्ष दादाभाई नौरोजी होते. व्यासपीठावरून दादाभाई नौरोजी यांनी 'स्वराज्य' या शब्दाचा सर्वप्रथम उच्चार केला. अध्यक्षीय भाषणात त्यांनी एकजूट करा, नेटाने प्रयत्न करा आणि स्वराज्याचे ध्येय साध्य करा म्हणजे आज जे लक्षावधी बांधव दारिद्र्य, उपासमार व रोगराई यांना बळी पडत आहेत त्यांना वाचवता येईल व सुधारलेल्या राष्ट्रांत भारताला जे


दादाभाई नौरोजी

मानाचे स्थान होते, ते पुन्हा प्राप्त होईल असा संदेश दिला. याच अधिवेशनात स्वराज्य, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण व बहिष्कार ही चतु:सूत्री राष्ट्रीय सभेने एकमताने स्वीकारली. स्वदेशी चळवळीमुळे आपण स्वयंपूर्ण व स्वावलंबी होऊ. स्वदेशीच्या मार्गाने जाण्यासाठी आपल्या देशातील भांडवल, साधनसामग्री, मनुष्यबळ आणि अन्य सर्व शक्ती आपल्याला एकत्रित कराव्या लागतील आणि यातूनच आपल्या देशाचे हित साधता येईल. परदेशी वस्तू व मालावर बहिष्कार ही पहिली पायरी तर परदेशी राजवटीवर बहिष्कार ही पुढची पायरी असे ठरले. बहिष्कारामुळे ब्रिटिश साम्राज्याच्या मुळावरच घाव घालता येईल असे नेत्यांचे मत होते.

**माहीत आहे का तुम्हांला ?**


नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांनी १९०५ मध्ये 'भारत सेवक समाजा'ची स्थापना केली. लोकांमध्ये देशभक्ती निर्माण करून स्वार्थत्यागाची शिकवण देणे. धर्म व जाती यांच्यातील विरोध नष्ट करून सामाजिक सलोखा निर्माण करणे, शिक्षणाचा प्रसार करणे हे भारत सेवक समाजाचे मुख्य उद्देश होते.



गोपाळकृष्ण गोखले

**जहाल व मवाळ यांच्यातील मतभेद :** राष्ट्रीय सभेतील विचारसरणीतील मतभेद १९०७ सालच्या सुरत अधिवेशनात विकोपाला गेले. स्वदेशी व बहिष्कार हे ठराव बाजूला ठेवण्याचा मवाळांचा प्रयत्न होता. तो यशस्वी होऊ नये अशी जहालांची खटपट होती. ना.गोखले, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, फिरोजशहा मेहता अशा मवाळ पुढाऱ्यांनी जहाल नेते राष्ट्रीय सभा काबीज करण्याचा प्रयत्न करत आहेत असा आरोप केला. लाला लजपतराय यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. भारतीय राष्ट्रीय सभा हे राष्ट्रीय व्यासपीठ असून त्यात फूट पडून चालणार नाही असे टिळकांचे मत होते. अधिवेशनाच्या वेळी तणाव वाढला व तडजोड अशक्य झाल्याने अखेरीस भारतीय राष्ट्रीय सभेत फूट पडली.

**ब्रिटिश सरकारची दडपशाही :** वंगभंगानंतर सुरू झालेले प्रभावी जनआंदोलन पाहून सरकार अस्वस्थ झाले. या आंदोलनाला पायबंद घालण्यासाठी सरकारने दडपशाहीचे धोरण स्वीकारले. सार्वजनिक सभांवर कायद्याने बंदी घातली. हा कायदा मोडणाऱ्यांना कठोर शिक्षा केल्या. शाळकरी मुलांनाही फटके मारले. वृत्तपत्रांवर अनेक निर्बंध लादले. सरकारवर टीका केल्याच्या आरोपावरून अनेक छापखाने जप्त केले. लेखकांना व संपादकांना तुरुंगात डांबले. सरकारने जहाल नेत्यांविरुद्ध कडक कारवाई केली. याची तीव्र प्रतिक्रिया बंगालमध्ये उमटली. क्रांतिकारकांनी गोळीबार, बॉम्बहल्ले करणे हे मार्ग पत्करले. या बॉम्ब हल्ल्यांचे समर्थन केसरी पत्रातून करणाऱ्या लोकमान्य टिळकांवर राजद्रोहाचा आरोप ठेवून त्यांना सहा वर्षे म्यानमार येथील मंडालेच्या तुरुंगात पाठवले. बिपिनचंद्र पाल यांना कारावासाची शिक्षा ठोठावली, तर लाला लजपतराय यांना पंजाबमधून हद्दपार केले.



लाल–बाल–पाल

**मुस्लीम लीगची स्थापना :** वंगभंग आंदोलनात राष्ट्रीय सभेला मिळणारा जनतेचा प्रचंड प्रतिसाद पाहून ब्रिटिश सत्ताधीश बेचैन झाले. इंग्रजांनी फोडा आणि

राज्य करा या नीतीचा पुन्हा अवलंब केला. मुस्लिमांचे हितसंबंध जपण्यासाठी त्यांची स्वतंत्र राजकीय संघटना असली पाहिजे असा प्रचार त्यांनी सुरू केला. ब्रिटिश सरकारच्या प्रोत्साहनामुळे मुस्लीम समाजातील उच्चवर्णीयांचे एक शिष्टमंडळ आगाखान यांच्या नेतृत्वाखाली गव्हर्नर जनरल लॉर्ड मिंटो यांना भेटले. लॉर्ड मिंटो व अन्य ब्रिटिश अधिकारी यांच्या उत्तेजनाने १९०६ मध्ये 'मुस्लीम लीग'ची स्थापना झाली.

**मोर्ले-मिंटो कायदा :** भारतीय जनतेमध्ये ब्रिटिश सरकारच्या कामाबाबत असंतोष होता. भारतीय जनतेच्या दारिद्र्याचे मुख्य कारण म्हणजे ब्रिटिशांचे आर्थिक धोरण होय अशी जनतेत भावना होती. कर्झनचे दडपशाहीचे धोरण, सुशिक्षित भारतीयांना नोकऱ्यांत समाविष्ट न करणे, भारताबाहेर आफ्रिकेत भारतीयांना अन्याय्य वागणूक यांमुळेही असंतोषात भर पडली. भारतीयांच्या या असंतोषाला तात्पुरती मलमपट्टी करण्यासाठी मोर्ले-मिंटो सुधारणा कायदा १९०९ मध्ये करण्यात आला. या कायद्यान्वये कायदेमंडळातील भारतीय सदस्यांची संख्या वाढवण्यात आली आणि काही निर्वाचित भारतीय प्रतिनिधींचा समावेश कायदेमंडळात करण्याची तरतूद करण्यात आली. याच कायद्यान्वये मुस्लिमांसाठी विभक्त मतदारसंघाची योजना करण्यात आली. ब्रिटिशांच्या या कुटील नीतीमुळे भारतात फुटीरवृत्तीची बीजे पेरली गेली.

**लखनौ करार :** भारतीय राष्ट्रीय सभेच्या १९१६ च्या लखनौ अधिवेशनात टिळकांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय सभेतील मतभेद मिटवण्याचा प्रयत्न झाला. याच वर्षी भारतीय राष्ट्रीय सभा व मुस्लीम लीग यांच्यातही समेट घडून आला. याला 'लखनौ करार' असे म्हणतात. या करारानुसार मुस्लिमांच्या विभक्त मतदारसंघाना राष्ट्रीय सभेने मान्यता दिली आणि भारताला राजकीय अधिकार मिळवण्याच्या कार्यात राष्ट्रीय सभेशी सहकार्य करण्याचे मुस्लीम लीगने मान्य केले.

**होमरूल चळवळ :** १९१४ मध्ये टिळकांची



डॉ. ॲनी बेझंट

मंडालेच्या तुरुंगातून सुटका झाली तेव्हा युरोपात पहिल्या महायुद्धाला तोंड फुटले होते. या युद्धाचे थेट परिणाम भारतालाही भोगावे लागले. दैनंदिन गरजेच्या वस्तूंचे भाव वाढले. ब्रिटिश सरकारने भारतीयांवर अनेक निर्बंध लादले. यामुळे भारतीयांत असंतोष वाढू लागला. अशा परिस्थितीत डॉ.ॲनी बेझंट व लोकमान्य टिळक यांनी होमरूल चळवळ सुरू केली. होमरूल म्हणजे आपला राज्यकारभार आपण करणे यालाच स्वशासन म्हणतात. आयर्लंड या देशातही वसाहतवादाविरुद्ध अशी चळवळ सुरू झाली होती. त्याच धर्तीवर भारतीय होमरूल चळवळीने स्वशासनाचे अधिकार ब्रिटिश सरकारकडे मागितले. डॉ.ॲनी बेझंट व लोकमान्य टिळक यांनी देशभर झंझावाती दौरे काढून स्वशासनाची मागणी लोकांपर्यंत पोचविली. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तो मी मिळवणारच !' असे टिळकांनी ठामपणे सांगितले.

**पहिले महायुद्ध व भारत :** युरोपातील युद्धजन्य परिस्थिती, भारतीय जनतेतील वाढता असंतोष, होमरूल चळवळीची वाढती लोकप्रियता या परिस्थितीत भारतीयांचे सहकार्य मिळवणे ब्रिटिशांना गरजेचे होते. यासाठी सुधारणेचा पुढचा हप्ता भारतीयांना द्यायचा म्हणजे भारतीयांना काही राजकीय अधिकार द्यावे असे ब्रिटिश सरकारने ठरवले. भारताला टप्प्याटप्प्याने स्वशासनाचे अधिकार आणि जबाबदार राज्यपद्धती देण्यात येईल, असे १९१७ मध्ये तत्कालीन भारतमंत्री मॉंटेग्यू यांनी घोषित केले. सरकार जर भारतीयांच्या मागण्यांविषयी सहानुभूती व समजूतदारपणा दाखवणार असेल तर भारतीय जनतादेखील सरकारला सहकार्य करेल असे टिळकांनी जाहीर केले. लोकमान्य टिळकांच्या या धोरणाला 'प्रतियोगी सहकारिता' असे म्हणतात.

**मॉंटेग्यू-चेम्सफर्ड कायदा :** १९१९ मध्ये ब्रिटिश पार्लमेंटने भारतात घटनात्मक सुधारणा घडवून आणण्यासाठी एक कायदा मंजूर केला. याला मॉंटेग्यू चेम्सफर्ड कायदा म्हणतात. या कायद्यान्वये बिनमहत्त्वाची खाती भारतीय मंत्र्यांकडे सोपवण्यात आली; परंतु अर्थ, महसूल, गृह यांसारखी महत्त्वाची खाती गव्हर्नरच्या ताब्यात होती. १९१९ च्या कायद्याने भारतीयांच्या जबाबदार राज्यपद्धतीच्या मागणीला पुरेसा वाव मिळाला नाही. या कायद्याने सर्वांची निराशा केली. 'हे स्वराज्य नव्हे आणि त्याचा पायाही नव्हे' अशा शब्दांत लोकमान्य टिळकांनी या कायद्यावर टीका केली. सरकारला नमवायचे असेल तर आंदोलन अधिक तीव्र करण्याची गरज आहे असे सर्व भारतीयांना कळून चुकले. भारत नव्या आंदोलनास सिद्ध झाला.

## स्वाध्याय

**१. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

(१) भारत सेवक समाजाची स्थापना .......... यांनी केली.
(अ) गणेश वासुदेव जोशी
(ब) भाऊ दाजी लाड
(क) म.गो.रानडे
(ड) गोपाळ कृष्ण गोखले

(२) राष्ट्रीय सभेचे पहिले अधिवेशन .......... येथे भरवण्यात आले.
(अ) पुणे (ब) मुंबई
(क) कोलकाता (ड) लखनौ

(३) गीतारहस्य हा ग्रंथ .......... यांनी लिहिला.
(अ) लोकमान्य टिळक (ब) दादाभाई नौरोजी
(क) लाला लजपतराय (ड) बिपीनचंद्र पाल

**(ब) नावे लिहा.**

(१) मवाळ नेते .............. ..............
(२) जहाल नेते .............. ..............

**२. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

(१) स्वातंत्र्यलढ्यात भारतीयांची अस्मिता जागृत झाली.
(२) भारतीय राष्ट्रीय सभेत दोन गट तयार झाले.
(३) लॉर्ड कर्झनने बंगालची फाळणी करायचे ठरवले.

**३. टीपा लिहा.**

(१) राष्ट्रीय सभेची उद्दिष्टे
(२) वंगभंग चळवळ
(३) राष्ट्रीय सभेची चतुःसूत्री

**४. भारतीय राष्ट्रीय सभेच्या स्थापनेची पार्श्वभूमी पुढील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करा.**

- प्रशासकीय केंद्रीकरण
- आर्थिक शोषण
- पाश्चात्त्य शिक्षण
- भारताच्या प्राचीन इतिहासाचा अभ्यास
- वृत्तपत्रांचे कार्य

**उपक्रम**

राष्ट्रीय सभेच्या सुरुवातीच्या काळातील नेत्यांविषयी अधिक माहिती आंतरजालाच्या साहाय्याने मिळवा.

8HMAYH

# ७. असहकार चळवळ

इ.स.१९२० ते १९४७ हा भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा कालखंड 'गांधीयुग' या नावाने ओळखला जातो. १९२० मध्ये लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर राष्ट्रीय चळवळीची सूत्रे महात्मा गांधीजींकडे आली. गांधीजींनी सत्य, अहिंसा, सत्याग्रह या सूत्राच्या आधारे भारतीय स्वातंत्र्यलढ्याला नवी दिशा दिली. गांधीजींच्या प्रभावी नेतृत्वामुळे राष्ट्रीय चळवळ अधिक व्यापक झाली. भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या नव्या पर्वाला सुरुवात झाली.

**गांधीजींचे दक्षिण आफ्रिकेतील कार्य :** महात्मा गांधी १८९३ मध्ये वकिलीच्या कामानिमित्त दक्षिण आफ्रिकेत गेले होते. दक्षिण आफ्रिका ही इंग्लंडची एक वसाहत होती. तेथे उद्योग, व्यापार व अन्य कामधंद्यासाठी अनेक भारतीय स्थायिक झाले होते. तेथील हिंदी लोकांना गुन्हेगारांसारखे वागवले जाई. त्यांचा जागोजागी अपमान केला जात असे. १९०६ मध्ये शासनाने एका आदेशान्वये कृष्णवर्णीयांना ओळखपत्र बाळगणे सक्तीचे केले होते, त्यांच्या स्वातंत्र्यावर बंधने घातली होती. या अन्यायाविरुद्ध गांधीजींनी सत्याग्रहाच्या मार्गाने तेथील लोकांना न्याय मिळवून दिला.



महात्मा गांधी

**गांधीजींचे भारतात आगमन :** ९ जानेवारी १९१५ मध्ये गांधीजी दक्षिण आफ्रिकेतून भारतात परतले. नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांच्या सल्ल्यानुसार त्यांनी देशभर दौरा केला. सामान्य लोकांचे दुःख, दारिद्र्य पाहून ते दुःखी झाले. त्यांनी राष्ट्रसेवेचे व्रत घेतले. अहमदाबादजवळ साबरमती नदीच्या काठी आश्रमात ते राहू लागले. सर्वसामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी सत्याग्रहाचे अभिनव तंत्र त्यांनी अवलंबले.

**सत्याग्रहाचे तत्वज्ञान :** गांधीजींनी सत्याग्रहाचे नवे तंत्र लोकचळवळीत आणले. सत्याग्रह म्हणजे सत्याचा, न्यायाचा आग्रह धरणे. अन्याय करणाऱ्या व्यक्तीला संयमाने व अहिंसेच्या मार्गाने सत्य व न्याय याची जाणीव करून देणे व तिचे मतपरिवर्तन करणे हे सत्याग्रहाचे उद्दिष्ट होते. सत्याग्रह करणाऱ्या व्यक्तीने हिंसा व असत्य यांचा वापर करता कामा नये, अशी गांधीजींची शिकवण होती.

पुढे भारतातीलच नाही तर जगातील अनेक देशांत जनतेने अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी सत्याग्रहाचा मार्ग स्वीकारला. अमेरिकेतील कृष्णवर्णीयांच्या हक्कांसाठी झगडणारे मार्टिन ल्यूथर किंग आणि दक्षिण आफ्रिकेतील नेल्सन मंडेला यांच्यावर गांधीजींच्या सत्याग्रहाच्या मार्गाचा प्रभाव पडला.

**चंपारण्य सत्याग्रह :** बिहारच्या चंपारण्य भागात ब्रिटिश मळे मालकांकडून भारतीय शेतकऱ्यांवर नीळ पिकवण्याची सक्ती केली जात असे. ही नीळ ठरलेल्या दरातच मळेवाल्यांना विकण्याची सक्ती असल्यामुळे त्यात शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असे. गांधीजी १९१७ मध्ये चंपारण्यात गेले. गांधीजींनी चंपारण्यात शेतकऱ्यांना संघटित करून सत्याग्रहाच्या मार्गाने आंदोलन केले. गांधीजींचा भारतातील हा पहिला लढा यशस्वी झाला, शेतकऱ्यांना न्याय मिळाला.

**खेडा सत्याग्रह :** गुजरातमधील खेडा जिल्ह्यात सतत पडलेल्या दुष्काळामुळे पिकांची स्थिती अत्यंत वाईट होती. तरीही सरकारकडून सक्तीने शेतसारा वसूल केला जात होता. गांधीजींनी शेतकऱ्यांना शेतसारा न भरण्याचा सल्ला दिला. तेव्हा स्थानिक शेतकऱ्यांनी १९१८ मध्ये खेडा जिल्ह्यात सारावंदीची चळवळ सुरू केली. गांधीजींनी चळवळीचे नेतृत्व

स्वीकारले. अल्पावधीतच सरकारने शेतसारा माफ केला.


**अहमदाबादचा कामगार लढा :** पहिल्या महायुद्धाच्या काळात महागाई प्रचंड वाढली होती. गिरणी कामगारांनी वेतनवाढ मागितली. पण गिरणी मालकांनी या मागणीला नकार दिला. गांधीजींच्या सल्ल्यानुसार कामगारांनी संप व उपोषण केले. गांधीजीही कामगारांबरोबर उपोषणाला बसले. शेवटी गिरणी मालकांनी माघार घेतली व कामगारांना वेतनवाढ दिली.

**रौलट कायद्याविरुद्ध सत्याग्रह :** पहिल्या महायुद्धात भारतीयांनी ब्रिटिशांना मदत केली. युद्ध समाप्तीनंतर भारतीयांच्या हिताचे निर्णय घेतले जातील, जबाबदार शासनपद्धती आणली जाईल असे भारतीयांना वाटत होते. भारतातील जनतेत वाढत्या किमती, वाढलेले कर इत्यादी आर्थिक व राजकीय कारणांमुळे ब्रिटिश शासनाविरुद्ध असंतोष वाढत होता.

ब्रिटिश शासनाने हा असंतोष दडपण्यासाठी व त्यासंबंधी उपाययोजना सुचवण्यासाठी सर सिडनी रौलट या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीच्या शिफारशीनुसार १७ मार्च १९१९ मध्ये केंद्रीय कायदेमंडळातील भारतीय सभासदांनी केलेल्या विरोधाला न जुमानता नवीन कायदा केला. त्याला 'रौलट कायदा' असे म्हणतात. या कायद्याने कोणत्याही भारतीयाला विनाचौकशी अटक करण्याचा, न्यायालयात खटला न भरता तुरुंगात डांबण्याचा अधिकार सरकारला देण्यात आला. या कायद्याने दिलेल्या शिक्षेविरुद्ध अपील करण्यास मनाई करण्यात आली. भारतीयांनी या कायद्याला 'काळा कायदा' असे संबोधले. या कायद्याविरुद्ध देशभर संतापाची लाट उसळली. गांधीजींनी या कायद्याविरुद्ध सत्याग्रह पुकारला. ६ एप्रिल १९१९ मध्ये रौलट कायद्याला विरोध करण्यासाठी देशव्यापी हरताळ पाळण्याचे आवाहन केले. या आवाहनाला भारतीयांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला.

**जालियनवाला बाग हत्याकांड :** रौलट कायद्याविरुद्ध पुकारलेल्या लढ्याने पंजाब प्रांतात प्रखर स्वरूप धारण केले. अमृतसर हे शहर या चळवळीचे प्रमुख केंद्र बनले होते. सरकारने दडपशाहीचे सत्र सुरू केले. गांधीजींना पंजाब प्रांतात प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली. जनरल डायरने अमृतसरमध्ये सभाबंदीचा हुकूम जारी केला. अमृतसर येथील हरताळ प्रकरणी डॉ.सत्यपाल व सैफुद्दीन किचलु अशा प्रमुख नेत्यांना अटक करण्यात आली.

या घटनेच्या निषेधार्थ १३ एप्रिल १९१९ रोजी अमृतसर येथील जालियनवाला बागेत बैसाखी सणाच्या निमित्ताने सभा आयोजित करण्यात आली होती. या वेळी जनरल डायर लष्करी गाड्या घेऊन तेथे आला. जालियनवाला बाग मैदानाला एकाच बाजूने असलेला अरुंद रस्ता अडवला गेला व निःशस्त्र, निरपराध जनतेवर पूर्वसूचना न देता बेछूट, अमानुष गोळीबार केला गेला. बंदुकीच्या १६०० फैरी झाडल्यानंतर दारूगोळा संपल्यामुळे गोळीबार बंद झाला. या हत्याकांडात सुमारे चारशे स्त्री-पुरुष मरण पावले. असंख्य लोक जखमी झाले. गोळीबारानंतर लगेच संचारबंदी पुकारल्यामुळे जखमींवर ताबडतोब उपचार होऊ शकले नाहीत. संपूर्ण पंजाबात लष्करी कायदा लागू करून शासनाने अनेकांना तुरुंगात डांबले.



रवींद्रनाथ टागोर

या हत्याकांडास पंजाबचा गव्हर्नर मायकेल ओडवायर हा जबाबदार होता. देशभरात या कायद्याचा निषेध केला गेला. हत्याकांडाचा निषेध म्हणून रविंद्रनाथ टागोर यांनी ब्रिटिश सरकारने दिलेल्या 'सर' या किताबाचा त्याग केला. पुढे या हत्याकांडाच्या चौकशीची मागणी भारतीयांनी केली. त्यामुळे सरकारने हंटर कमिशनची नियुक्ती केली.

**खिलाफत चळवळ :** तुर्कस्तानचा सुलतान हा जगभरातील मुस्लिमांचा खलिफा म्हणजे धर्मप्रमुख होता. पहिल्या महायुद्धात तुर्कस्तान इंग्लंडच्या विरोधी गटात होते. युद्धात भारतीय मुस्लिमांचे सहकार्य मिळवण्यासाठी युद्धसमाप्तीनंतर खलिफाच्या साम्राज्यास धक्का लावण्यात येणार नाही, असे आश्वासन इंग्लंडच्या प्रधानमंत्र्यांनी दिले. पण युद्ध समाप्तीनंतर इंग्लंडने हे आश्वासन पाळले नाही. त्यामुळे मुस्लिमांमध्ये संतापाची लाट उसळली. खलिफाला पाठिंबा देण्यासाठी भारतीय मुस्लिमांनी जी चळवळ सुरू केली, तिला 'खिलाफत चळवळ' असे म्हणतात. या प्रश्नावरून जर हिंदू-मुस्लीम ऐक्यावर आधारित राष्ट्रीय चळवळ सुरू केली, तर सरकार निश्चितच वठणीवर येईल, असे गांधीजींना वाटू लागले. त्यामुळे गांधीजींनी खिलाफत चळवळीला पाठिंबा दिला. सरकारशी असहकार करण्याचा गांधीजींचा प्रस्ताव खिलाफत कमिटीने मान्य केला. या काळात हिंदू-मुस्लीम ऐक्य विशेषत्वाने दिसून आले.

**असहकार चळवळ :** असहकार चळवळीमागे गांधीजींची अशी धारणा होती की, भारतात ब्रिटिश शासन हे भारतीयांच्या सहकार्यावरच अवलंबून आहे. जर भारतीयांनी ब्रिटिश शासनाशी संपूर्ण असहकार पुकारला तर ते कोसळून पडेल. या उद्देशाने त्यांनी जनतेला असहकार चळवळीत भाग घेण्याचे आवाहन केले.

१९२० मध्ये राष्ट्रीय सभेचे अधिवेशन नागपूर येथे भरले. या अधिवेशनात चित्तरंजन दास यांनी मांडलेल्या असहकाराच्या ठरावाला मंजुरी मिळाली. असहकाराच्या चळवळीची सर्व सूत्रे गांधीजींकडे सोपवण्यात आली. या ठरावानुसार शासकीय कार्यालये, न्यायालये, परदेशी वस्तू, सरकारी शाळा, महाविद्यालये यांच्यावर बहिष्कार घालण्याचा कार्यक्रम निश्चित करण्यात आला.

**असहकार चळवळीची वाटचाल :** असहकाराच्या कार्यक्रमाप्रमाणे पंडित मोतीलाल नेहरू, चित्तरंजन दास इत्यादी नामांकित वकिलांनी न्यायालयावर बहिष्कार टाकला. याच काळात शाळा-कॉलेजांवरील बहिष्कारातून राष्ट्रीय शिक्षणाची कल्पना राबवली गेली. अनेक राष्ट्रीय शाळा, महाविद्यालये व विद्यापीठे स्थापन झाली. येणाऱ्या निवडणुकांवरही बहिष्कार टाकण्यात आला. परदेशी कापडावर बहिष्कार, परदेशी कापडाच्या होळ्या, परदेशी कापडाची विक्री करणाऱ्या दुकानांसमोर निदर्शने केली गेली. यामुळे परदेशी कापडाची आयात घटली.

१९२१ मध्ये मुंबईत आलेल्या 'प्रिन्स ऑफ वेल्स'चे स्वागत हरताळ पाळून केले गेले. निर्मनुष्य रस्ते व बंद दुकानांनी राजपुत्राचे स्वागत केले. आसाममधील चहा मळेवाल्यापासून बंगालमधील रेल्वे कर्मचाऱ्यांपर्यंत ही चळवळ पसरली. असहकार चळवळ आटोक्यात आणण्यासाठी सरकारने दडपशाही सुरू केली.

उत्तर प्रदेशातील गोरखपूर जिल्ह्यातील चौरीचौरा येथे फेब्रुवारी १९२२ मध्ये शांततापूर्ण मिरवणुकीवर पोलिसांनी गोळीबार केला. त्यामुळे संतप्त झालेल्या जमावाने पोलीस चौकीला आग लावली. यात एका पोलीस अधिकाऱ्यासह २२ पोलीस ठार झाले. या घटनेमुळे गांधीजी व्यथित झाले. १२ फेब्रुवारी १९२२ रोजी गांधीजींनी असहकार चळवळ स्थगित केली.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

**मुळशी सत्याग्रह :** असहकार चळवळीच्या काळात पुणे जिल्ह्याच्या मुळशी तालुक्यातील शेतकऱ्यांनी शासनाविरुद्ध सत्याग्रह केला. या सत्याग्रहाचे नेतृत्व सेनापती पांडुरंग महादेव बापट यांनी केले. यासाठी त्यांना सात वर्षांची शिक्षा झाली.

मार्च १९२२ मध्ये गांधीजींना अटक करण्यात आली. त्यांच्यावर 'यंग इंडिया'त तीन राष्ट्रद्रोही लेख लिहिल्याचा आरोप ठेवून राजद्राहोचा खटला भरण्यात आला. अहमदाबादमध्ये खास न्यायालय स्थापन केले गेले. गांधीजींना सहा वर्षांची शिक्षा सुनावली.

पुढे प्रकृती अस्वाथ्याच्या कारणास्तव गांधीजींची तुरुंगातून सुटका करण्यात आली. गांधीजींनी असहकार चळवळीबरोबरच विधायक कार्यक्रम हाती घेतला. त्यात प्रामुख्याने स्वदेशीचा प्रसार, हिंदू-मुस्लीम ऐक्य, मद्यपान बंदी, अस्पृश्यता निवारण, खादीचा प्रसार, राष्ट्रीय शिक्षण अशा गोष्टींचा अंतर्भाव होता. या विधायक कार्यक्रमामुळे ग्रामीण भागात राष्ट्रीय चळवळ अधिक व्यापक झाली.

**स्वराज्य पक्ष :** राष्ट्रीय सभेतील चित्तरंजन दास, मोतीलाल नेहरू यांनी सरकारची अडवणूक करण्यासाठी कायदेमंडळात प्रवेश करण्याची कल्पना मांडली. १९२२ मध्ये राष्ट्रीय सभेच्या अंतर्गत स्वराज्य पक्षाची स्थापना केली.

१९२३ च्या निवडणुकीत मध्यवर्ती व प्रांतिक कायदेमंडळावर स्वराज्य पक्षाचे अनेक उमेदवार निवडून आले. यात प्रामुख्याने मोतीलाल नेहरू, मदनमोहन मालवीय, लाला लजपतराय, न.चिं. केळकर यांचा समावेश होता. देशात जेव्हा राजकीय चळवळ थंडावली होती तेव्हा कायदेमंडळातील लढाई स्वराज्य पक्षाने दिली. कायदेमंडळात सरकारच्या अन्याय्य धोरणांना त्यांनी प्रखर विरोध केला. भारतात भावी काळात जबाबदार राज्यपद्धती द्यावी अशी मागणी केली. भारतीयांचे प्रश्न सोडवण्यासाठी गोलमेज परिषद बोलवावी, राजकीय कैद्यांना मुक्त करावे, यासाठी विधिमंडळात ठराव संमत करून घेतले. सरकारने स्वराज्य पक्षाचे बहुतेक ठराव फेटाळून लावले.

**सायमन कमिशन :** १९१९ च्या मॉंटेग्यू-चेम्सफर्ड कायद्याने दिलेल्या सुधारणा असमाधानकारक होत्या. त्यामुळे भारतीय जनतेत असंतोष होता. या पार्श्वभूमीवर इंग्रज सरकारने १९२७ मध्ये सर जॉन सायमन यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिशन नियुक्त केले. या सात सदस्यीय कमिशनमध्ये एकही भारतीय सदस्य नव्हता, म्हणून भारतातील राजकीय पक्षांनी सायमन कमिशनवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला.



सायमन परत जा

१९२८ साली सायमन कमिशन भारतात आले तेव्हा ज्या ज्या ठिकाणी ते गेले तेथे त्यांच्याविरुद्ध निदर्शने करण्यात आली. 'सायमन गो बॅक', 'सायमन परत जा' या घोषणा देऊन प्रखर विरोध करण्यात आला. निदर्शकांवर लाठीहल्ले करण्यात आले. लाहोर येथे सायमन कमिशनविरुद्ध झालेल्या निदर्शनाचे नेतृत्व लाला लजपतराय यांनी केले. या निदर्शकांवर पोलिसांनी लाठीहल्ला केला. सॉंडर्स या उद्दाम पोलीस अधिकाऱ्याने लालाजींच्या छातीवर लाठीने प्रहार केले. या हल्ल्यानंतरच्या निषेधसभेत लालाजी म्हणाले की, 'लाठीच्या प्रत्येक आघाताबरोबर ब्रिटिश साम्राज्याच्या शवपेटीवर एकेक खिळा ठोकला जात आहे.' पुढे काही दिवसांतच लालाजींचे निधन झाले.


लाला लजपतराय

**नेहरू अहवाल :** भारतातील नेते एकमताने राज्यघटना तयार करू शकत नाहीत, अशी टीका भारतमंत्री बर्कनहेड यांनी केली. हे आव्हान स्वीकारून सर्वपक्षीय समिती स्थापन करण्यात आली. या समितीचे अध्यक्ष पं.मोतीलाल नेहरू हे होते.

भारतामध्ये वसाहतीचे स्वराज्य स्थापन करावे, प्रौढ मतदान पद्धती लागू करावी, भारतीयांना मूलभूत नागरी हक्क द्यावेत, भाषावार प्रांतरचना

करावी असे प्रस्ताव या अहवालात होते. या अहवालाला 'नेहरू अहवाल' असे म्हणतात.

१९२९ अखेरपर्यंत सरकारने नेहरू अहवाल स्वीकारला नाही तर सविनय कायदेभंगाचा लढा सुरू करण्याचा इशारा दिला. या पार्श्वभूमीवर १९२९ च्या डिसेंबरमधील पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली भरलेले लाहोर अधिवेशन ऐतिहासिक ठरले.

**पूर्ण स्वराज्याची मागणी :** वसाहतीचे स्वराज्य हे आतापर्यंतचे राष्ट्रीय सभेचे उद्दिष्ट अनेक तरुण कार्यकर्त्यांना मान्य नव्हते. पं.जवाहरलाल नेहरू आणि सुभाषचंद्र बोस हे संपूर्ण स्वराज्याची मागणी करणाऱ्या तरुणांचे नेते होते. या तरुण गटाच्या प्रभावामुळे राष्ट्रीय सभेच्या लाहोर अधिवेशनामध्ये संपूर्ण स्वराज्याचा ठराव संमत करण्यात आला. या ठरावाद्वारे राष्ट्रीय सभेने वसाहतींचे स्वराज्य या उद्दिष्टाचा त्याग केला. यापुढे भारताचे संपूर्ण स्वातंत्र्य हे राष्ट्रीय चळवळीचे ध्येय बनले.


पं. जवाहरलाल नेहरू

३१ डिसेंबर १९२९ रोजी रावी नदीच्या किनाऱ्यावर पं.जवाहरलाल नेहरू यांनी तिरंगा ध्वज फडकावला व २६ जानेवारी हा दिवस स्वातंत्र्यदिन म्हणून पाळण्यात यावा असे ठरवण्यात आले. ब्रिटिश सत्तेपासून भारताला मुक्त करण्यासाठी स्वातंत्र्याचा लढा अहिंसक मार्गाने चालवण्याची प्रतिज्ञा २६ जानेवारी १९३० रोजी देशभर करण्यात आली. त्यामुळे देशात सर्वत्र चैतन्याचे वातावरण निर्माण झाले.

## स्वाध्याय

**१. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

(१) गांधीजींनी आपल्या कार्याची सुरुवात .......... या देशातून केली.
(अ) भारत (ब) इंग्लंड
(क) दक्षिण आफ्रिका (ड) म्यानमार

(२) शेतकऱ्यांनी .......... जिल्ह्यात साराबंदीची चळवळ सुरू केली.
(अ) गोरखपूर (ब) खेडा
(क) सोलापूर (ड) अमरावती

(३) जालियनवाला बाग हत्याकांडाचा निषेध म्हणून रवींद्रनाथ टागोरांनी सरकारने दिलेल्या .......... या किताबाचा त्याग केला.
(अ) लॉर्ड (ब) सर
(क) रावबहादूर (ड) रावसाहेब

**२. पुढील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(१) दक्षिण आफ्रिकेत कृष्णवर्णीयांवर १९०६ च्या आदेशान्वये कोणती बंधने घातली गेली ?

(२) गांधीजींनी भारतात पहिला सत्याग्रह कोठे केला ?

(३) जालियनवाला बागेत गोळीबाराचा आदेश देणारा अधिकारी कोण होता ?

**३. पुढील प्रश्नांची उत्तरे २५ ते ३० शब्दांत लिहा.**

(१) सत्याग्रहाचे तत्त्वज्ञान स्पष्ट करा.

(२) स्वराज्य पक्षाची स्थापना का करण्यात आली ?

**४. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

(१) रौलट कायद्याला भारतीय जनतेने विरोध केला.

(२) गांधीजींनी असहकार चळवळ स्थगित केली.

(३) भारतीयांनी सायमन कमिशनवर बहिष्कार घातला.

(४) भारतात खिलाफत चळवळ सुरू करण्यात आली.

**उपक्रम**

२६ जानेवारी १९३० रोजी घेण्यात आलेली स्वातंत्र्याची प्रतिज्ञा मिळवून त्याचे वर्गात सामूहिक वाचन करा.

8WW715

# ८. सविनय कायदेभंग चळवळ

लाहोर अधिवेशनात संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव संमत झाल्यावर महात्मा गांधींनी सविनय कायदेभंग करण्याचा निर्णय घेतला. ही चळवळ सुरू करण्याआधी गांधीजींनी ब्रिटिश सरकारकडे विविध मागण्या केल्या होत्या. यामध्ये मिठावरील कर रद्द करून मीठ बनवण्याची सरकारी मक्तेदारी रद्द करावी ही प्रमुख मागणी होती. परंतु सरकारने गांधीजींच्या मागण्या फेटाळून लावल्यामुळे गांधीजींनी मिठाचा कायदा मोडून देशभर सत्याग्रह करण्याचे ठरवले.




दांडी यात्रा

मीठ हा सामान्य जनतेच्या आहारातील महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे मिठासारख्या जीवनावश्यक वस्तूंवर कर लादणे अन्यायकारक होते. त्यामुळे गांधीजींनी मिठाचा सत्याग्रह केला. मिठाचा सत्याग्रह हा प्रतीकात्मक होता. ब्रिटिश सरकारचे जुलमी व अन्यायकारक कायदे शांततेच्या व सत्याग्रहाच्या मार्गाने मोडणे हा यामागचा व्यापक हेतू होता.

मिठाचा सत्याग्रह करण्यासाठी गांधीजींनी गुजरातच्या समुद्रकिनाऱ्यावरील दांडी या ठिकाणाची निवड केली. १२ मार्च १९३० रोजी गांधीजी ७८ सहकाऱ्यांसह साबरमती आश्रमातून दांडी येथे जाण्यास निघाले. सुमारे ३८५ किमीच्या पदयात्रेत मार्गावरील अनेक गावांमधून त्यांनी भाषणे केली. आपल्या भाषणातून गांधीजींनी जनतेला निर्भय होऊन कायदेभंग चळवळीत सामील होण्याचे आवाहन केले. गांधीजींच्या भाषणामुळे कायदेभंगाचा संदेश सर्वत्र पसरत गेला आणि चळवळीला अनुकूल वातावरण तयार झाले. ५ एप्रिल १९३० रोजी गांधीजी दांडी येथे पोहचले. ६ एप्रिल रोजी दांडीच्या समुद्र किनाऱ्यावरील मीठ उचलून गांधीजींनी मिठाचा कायदा मोडला आणि देशभर सविनय कायदेभंग चळवळ सुरू झाली.

**पेशावरचा सत्याग्रह :** वायव्य सरहद्द प्रांतात खान अब्दुल गफारखान हे गांधीजींचे निष्ठावान अनुयायी होते. त्यांना सरहद्द गांधी म्हणून ओळखले जाते. त्यांनी 'खुदा-इ-खिदमतगार' या संघटनेची स्थापना केली. २३ एप्रिल १९३० रोजी त्यांनी पेशावर येथे सत्याग्रह सुरू केला. सुमारे आठवडाभर पेशावर शहर सत्याग्रहींच्या ताब्यात होते. सरकारने गढवाल पलटणीला सत्याग्रहींवर गोळीबार करण्याचे आदेश दिले. परंतु गढवाल पलटणीचे अधिकारी चंद्रसिंग ठाकूर यांनी गोळीबार करण्यास नकार दिला. त्यामुळे लष्करी न्यायालयाने त्यांना जबर शिक्षा दिली.



खान अब्दुल गफारखान

महात्मा गांधींनी सुरू केलेल्या सविनय कायदेभंग आंदोलनामुळे ब्रिटिश सरकार अडचणीत आले. ४ मे १९३० रोजी गांधीजींना अटक करण्यात आली. देशभर दडपशाहीचे सत्र सुरू झाले. गांधीजींच्या अटकेचा देशभर निषेध करण्यात आला.

**सोलापूरचा सत्याग्रह :** सोलापूर येथील सत्याग्रहात गिरणी कामगार आघाडीवर होते. ६ मे १९३० रोजी सोलापुरात हरताळ पाळण्यात आला. याप्रसंगी सोलापूरमध्ये मोठा मोर्चा काढण्यात आला. तत्कालीन कलेक्टरने मोर्चावर गोळीबार करण्याचे आदेश दिला. यामध्ये शंकर शिवदारे यांच्यासह

अनेक स्वयंसेवक मृत्युमुखी पडले. परिणामी जनतेने पोलीस स्टेशन, रेल्वे स्टेशन, न्यायालये, म्युनिसिपल इमारती इत्यादींवर हल्ले केले. सरकारने मार्शल लॉ म्हणजेच लष्करी कायदा जारी केला. आंदोलन दडपण्यात आले. या आंदोलनात आघाडीवर असलेले मल्लाप्पा धनशेट्टी, श्रीकृष्ण सारडा, कुर्बान हुसेन व जगन्नाथ शिंदे यांना फाशी देण्यात आले.


मल्लाप्पा धनशेट्टी


श्रीकृष्ण सारडा


कुर्बान हुसेन


जगन्नाथ शिंदे


**धारासना सत्याग्रह :** गुजरातमधील धारासना येथील सत्याग्रहाचे नेतृत्व सरोजिनी नायडू यांनी केले. मिठाचा कायदा मोडण्यासाठी निघालेल्या सत्याग्रहींवर पोलिसांनी लाठीमार केला. सत्याग्रहीसुद्धा शांतपणे लाठ्यांचे प्रहार सहन करत होते. त्यांना औषधोपचारासाठी घेऊन गेल्यावर दुसरी तुकडी सत्याग्रह करण्यासाठी पुढे येत असे. असे अखंडपणे सुरू होते. महाराष्ट्रात वडाळा, मालवण, शिरोडा या ठिकाणी मिठाचे सत्याग्रह झाले.


सरोजिनी नायडू

जेथे मिठागरे नव्हती तेथे लोकांनी जंगलविषयक कायदे मोडायला सुरुवात केली. महाराष्ट्रात बिळाशी, संगमनेर, कळवण, चिरनेर, पुसद इत्यादी ठिकाणी जंगल सत्याग्रह झाले. आदिवासींनी जंगल सत्याग्रहात मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

**बाबू गेनूचे बलिदान :** मुंबईत परदेशी मालावर बहिष्कार आंदोलन सुरू होते. परदेशी मालाची वाहतूक करणारी वाहने आंदोलनकर्त्यांकडून अडवली जात. मुंबईतील गिरणीमध्ये काम करणारे बाबू गेनू सैद या आंदोलनात आघाडीवर होते. पोलिस बंदोबस्तात परदेशी माल घेऊन जाणारा एक ट्रक बाबू गेनूंच्या समोर आला. ट्रक अडवण्यासाठी ते रस्त्यावर आडवे पडले. पोलिसांनी धमकी देऊनही ते जागचे हलले नाहीत. अखेरीस ट्रक त्यांच्या अंगावरून गेला. यात बाबू गेनूंना हौतात्म्य प्राप्त झाले. बाबू गेनूंचे हे बलिदान राष्ट्रीय चळवळीला प्रेरणादायी ठरले.


बाबू गेनू



**माहीत आहे का तुम्हांला ?**

**कायदेभंगाच्या चळवळीची वैशिष्ट्ये :**

- आतापर्यंतच्या चळवळी या शहरी विभागापुरत्या मर्यादित होत्या. मात्र ही चळवळ देशव्यापी झाली. खेड्यापाड्यांतून जनतेने आपला सहभाग नोंदवला.
- यामध्ये स्त्रियांनीही मोठा सहभाग घेतला. कस्तुरबा गांधी, कमलादेवी चटोपाध्याय, अवंतिकाबाई गोखले, लीलावती मुन्शी, हंसाबेन मेहता यांनी सत्याग्रहींचे नेतृत्व केले.
- ही चळवळ पूर्णपणे अहिंसक पद्धतीने पार पडली. इंग्रज शासन जोरदार दडपशाही करत असतानाही जनतेने निःशस्त्र प्रतिकार केला. यामुळे भारतीय जनता निर्भय बनली.

**गोलमेज परिषद :** सविनय कायदेभंग आंदोलन सुरू असतानाच भारताशी संबंधित घटनात्मक प्रश्नांचा विचार करावा असे ब्रिटनचे प्रधानमंत्री रॅम्से मॅक्डोनाल्ड यांचे मत होते. याकरिता त्यांनी लंडनमध्ये एका परिषदेचे आयोजन केले. या परिषदेला गोलमेज परिषद असे म्हटले जाते. १९३० ते १९३२ या कालावधीत तीन गोलमेज परिषदांचे आयोजन करण्यात आले होते.

**पहिली गोलमेज परिषद :** रॅम्से मॅक्डोनाल्ड हे पहिल्या परिषदेचे अध्यक्ष होते. या परिषदेला भारत तसेच इंग्लंडमधील विविध प्रतिनिधी उपस्थित होते. यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर, सर तेजबहादूर सप्रू, बॅरिस्टर जीना इत्यादींचा सहभाग होता. केंद्रीय स्तरावर जबाबदार शासनपद्धती, भारतात संघराज्याची स्थापना अशा विविध विषयांवर या परिषदेत चर्चा झाली. या परिषदेत विविध राष्ट्रीय पक्ष व संस्थानिकांचे प्रतिनिधी उपस्थित होते. मात्र राष्ट्रीय सभेने या परिषदेत भाग घेतला नाही. राष्ट्रीय सभा ही देशाची प्रातिनिधिक संस्था होती. तिच्या सहभागाशिवाय गोलमेज परिषदेतील चर्चा निष्फळ ठरली.

**गांधी-आयर्विन करार :** गोलमेज परिषदेत दुसऱ्या फेरीतील चर्चेमध्ये राष्ट्रीय सभा सामील होईल अशी आशा ब्रिटिश प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केली. प्रधानमंत्र्यांचे आवाहन लक्षात घेता व्हॉईसरॉयने गांधीजी व अन्य नेत्यांना तुरुंगातून मुक्त केले. राष्ट्रीय सभेला मोकळेपणाने चर्चा करता यावी यासाठी पोषक वातावरण निर्माण केले. महात्मा गांधी आणि व्हॉईसरॉय आयर्विन यांच्यात समझोता झाला. यालाच गांधी-आयर्विन करार असे म्हणतात. या करारानुसार ब्रिटिश सरकारने भारताच्या प्रस्तावित राज्यघटनेमध्ये जबाबदार राज्यपद्धतीचा स्वीकार करण्याची हमी दिली. परिणामी राष्ट्रीय सभेने सविनय कायदेभंगाची चळवळ मागे घेतली आणि दुसऱ्या गोलमेज परिषदेतील चर्चेत सहभागी होण्याची तयारी दाखवली.

**दुसरी गोलमेज परिषद :** १९३१ साली दुसऱ्या गोलमेज परिषदेचे आयोजन करण्यात आले. या परिषदेस महात्मा गांधी राष्ट्रीय सभेचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहिले. राष्ट्रीय सभेप्रमाणे भारतातील निरनिराळ्या जाती-जमाती, पक्ष तसेच संस्थानिकांच्या प्रतिनिधींना बोलावण्यात आले होते. गोलमेज परिषदेत सरकारने अल्पसंख्याकांचा प्रश्न उपस्थित केला. या प्रश्नावर तसेच भावी संघराज्याच्या घटनेच्या स्वरूपाबाबत मतभेद झाले. गांधीजींनी मतैक्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला, परंतु ते अपयशी ठरले. अखेरीस निराश होऊन गांधीजी भारतात परतले.

**पुणे करार :** डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी गोलमेज परिषदांमध्ये दलितांचे प्रतिनिधित्व केले. तेथे त्यांनी दलितांसाठी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली. दुसऱ्या गोलमेज परिषदेनंतर ब्रिटिश प्रधानमंत्री रॅम्से मॅक्डोनाल्ड यांनी जातीय निवाडा जाहीर केला. त्यानुसार दलितांसाठी स्वतंत्र मतदारसंघ जाहीर करण्यात आले. जातीय निवाड्यानुसार हिंदू समाजाची झालेली विभागणी गांधीजींना मान्य नव्हती. म्हणून त्यांनी या निवाड्याविरुद्ध येरवडा तुरुंगात आमरण उपोषण सुरू केले. राष्ट्रीय सभेच्या नेत्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना त्यांच्या मागणीचा पुनर्विचार करण्याची विनंती केली. राष्ट्रहित लक्षात घेऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ही विनंती मान्य केली. १९३२ मध्ये महात्मा गांधी आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यात पुणे येथे एक करार झाला. हा करार 'पुणे करार' म्हणून प्रसिद्ध आहे. या करारानुसार दलितांसाठी स्वतंत्र मतदारसंघाऐवजी राखीव जागांची तरतूद करण्यात आली.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**तिसरी गोलमेज परिषद :** नोव्हेंबर १९३२ मध्ये इंग्लंडमध्ये तिसरी गोलमेज परिषद भरवण्यात आली. मात्र राष्ट्रीय सभेने या परिषदेवर बहिष्कार घातला. त्यामुळे ही परिषद अर्थहीन ठरली.

**सविनय कायदेभंगाची दुसरी फेरी :** दुसऱ्या गोलमेज परिषदेहून उद्विग्न मनाने गांधीजी भारतात आले. त्यांनी सविनय कायदेभंग आंदोलन पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला. गांधीजींना सरकारने ताबडतोब अटक केली. त्यामुळे जनतेमध्ये असंतोष निर्माण झाला.

सरकारने या चळवळीला अमानुष दडपशाहीने उत्तर दिले. सर्वत्र नागरी हक्कांची गळचेपी केली. राष्ट्रीय सभा व तिच्या सहयोगी संघटना बेकायदेशीर ठरवण्यात आल्या. त्यांची कार्यालये व निधी ताब्यात घेतले. राष्ट्रीय वर्तमानपत्रे व साहित्य यांच्यावर निर्बंध घालण्यात आले. अखेरीस एप्रिल १९३४ मध्ये गांधीजींनी चळवळ मागे घेतली आणि सविनय कायदेभंगाच्या आंदोलनाचे ऐतिहासिक पर्व संपले.

## स्वाध्याय

**१. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

(महात्मा गांधी, खुदा-इ-खिदमतगार, रॅम्से मॅक्डोनाल्ड, सरोजिनी नायडू)

(१) लंडनमध्ये ......... यांनी गोलमेज परिषदेचे आयोजन केले होते.

(२) खान अब्दुल गफारखान यांनी ......... या संघटनेची स्थापना केली.

(३) धारासना सत्याग्रहाचे नेतृत्व ......... यांनी केले.

(४) दुसऱ्या गोलमेज परिषदेला राष्ट्रीय सभेचे प्रतिनिधी म्हणून ......... उपस्थित होते.

**२. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

(१) चंद्रसिंग ठाकूर यांना लष्करी न्यायालयाने जबर शिक्षा केली.

(२) सोलापूरात सरकारने मार्शल लॉ म्हणजेच लष्करी कायदा जारी केला.

(३) पहिल्या गोलमेज परिषदेतील चर्चा निष्फळ ठरली.

(४) गांधीजींनी येरवडा तुरुंगात आमरण उपोषण सुरू केले.

**३. खालील प्रश्नांची २५ ते ३० शब्दांत उत्तरे लिहा.**

(१) गांधीजींनी मिठाचा कायदा मोडून देशभर सत्याग्रह करण्याचे का ठरवले ?

(२) राष्ट्रीय सभेने सविनय कायदेभंगाची चळवळ मागे का घेतली ?

**४. सविनय कायदेभंग आंदोलनाची पुढील कालरेषा पूर्ण करा.**

| १२ मार्च १९३० | ६ एप्रिल १९३० | २३ एप्रिल १९३० | ४ मे १९३० | ६ मे १९३० |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**उपक्रम**

(१) सविनय कायदेभंग चळवळीतील पुढील व्यक्तींच्या कार्याविषयी अधिक माहिती मिळवून छायाचित्रासह वर्गात प्रदर्शित करा. (अ) सरोजिनी नायडू (ब) खान अब्दुल गफारखान (क) बाबू गेनू सैद

(२) पाठात उल्लेख केलेली सविनय कायदेभंग चळवळीतील ठिकाणे भारताच्या नकाशा आराखड्यात दर्शवा.

8X6325

# ९. स्वातंत्र्यलढ्याचे अंतिम पर्व

या पाठामध्ये आपण छोडो भारत आंदोलन, भूमिगत चळवळ, आझाद हिंद सेनेचे कार्य याचा अभ्यास करणार आहोत.

**१९३५ चा कायदा :** या कायद्याने भारतात ब्रिटिशशासित प्रांत आणि संस्थाने यांचे मिळून एक संघराज्य स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली. यानुसार ब्रिटिशशासित प्रदेशांचा कारभार भारतीय प्रतिनिधींच्या हाती सोपवण्यात येणार होता. संस्थानांना संघराज्यात सामील झाल्यास स्वायत्तता राहणार नव्हती, त्यामुळे संस्थानिकांनी संघराज्यात सामील होण्यास नकार दिला. म्हणून या कायद्यातील संघराज्याची योजना अमलात आली नाही.

**प्रांतिक मंत्रिमंडळे :** १९३५ च्या कायद्याने राष्ट्रीय सभेचे समाधान झाले नाही, तरीही या कायद्यानुसार होणाऱ्या प्रांतिक कायदेमंडळांच्या निवडणुकांमध्ये राष्ट्रीय सभेने भाग घेण्याचे ठरवले. १९३७ मध्ये देशातील अकरा प्रातांमध्ये निवडणुका झाल्या. त्यांपैकी आठ प्रांतांमध्ये राष्ट्रीय सभेला बहुमत मिळून त्यांची मंत्रिमंडळे सत्तेवर आली. इतर तीन प्रांतांमध्ये कोणत्याही एका पक्षाला बहुमत न मिळाल्याने तेथे संमिश्र मंत्रिमंडळे बनवण्यात आली.


राष्ट्रीय सभेच्या मंत्रिमंडळांनी राजबंद्यांची तुरुंगातून मुक्तता, मूलोद्योग शिक्षणाची सुरुवात, दलित समाजाच्या सुधारणेसाठी उपाययोजना, दारूबंदी, शेतकऱ्यांसाठी कर्जनिवारण कायदा यांसारखी अनेक लोकोपयोगी कामे केली.

**क्रिप्स योजना :** दुसऱ्या महायुद्धात इंग्लंडने जपानच्या विरोधात अमेरिकेचा पक्ष घेतला. जपानी फौजा भारताच्या पूर्व सीमेनजीक येऊन धडकल्या. जपानने भारतावर आक्रमण केल्यास त्याला प्रतिकार करण्यासाठी भारतीयांचे सहकार्य मिळवणे इंग्लंडला आवश्यक वाटू लागले. म्हणून इंग्लंडचे प्रधानमंत्री विन्स्टन चर्चिल यांनी स्टॅफर्ड क्रिप्स यांना भारतात पाठवले. मार्च १९४२ मध्ये त्यांनी भारताविषयी एक योजना भारतीयांपुढे मांडली. परंतु या योजनेमुळे कोणत्याही राजकीय पक्षाचे समाधान झाले नाही. पूर्ण स्वातंत्र्याच्या मागणीचा स्पष्ट उल्लेख या योजनेत नसल्याने राष्ट्रीय सभेने ती योजना नामंजूर केली. क्रिप्स योजनेत पाकिस्तानच्या निर्मितीचा समावेश नसल्याने मुस्लीम लीगनेही ही योजना फेटाळली.

**दुसरे महायुद्ध आणि राष्ट्रीय सभा :** १९३९ मध्ये युरोपात दुसरे महायुद्ध सुरू झाले. तत्कालीन व्हॉईसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांनी भारत इंग्लंडच्या बाजूने युद्धात सामील झाल्याची घोषणा केली. युरोपात लोकशाहीचे रक्षण करण्यासाठी आपण लढत असल्याचा दावा इंग्लंडने केला. हा दावा खरा असेल तर इंग्लंडने भारताला ताबडतोब स्वातंत्र्य द्यावे, अशी मागणी राष्ट्रीय सभेने केली. ही मागणी पूर्ण करण्यास इंग्लंडने नकार दिल्याने नोव्हेंबर १९३९ मध्ये राष्ट्रीय सभेच्या प्रांतिक मंत्रिमंडळांनी राजीनामे दिले.

**छोडो भारत चळवळ :** क्रिप्स योजनेनंतर राष्ट्रीय सभेने स्वातंत्र्यासाठी प्रखर चळवळ करण्याचा निर्धार केला. वर्धा येथे १४ जुलै १९४२ रोजी राष्ट्रीय सभेच्या कार्यकारिणीने भारतातील ब्रिटिश सत्ता ताबडतोब संपुष्टात आणून भारताला स्वातंत्र्य देण्याची मागणी करणारा ठराव संमत केला. ही मागणी मान्य न झाल्यास राष्ट्रीय सभा भारताच्या स्वातंत्र्यासाठी अहिंसक चळवळ सुरू करेल, असा इशाराही देण्यात आला.

**छोडो भारत ठराव :** ७ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईच्या गवालिया टँक मैदानावर (क्रांती मैदान) राष्ट्रीय सभेचे अधिवेशन सुरू झाले. या अधिवेशनाचे अध्यक्ष मौलाना अबुल कलाम आझाद हे होते. ब्रिटिशांनी भारत सोडून जावे, या राष्ट्रीय सभेच्या कार्यकारिणीने वर्धा येथे मंजूर केलेल्या ठरावावर मुंबई येथील अधिवेशनात शिक्कामोर्तब होणार होते.



मौलाना आझाद

८ ऑगस्ट रोजी पंडित जवाहरलाल नेहरूंनी मांडलेला हा 'छोडो भारत' ठराव प्रचंड बहुमताने मंजूर झाला. गांधीजींच्या नेतृत्वाखाली देशव्यापी अहिंसक आंदोलन सुरू करण्याचाही निर्णय घेण्यात आला. गांधीजी म्हणाले, ''या क्षणापासून तुमच्यापैकी प्रत्येक स्त्री-पुरुषाने आपण स्वतंत्र झालो आहोत, असे समजले पाहिजे आणि स्वतंत्र भारताचा नागरिक म्हणून वागले पाहिजे... आपण भारताला स्वतंत्र तरी करू किंवा हे भगीरथ प्रयत्न करत असताना मरून तरी जाऊ.'' गांधीजींनी जनतेला 'करेंगे या मरेंगे' या भावनेने बलिदानास सिद्ध होण्याचे स्फूर्तिदायक आवाहन केले.

**जनआंदोलनाला प्रारंभ :** राष्ट्रीय सभेच्या प्रमुख नेत्यांना अटक झाल्याचे वृत्त देशभर पसरले. संतप्त जनतेने जागोजागी मिरवणुका काढल्या. पोलिसांनी जनतेवर लाठीहल्ले आणि गोळीबार केला, तरी लोक घाबरले नाहीत. काही ठिकाणी ब्रिटिश सरकारच्या दडपशाहीचे प्रतीक असणारे तुरुंग, पोलीस ठाणी, रेल्वे स्थानके इत्यादी ठिकाणी आंदोलकांनी हल्ले केले.

**चला जाणून घेऊया...**

**वैयक्तिक सत्याग्रह :** ब्रिटिश सरकार मागण्यांकडे सातत्याने दुर्लक्ष करत असल्यामुळे राष्ट्रीय सभेने युद्धविरोधी प्रचार करण्याचे ठरवले. यासाठी सामुदायिक चळवळ न करता एकेका व्यक्तीने कायदेभंग करावा असा निर्णय घेण्यात आला. यालाच वैयक्तिक सत्याग्रह असे म्हणतात. आचार्य विनोबा भावे हे वैयक्तिक सत्याग्रहाचे पहिले सत्याग्रही होते. त्यांच्यानंतर सुमारे पंचवीस हजार सत्याग्रहींनी वैयक्तिक सत्याग्रहात भाग घेऊन तुरुंगवास स्वीकारला.



आचार्य विनोबा भावे

सरकारी कचेऱ्या ताब्यात घेण्याचे प्रयत्न केले. महाराष्ट्रात चिमूर, आष्टी, यावली, महाड, गारगोटी इत्यादी अनेक गावांतून आबालवृद्धांनी नेटाने आणि असीम धैर्याने दिलेले लढे अविस्मरणीय ठरले.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

**स्फूर्तिगाथा बालवीरांची...**

स्वातंत्र्य चळवळीमध्ये शाळकरी विद्यार्थ्यांनीही योगदान दिले. नंदूरबार येथे शाळेतील विद्यार्थ्यांनी शिरीषकुमार याच्या नेतृत्वाखाली तिरंगी झेंडा घेऊन मिरवणूक काढली. 'वंदे मातरम्'च्या घोषणा दिल्या. पोलिसांनी चिडून छोट्या मुलांवरही गोळीबार केला. या गोळीबारात शिरीषकुमार, लालदास, धनसुखलाल, शशिधर, घनश्याम हे शाळकरी विद्यार्थी हुतात्मे झाले.



शिरीषकुमार



जयप्रकाश नारायण

**भूमिगत चळवळ :** १९४२ च्या अखेरीस जनआंदोलनाला नवे वळण मिळाले. आंदोलनाचे नेतृत्व तरुण समाजवादी कार्यकर्त्यांकडे आले. जयप्रकाश नारायण, डॉ. राममनोहर लोहिया, छोटूभाई पुराणिक, अच्युतराव पटवर्धन, अरुणा असफअली, युसुफ मेहेरअली, सुचेता कृपलानी, एस. एम. जोशी, शिरूभाऊ लिमये, ना.ग.गोरे, यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, मगनलाल बागडी, उषा मेहता यांसारखे अनेक नेते आघाडीवर होते. रेल्वेमार्गाची मोडतोड करणे, टेलिफोनच्या तारा तोडणे, पूल उद्ध्वस्त करणे इत्यादी मार्गांनी आंदोलकांनी दळणवळण व सरकारी यंत्रणा विस्कळीत केली. संपूर्ण भारतात आंदोलनाचे पडसाद उमटले.



अरुणा असफअली



अच्युतराव पटवर्धन

सिंध प्रातांत हेमू कलानी यांनी हत्यारबंद ब्रिटिश सेना घेऊन जाणारी रेल्वे येत असल्याचे वृत्त कळताच आपल्या साथीदारांसह रेल्वमार्ग उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न केला. न्यायालयाने त्यांना फाशीची शिक्षा सुनावली.

सध्याच्या रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यामधील भाई कोतवाल यांचा 'आझाद दस्ता', नागपूरच्या जनरल आवारी यांची 'लाल सेना' अशा गटांनी कित्येक महिने सरकारला सळो की पळो करून सोडले. मुंबईला विठ्ठल जव्हेरी, उषा मेहता व त्यांच्या साथीदारांनी एक गुप्त प्रक्षेपण केंद्र स्थापन केले. त्याला 'आझाद रेडिओ' म्हणत. त्यावर राष्ट्रभक्तीची गीते गायली जात. देशातील आंदोलनाच्या बातम्या प्रसारित केल्या जात. देशभक्तिपर भाषणे प्रक्षेपित केली जात. यामुळे आंदोलन चालवण्यास जनतेला प्रोत्साहन मिळे. अशी प्रक्षेपण केंद्रे कोलकता, दिल्ली व पुणे येथे काही काळ चालली.


**प्रतिसरकारांची स्थापना :** देशाच्या काही भागांत ब्रिटिश अधिकाऱ्यांची हकालपट्टी करून तेथे लोकाभिमुख सरकारे स्थापन केली. यालाच प्रतिसरकार असे म्हणतात. बंगालमधील मिदनापूर, उत्तर प्रदेशातील बालिया व आझमगड, बिहारमधील भागलपूर व पूर्णिया या जिल्ह्यांत प्रतिसरकारे स्थापन करण्यात आली.

महाराष्ट्रात सातारा जिल्ह्यात क्रांतिसिंह नाना पाटील यांनी १९४२ साली ब्रिटिश शासन संपुष्टात आणून प्रतिसरकार स्थापन केले. कुंडल येथील क्रांतिअग्रणी जी.डी. उर्फ बापू लाड यांच्या नेतृत्वाखालील स्थापन झालेल्या तुफान सेनेच्या माध्यमातून कर गोळा करणे, कायदा व सुव्यवस्था टिकवणे, गुन्हेगारांना शासन करणे यासारखी कामे प्रतिसरकारमार्फत केली जात. या सरकारने नेमलेल्या लोकन्यायालयाद्वारे केलेला न्यायनिवाडा लोक स्वीकारत असत. सावकारशाहीला विरोध, दारूबंदी, साक्षरता प्रसार, जातिभेद निर्मूलन अशी अनेक विधायक कामे या सरकारने केली. त्यामुळे प्रतिसरकार जनतेचे प्रेरणास्थान ठरले.



क्रांतिसिंह नाना पाटील

**चलेजाव चळवळीचे महत्त्व :** १९४२ च्या चळवळीने देशव्यापी आंदोलनाचे स्वरूप धारण केले. स्वातंत्र्यप्राप्तीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी लक्षावधी भारतीयांनी असीम त्याग केला. अनेकांनी आत्मबलिदान केले. आंदोलकांची संख्याच इतकी प्रचंड होती की, त्यांना डांबून ठेवायला देशातील तुरुंगही अपुरे पडले. साने गुरुजी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज इत्यादींच्या राष्ट्रभक्तीपर गीतांनी आंदोलकांचा उत्साह वाढवला. या राष्ट्रव्यापी आंदोलनाला 'ऑगस्ट क्रांती' असेही म्हटले जाते.



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

**आझाद हिंद सेना :** भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी अभूतपूर्व प्रयत्न केला. भारताच्या पूर्व सीमेवर हजारो भारतीय सैनिक ब्रिटिशांविरोधात युद्ध करण्यास उभे राहिले. हे सारे सैनिक आझाद हिंद सेनेचे होते. त्यांचे नेते होते नेताजी सुभाषचंद्र बोस.

सुभाषचंद्र बोस हे राष्ट्रीय सभेचे महत्त्वपूर्ण नेते होते. त्यांनी दोन वेळा राष्ट्रीय सभेचे अध्यक्षस्थान भूषवले. इंग्लंड दुसऱ्या महायुद्धात गुंतले असल्याचा



नेताजी सुभाषचंद्र बोस

फायदा घेऊन भारतात आंदोलन तीव्र करावे. त्यासाठी इंग्रजांच्या शत्रूचीही मदत घ्यावी, असे सुभाषबाबूंचे मत होते. परंतु याबाबत राष्ट्रीय सभेच्या ज्येष्ठ नेत्यांशी त्यांचे मतभेद झाले. परिणामी सुभाषबाबूंनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. आपले विचार जनतेपुढे मांडण्यासाठी त्यांनी 'फॉरवर्ड ब्लॉक' हा पक्ष स्थापन केला.

सुभाषचंद्र बोस आपल्या भाषणातून ब्रिटिश सत्तेविरुद्ध उठाव करण्याचे आवाहन भारतीयांना करू लागले. त्यामुळे सरकारने त्यांना बंदिवासात टाकले. तुरुंगात सुभाषबाबूंनी प्राणांतिक उपोषण सुरू केल्याने शासनाने त्यांना मुक्त करून त्यांच्या घरी नजरकैदेत ठेवले. तेथून वेषांतर करून सुभाषबाबूंनी सुटका करून घेतली. १९४१ च्या एप्रिलमध्ये ते जर्मनीला पोहचले. तेथे त्यांनी फ्री इंडिया सेंटर स्थापन केले. जर्मनीच्या बर्लिन रेडिओ केंद्रावरून भारताच्या स्वातंत्र्यासाठी जनतेने सशस्त्र लढ्यात भाग घेण्याचे आवाहन केले. याच काळात रासबिहारी बोस यांनी सुभाषबाबूंना जपानला येण्याचे निमंत्रण दिले.



रासबिहारी बोस

**आझाद हिंद सेनेची स्थापना :** रासबिहारी बोस १९१५ पासून जपानमध्ये राहत होते. आग्नेय आशियातील देशप्रेमी भारतीयांना संघटित करून त्यांनी 'इंडियन इंडिपेंडन्स लीग' नावाची संघटना स्थापन केली. १९४२ च्या पूर्वार्धात जपानने आग्नेय आशियातील ब्रिटिशांच्या ताब्यातील प्रदेश जिंकले. तेथील ब्रिटिश सैन्यातील हजारो भारतीय सैनिक व अधिकारी जपानच्या हाती लागले. युद्धबंदी झालेल्या भारतीय सैनिकांची एक पलटण कॅ. मोहनसिंग यांच्या मदतीने रासबिहारी बोस यांनी तयार केली. तिला 'आझाद हिंद सेना' असे नाव दिले. पुढे नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी आझाद हिंद सेनेचे नेतृत्व केले.

१९४३ च्या ऑक्टोबरमध्ये नेताजींनी सिंगापूर येथे आझाद हिंद सरकार स्थापन केले. शहानवाझ खान, जगन्नाथ भोसले, डॉ. लक्ष्मी स्वामीनाथन गुरूबक्षसिंग धिल्लाँ, प्रेमकुमार सेहगल इत्यादी त्यांचे प्रमुख सहकारी होते. कॅप्टन लक्ष्मी स्वामीनाथन या झाशीची राणी महिला पथकाच्या प्रमुख होत्या. नेताजी सुभाषचंद्रांनी भारतीय जनतेला 'तुम मुझे खून दो, मैं तुम्हें आझादी दूँगा ।' असे आवाहन केले.

**आझाद हिंद सेनेचा पराक्रम :** नोव्हेंबर १९४३ मध्ये जपानने अंदमान व निकोबार बेटे जिंकून ती आझाद हिंद सरकारच्या स्वाधीन केली. नेताजींनी त्यांना अनुक्रमे 'शहीद' आणि 'स्वराज्य' अशी नावे दिली. १९४४ मध्ये आझाद हिंद सेनेने म्यानमारमधील आराकानचा प्रदेश मिळवला. आसामच्या पूर्व सीमेवरील ठाणी जिंकली. याच काळात आझाद हिंद सेनेला जपानकडून मिळणारी मदत बंद झाल्याने इम्फाळची मोहीम अर्धवट राहिली. मात्र प्रतिकूल परिस्थितीतही आझाद हिंद सेनेचे सैनिक नेटाने लढत होते. परंतु याच काळात जपानने शरणागती पत्करली. १८ ऑगस्ट १९४५ रोजी विमान अपघातात सुभाषचंद्र बोस यांचे निधन झाले. या पार्श्वभूमीवर आझाद हिंद सेनेला शस्त्रे खाली ठेवावी लागली. अशा रीतीने आझाद हिंद सेनेच्या लढ्याचे रोमहर्षक पर्व संपले.

पुढे आझाद हिंद सेनेच्या अधिकाऱ्यांवर ब्रिटिश सरकारने राजद्रोहाचा आरोप ठेवला. पं. जवाहरलाल नेहरू, भुलाभाई देसाई, तेजबहादूर सप्रू यांसारख्या निष्णात कायदेपंडितांनी त्यांच्या बचावाचे काम केले. मात्र लष्करी न्यायालयाने या अधिकाऱ्यांना दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. त्यामुळे भारतीय जनतेत ब्रिटिश शासनाविरुद्ध प्रखर असंतोष निर्माण झाला. अखेरीस लष्करी न्यायालयाने दिलेल्या शिक्षा

सरकारला रद्द कराव्या लागल्या.

**भारतीय नौदल व विमान दलातील उठाव :** आझाद हिंद सेनेच्या प्रेरणेतून नौसैनिकांमध्ये व वायुसैनिकांमध्ये ब्रिटिश सत्तेविरुद्ध असंतोष निर्माण झाला. त्याचा उद्रेक १८ फेब्रुवारी १९४६ रोजी मुंबई येथील 'तलवार' या ब्रिटिश युद्धनौकेवर झाला. सैनिकांनी युद्धनौकेवर तिरंगी ध्वज फडकावला. ब्रिटिश सत्तेविरुद्ध घोषणा दिल्या. ब्रिटिश सरकारने लष्कर पाठवून नौसैनिकांवर गोळीबार केला. त्याला उठावकऱ्यांनी गोळीबारानेच उत्तर दिले. मुंबईतील कामगार आणि सामान्य लोकांनी नौसैनिकांना पाठिंबा दिला. अखेरीस सरदार वल्लभभाई पटेल यांच्या मध्यस्थीने नौसैनिकांनी शस्त्रे खाली ठेवली.

मुंबईतील नौसैनिकांच्या उठावाला पाठिंबा देण्यासाठी दिल्ली, लाहोर, कराची, अंबाला, मेरठ इत्यादी ठिकाणच्या हवाईदलातील अधिकाऱ्यांनीही संप पुकारला. हे उठाव राज्यकर्त्यांविरोधी असंतोषाची भावना शिगेला पोहोचल्याचे निदर्शक होते. अशा प्रकारे १९४२ ते १९४६ या काळात भारतातील ब्रिटिश सत्तेचा पाया खिळखिळा झाला. 'छोडो भारत' आंदोलनातून भारतीय जनतेचा प्रखर ब्रिटिशविरोध व्यक्त झाला. लष्कर, नौदल व विमानदल हे ब्रिटिश सत्तेचे आधारस्तंभ होते. तेही आता ब्रिटिशविरोधी बनू लागले. या सर्व घटनांमुळे भारतावरील आपली सत्ता फार काळ टिकवता येणार नाही, याची जाणीव ब्रिटिश राज्यकर्त्यांना झाली.

## स्वाध्याय

**१. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

(अंदमान व निकोबार, ऑगस्ट क्रांती, विनोबा भावे)

(१) वैयक्तिक सत्याग्रहाचे ............ हे पहिले सत्याग्रही होते.

(२) १९४२ च्या राष्ट्रव्यापी आंदोलनाला .......... असे म्हटले जाते.

(३) नोव्हेंबर १९४३ मध्ये जपानने ....... बेटे जिंकून ती आझाद हिंद सरकारच्या स्वाधीन केली.

**२. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

(१) नोव्हेंबर १९३९ मध्ये राष्ट्रीय सभेच्या प्रांतिक मंत्रिमंडळांनी राजीनामे दिले.

(२) आझाद हिंद सेनेला शस्त्रे खाली ठेवावी लागली.

(३) प्रतिसरकार जनतेचे प्रेरणास्थान ठरले.

**३. पुढील तक्ता पूर्ण करा.**

| संघटना | संस्थापक |
|---|---|
| फॉरवर्ड ब्लॉक | |
| इंडियन इंडिपेंडन्स लीग | |
| तुफान सेना | |

**४. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) शिरीषकुमारचे कार्य तुम्हांस कसे प्रेरणादायी आहे?

(२) इंग्लंडचे प्रधानमंत्री विन्स्टन चर्चिल यांनी स्टॅफर्ड क्रिप्स यांना भारतात का पाठवले ?

(३) राष्ट्रीय सभेच्या प्रमुख नेत्यांना अटक झाल्याचे वृत्त देशभर पसरल्यावर कोणती प्रतिक्रिया उमटली?

**उपक्रम**

(१) आझाद हिंद सेनेने दिलेल्या लढ्यातील घटनांची कालरेषा तयार करा.

(२) १९४२ च्या छोडो भारत आंदोलनाची छायाचित्रे आंतरजालाच्या साहाय्याने मिळवून राष्ट्रीय दिनांच्या निमित्ताने त्यांचे प्रदर्शन आयोजित करा.

965TVX

# १०. सशस्त्र क्रांतिकारी चळवळ

ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध भारतात विविध मार्गांनी आंदोलने झाली. त्यांतील एक मार्ग सशस्त्र क्रांतीचा होता. त्याची ओळख आपण या पाठात करून घेणार आहोत.

सन १८५७ पूर्वी इंग्रजी सत्तेविरुद्ध झालेले उठाव आणि १८५७ चा स्वातंत्र्यलढा यांचा अभ्यास आपण केला आहे. त्यानंतरच्या काळात रामसिंह कुका यांनी पंजाबमध्ये सरकारविरोधी उठावाचे आयोजन केले होते.

**वासुदेव बळवंत फडके :** महाराष्ट्रात इंग्रजांविरुद्ध सशस्त्र लढा वासुदेव बळवंत फडके यांनी दिला. ब्रिटिश साम्राज्याशी शस्त्राने लढले पाहिजे अशी त्यांची धारणा झाली. त्यांनी वस्ताद लहूजी साळवे यांच्याकडे शस्त्रविद्येचे शिक्षण घेतले. ब्रिटिश सत्तेविरुद्ध सशस्त्र उठाव करण्यासाठी त्यांनी रामोशी बांधवांना संघटित करून बंड पुकारले. हे बंड अयशस्वी झाले. ब्रिटिश सरकारने त्यांची रवानगी एडनच्या कारागृहात केली. तेथेच त्यांचा १८८३ मध्ये मृत्यू झाला. स्वातंत्र्यासाठी त्यांनी सशस्त्र लढा उभारला.



वासुदेव बळवंत फडके

**चाफेकर बंधू :** सन १८९७ साली पुण्यात प्लेगच्या साथीचा बंदोबस्त करताना प्लेग कमिशनर रँड याने जुलूम-जबरदस्ती केली. त्याचा बदला म्हणून दामोदर व बाळकृष्ण या चाफेकर बंधूंनी २२ जून १८९७ रोजी रँडचा वध केला. दामोदर, बाळकृष्ण व वासुदेव हे तीन बंधू व त्यांचे सहकारी महादेव रानडे यांना फाशी झाली. एकाच घरातील तीन भावांनी देशसेवेसाठी हौतात्म्य पत्करले.

याच सुमारास बिहारमधील मुंडा आदिवासींनी बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली सरकारविरुद्ध फार मोठा उठाव केला.

**अभिनव भारत :** सन १९०० मध्ये स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी नाशिक येथे 'मित्रमेळा' ही क्रांतिकारकांची गुप्त संघटना स्थापन केली. १९०४ साली याच संघटनेला 'अभिनव भारत' असे नाव देण्यात आले. उच्च शिक्षण घेण्याच्या निमित्ताने सावरकर इंग्लंडला गेले. तेथून त्यांनी अभिनव भारत संघटनेच्या भारतातील सदस्यांना क्रांतिकारी वाङ्मय, पिस्तुले इत्यादी साहित्य पाठवण्यास सुरुवात केली. त्यांनी जोसेफ मॅझिनी या प्रसिद्ध इटालियन क्रांतिकारकाचे स्फूर्तिदायी चरित्र लिहिले. १८५७ चा उठाव हे पहिले भारतीय स्वातंत्र्ययुद्ध होते. असे प्रतिपादन करणारा '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' हा ग्रंथ त्यांनी लिहिला.



स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर

**माहीत आहे का तुम्हांला ?**

पन्नास वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा भोगण्यासाठी स्वा. सावरकरांना अंदमानला नेण्यात आले. ते तिथे दहा वर्षे होते. 'माझी जन्मठेप' या आत्मचरित्रात सावरकरांनी अंदमानातील त्या भयंकर दिवसांचे अनुभव लिहून ठेवले आहेत. पुढे सरकारने त्यांना रत्नागिरी येथे नेऊन स्थानबद्ध केले. तेथे सावरकरांनी जातिभेद निर्मूलन, अस्पृश्यता निवारण, सहभोजन, भाषाशुद्धीकरण अशा सामाजिक चळवळी केल्या. ते एक थोर साहित्यिक होते. १९३८ साली मुंबई येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते.

सरकारला अभिनव भारत संघटनेच्या कार्याचा सुगावा लागला. त्यामुळे सरकारने बाबाराव सावरकर यांना अटक केली. त्यांना जन्मठेपेची शिक्षा झाली. या शिक्षेचा बदला घेण्यासाठी अनंत लक्ष्मण कान्हेरे या युवकाने नाशिकचा कलेक्टर जॅक्सन याचा वध केला. सरकारने अभिनव भारत संघटनेशी संबंधित असलेल्या लोकांना अटक करण्यास सुरुवात केली. जॅक्सनच्या वधाचा संबंध सरकारने स्वातंत्र्यवीर सावरकरांशी जोडला आणि त्यांना अटक करून त्यांच्यावर खटला भरला. न्यायालयाने त्यांना पन्नास वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा फर्मावली.

**बंगालमधील क्रांतिकारी चळवळ :** बंगालच्या फाळणीनंतर ब्रिटिशविरोधी प्रक्षोभ अधिकच तीव्र झाला. स्थानिक उठावांच्या जागी व्यापक अशा क्रांतिकारी चळवळीचा राष्ट्रीय पातळीवर उदय होऊ लागला. देशातील विविध भागांत क्रांतिकारी विचारांनी भारावलेले तरुण आपल्या गुप्त संघटना स्थापन करू लागले. ब्रिटिश अधिकाऱ्यांना जरब बसवणे, ब्रिटिश शासनयंत्रणा खिळखिळी करणे, ब्रिटिश सरकारचा लोकांना वाटणारा दरारा नाहीसा करणे, ब्रिटिशांची सत्ता उलथून टाकणे ही त्यांची प्रमुख उद्दिष्टे होती.

बंगालमध्ये 'अनुशीलन समिती' ही क्रांतिकारी संघटना कार्यरत होती. अनुशीलन समितीच्या पाचशेच्या वर शाखा होत्या. अरविंद घोष यांचे बंधू बारींद्रकुमार घोष हे या संघटनेचे प्रमुख होते. अरविंद घोष यांचा सल्ला व मार्गदर्शन या संघटनेला लाभत असे. कोलकत्याजवळील माणिकताळा येथे या समितीचे बाँब तयार करण्याचे केंद्र होते.

१९०८ साली खुदीराम बोस व प्रफुल्ल चाकी या अनुशीलन समितीच्या सदस्यांनी किंग्जफोर्ड या न्यायाधीशाला ठार करण्याची योजना आखली; परंतु ज्या गाडीवर त्यांनी बाँब टाकला ती गाडी किंग्जफोर्डची नव्हती. या हल्ल्यात गाडीतील दोन इंग्लिश स्त्रिया मृत्युमुखी पडल्या. इंग्रजांच्या हाती सापडू नये म्हणून प्रफुल्ल चाकी यांनी स्वतःवर गोळी झाडून घेतली. खुदीराम बोस पोलिसांच्या हाती लागले. त्यांना फाशी देण्यात आले. या प्रकरणाचा तपास करत असताना अनुशीलन समितीच्या कार्याची माहिती पोलिसांना झाली. त्यांनी या संघटनेच्या सदस्यांची धरपकड सुरू केली. अरविंद घोष यांनाही अटक करण्यात आली. अरविंदबाबूंचा संबंध बाँब तयार करण्याशी जोडण्यात सरकारला अपयश आल्याने त्यांना न्यायालयाने निर्दोष सोडले. अन्य सदस्यांना दीर्घ मुदतीच्या शिक्षा ठोठावण्यात आल्या.


रासबिहारी बोस व सचिंद्रनाथ संन्याल यांनी क्रांतिकारी संघटनांचे जाळे बंगालबाहेर विस्तारले. पंजाब, दिल्ली, उत्तर प्रदेश येथे क्रांतिकार्याची केंद्रे उभारली. व्हाइसरॉय लॉर्ड हार्डिंगवर बाँब फेकण्याचे धाडसी कृत्य रासबिहारी बोस व त्यांच्या सहकाऱ्याने केले. पण हल्ल्यातून लॉर्ड हार्डिंग्ज बचावला.

मद्रास प्रांतातही क्रांतिकार्य चालू होते. वांची अय्यर या क्रांतिकारकाने ॲश या ब्रिटिश अधिकाऱ्याला ठार केले. त्यानंतर त्याने स्वतःवर गोळी झाडून आत्माहुती दिली.

**इंडिया हाउस :** भारतातील क्रांतिकार्याला परदेशातील भारतीय क्रांतिकारकांकडून साहाय्य मिळत असे. लंडन येथील इंडिया हाउस हे अशा साहाय्याचे महत्त्वाचे केंद्र होते. पं.श्यामजी कृष्ण वर्मा या भारतीय देशभक्ताने इंडिया हाउसची स्थापना केली होती. या संस्थेमार्फत भारतीय तरुणांना इंग्लंडमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती दिल्या जात असत. स्वातंत्र्यवीर सावरकरांना अशी शिष्यवृत्ती मिळाली होती. मादाम कामा यांनी जर्मनीत स्टुटगार्ड



पं.श्यामजी कृष्ण वर्मा



मादाम कामा

येथे भरलेल्या जागतिक समाजवादी परिषदेत भारताच्या स्वातंत्र्याचा प्रश्न उपस्थित केला. याच परिषदेत त्यांनी भारताचा ध्वज फडकावला होता. इंडिया हाउसशी निगडित असलेला दुसरा क्रांतिकारी म्हणजे मदनलाल धिंग्रा हा तरुण होय. त्यांनी कर्झन वायली या इंग्रज अधिकाऱ्याला ठार केले. त्याबद्दल धिंग्रा यांना फाशी देण्यात आले.

**गदर चळवळ :** पहिल्या महायुद्धाच्या काळात ब्रिटिशविरोधी क्रांतिकारी कार्याला गती मिळाली. ब्रिटिशांच्या शत्रूंची मदत घेऊन भारतामध्ये सत्तांतर घडवून आणता येईल, भारतीय सैनिकांची या प्रयत्नात साथ घेता येईल, असे क्रांतिकारकांना वाटत होते. या संधीचा लाभ घेण्यासाठी क्रांतिकारक संघटना स्थापना झाल्या. 'गदर' ही त्यांतील एक प्रमुख संघटना होती.

अमेरिका व कॅनडा येथील भारतीयांनी 'गदर' या संघटनेची स्थापना केली होती. लाला हरदयाळ, भाई परमानंद, डॉ. पांडुरंग सदाशिव खानखोजे इत्यादी क्रांतिकारक या संघटनेचे प्रमुख नेते होते. 'गदर' म्हणजे विद्रोह. 'गदर' हे या संघटनेच्या मुखपत्राचे नाव होते. या मुखपत्रातून ब्रिटिश राजवटीचे भारतावरील दुष्परिणाम विशद करण्यात येत. भारतीय क्रांतिकारकांच्या साहसी कृत्यांची माहिती सांगितली जाई. अशा प्रकारे राष्ट्रप्रेम व सशस्त्र क्रांती यांचा संदेश 'गदर' या मुखपत्राने भारतीयांना दिला.

ब्रिटिशविरोधी उठाव करण्यासाठी 'गदर' संघटनेच्या नेत्यांनी युद्धजन्य परिस्थितीचा फायदा घेण्याचे ठरवले. त्यांनी पंजाबमध्ये ब्रिटिशांविरुद्ध उठाव करण्यासाठी योजना आखली. लष्करामधील भारतीय सैनिकांना उठावात सामील होण्यासाठी उद्युक्त केले. रासबिहारी बोस आणि विष्णु गणेश पिंगळे यांनी उठावाचे नेतृत्व करावे असे ठरले. पण फितुरीमुळे ब्रिटिशांना या योजनेचा सुगावा लागला. पिंगळे पोलिसांच्या हाती सापडले. त्यांना फाशी देण्यात आली. रासबिहारी बोस मात्र निसटून जाण्यात यशस्वी झाले. जपानमध्ये जाऊन त्यांनी आपले क्रांतिकार्य सुरू ठेवले.

युद्धकाळात परदेशात अन्यत्रही क्रांतिकारी चळवळ कार्यरत होती. बर्लिनमध्ये वीरेंद्रनाथ चट्टोपाध्याय, भूपेन दत्त आणि हरदयाळ यांनी जर्मन परराष्ट्र खात्याच्या सहकार्याने ब्रिटिशविरोधी योजना आखल्या. सन १९१५ मध्ये महेंद्रप्रताप, बरकतुल्ला व ओबीदुल्ला सिंधी यांनी काबूलमध्ये स्वतंत्र भारताच्या हंगामी सरकारची स्थापना केली होती.

**काकोरी कट :** सरकारच्या दडपशाहीने क्रांतिकारी चळवळ संपुष्टात आली नाही. गांधीजींनी असहकार चळवळ स्थगित केल्यावर अनेक तरुण क्रांतिमार्गाकडे वळले. चंद्रशेखर आझाद, रामप्रसाद बिस्मिल, योगेश चटर्जी, सचिंद्रनाथ संन्याल इत्यादी क्रांतिकारक एकत्र आले. क्रांतिकार्याला लागणारा पैसा जमवण्यासाठी त्यांनी रेल्वेतून नेला जाणारा सरकारी खजिना ९ ऑगस्ट १९२५ रोजी काकोरी या उत्तर प्रदेशातील रेल्वे स्टेशनजवळ लुटला. यालाच 'काकोरी कट' म्हटले जाते. सरकारने तत्काळ कारवाई करून क्रांतिकारकांना अटकेत टाकले. त्यांच्यावर खटले चालवण्यात आले. अशफाक उल्ला खान, रामप्रसाद बिस्मिल, रोशन सिंग, राजेंद्र लाहिरी यांना फाशी देण्यात आले. चंद्रशेखर आझाद मात्र पोलिसांच्या हाती सापडले नाहीत.


चंद्रशेखर आझाद

**हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिकन असोसिएशन :** समाजवादी विचारांनी प्रभावित झालेल्या तरुणांनी देशव्यापी क्रांतिकारी संघटना उभी करण्याचे ठरवले. चंद्रशेखर आझाद, भगतसिंग, राजगुरू, सुखदेव इत्यादी तरुण यांमध्ये प्रमुख होते. हे सर्व क्रांतिकारक धर्मनिरपेक्ष विचारसरणीचे होते. १९२८


भगतसिंग



राजगुरू



सुखदेव

साली दिल्लीच्या फिरोजशहा कोटला मैदानावर झालेल्या बैठकीमध्ये या तरुणांनी 'हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिकन असोसिएशन' या संघटनेची स्थापना केली. भारताला ब्रिटिशांच्या शोषणातून मुक्त करणे, हे या संघटनेचे उद्‌दिष्ट होते. त्याचबरोबर तिला शेतकरी-कामगारांचे शोषण करणारी अन्यायी सामाजिक-आर्थिक व्यवस्थाही उलथून टाकायची होती. सामाजिक न्यायावर व समतेवर आधारित समाज निर्माण करण्याला भगतसिंग यांनी महत्त्व दिले.

शस्त्रे गोळा करणे आणि कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे, ही कामे या संघटनेच्या स्वतंत्र विभागाकडे सोपवली होती. या विभागाचे नाव होते. 'हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिकन आर्मी' आणि तिचे प्रमुख होते चंद्रशेखर आझाद.

या संघटनेच्या सदस्यांनी अनेक क्रांतिकारक कृत्ये केली. भगतसिंग व राजगुरू यांनी लाला लजपतराय यांच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी सॉंडर्स या अधिकाऱ्याला गोळ्या घालून ठार केले.

नागरी हक्कांची पायमल्ली करणारी दोन विधेयके या वेळी सरकारने मध्यवर्ती विधिमंडळात दाखल केली होती. त्यांचा निषेध करण्यासाठी भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांनी मध्यवर्ती विधिमंडळात बॉंब फेकले.

सरकारने तत्काळ हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिकन आर्मीच्या केंद्रांवर धाडी घातल्या. त्यातून सॉंडर्सच्या हत्येचे धागेदोरे ही पोलिसांच्या हाती लागले. सरकारने क्रांतिकारकांची धरपकड सुरू केली. त्यांच्यावर राजद्रोहाच्या आरोपाखाली खटले भरले. भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांना २३ मार्च १९३१ रोजी लाहोरच्या तुरुंगात फाशी देण्यात आले.

चंद्रशेखर आझाद मात्र शेवटपर्यंत पोलिसांच्या हाती सापडले नाहीत. पुढे अलाहाबादच्या आल्फ्रेड पार्कमध्ये पोलिसांशी झालेल्या चकमकीत ते ठार झाले.

**चितगाव शस्त्रागारावरील हल्ला :** सूर्य सेन हे बंगालमधील चितगाव येथील क्रांतिकारी गटाचे प्रमुख होते. त्यांनी आपल्याभोवती अनंत सिंग, गणेश घोष, कल्पना दत्त, प्रीतिलता वड्डेदार अशांसारख्या निष्ठावान क्रांतिकारकांची फौज गोळा केली. त्यांच्या साहाय्याने चितगाव येथील शस्त्रागारावरील हल्ल्याची योजना सूर्य सेन यांनी आखली. योजनेप्रमाणे १८ एप्रिल १९३० रोजी क्रांतिकारकांनी चितगावमधील दोन शस्त्रागारांतील शस्त्रास्त्रे ताब्यात घेतली. टेलिफोन व टेलिग्राफ यंत्रणा त्यांनी तोडून टाकली आणि संदेशवहन यंत्रणा ठप्प करण्यात यश मिळवले. त्यानंतर त्यांनी ब्रिटिश फौजांशी रोमहर्षक लढत दिली.



सूर्य सेन



कल्पना दत्त



प्रीतिलता वड्डेदार

१६ फेब्रुवारी १९३३ रोजी सूर्य सेन व त्यांचे काही सहकारी पोलिसांच्या हाती सापडले. सूर्य सेन व त्यांच्या बारा सहकाऱ्यांना फाशीची शिक्षा देण्यात आली. कल्पना दत्त यांना जन्मठेप झाली. प्रीतिलता

वड्डेदारने पोलिसांच्या हाती न लागता आत्माहुती दिली.

चितगाव उठावामुळे क्रांतिकारी चळवळीला गती मिळाली. शांती घोष व सुनीती चौधरी या दोन शाळकरी मुलींनी जिल्हा न्यायाधीशाला ठार केले, तर बीना दास या युवतीने कोलकाता विद्यापीठाच्या पदवीदान समारंभात गव्हर्नरवर गोळ्या झाडल्या. अशा अनेक क्रांतिकारी घटना या काळात घडल्या.

जालियनवाला बाग हत्याकांडाला जबाबदार असणाऱ्या ओडवायर याचा वध सरदार उधमसिंग यांनी इंग्लंडमध्ये १९४० साली केला.

भारतीय स्वातंत्र्य संग्रामामध्ये क्रांतिकारी चळवळीने महत्त्वाचे योगदान दिले आहे. क्रांतिकारकांनी ब्रिटिश सत्तेशी लढताना साहस व निर्धाराचे दर्शन घडवले. त्यांचे राष्ट्रप्रेम व समर्पणवृत्ती केवळ अजोड होती. त्यांचे बलिदान भारतीयांना स्फूर्तिदायी ठरले आहे.

## स्वाध्याय

**१. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

(पं.श्यामजी कृष्ण वर्मा, मित्रमेळा, रामसिंह कुका)

(१) स्वा.सावरकर यांनी ...... ही क्रांतिकारकांची गुप्त संघटना स्थापन केली.

(२) पंजाबमध्ये ..... यांनी सरकार विरोधी उठावाचे आयोजन केले.

(३) इंडिया हाउसची स्थापना ..... यांनी केली.

**२. पुढील तक्ता पूर्ण करा.**

| क्रांतिकारक | संघटना |
|---|---|
| .................. | अभिनव भारत |
| बारींद्रकुमार घोष | .................... |
| चंद्रशेखर आझाद | .................... |

**३. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

(१) चाफेकर बंधूंनी रँडचा वध केला.

(२) खुदीराम बोस यांना फाशी देण्यात आली.

(३) भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांनी मध्यवर्ती विधिमंडळात बाँब फेकले.

**४. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) चितगाव शस्त्रागारावरील हल्ल्याचा वृत्तान्त लिहा.

(२) स्वा.सावरकरांचे सशस्त्र क्रांतीतील योगदान स्पष्ट करा.

**उपक्रम**

(१) क्रांतिकारकांच्या जीवनावर आधारित नाटक, चित्रपट पहा व त्यातील तुम्हांला आवडलेल्या प्रसंगाचे वर्गात नाट्यीकरण सादर करा.

(२) क्रांतिकारकांच्या गाथा यावर आधारित हस्तलिखित तयार करा.


96EPXK

# ११. समतेचा लढा

आधुनिक भारताच्या वाटचालीत राजकीय स्वातंत्र्यांचा लढा महत्त्वाचा होता. हा लढा मानवमुक्तीच्या व्यापक तत्त्वज्ञानावर आधारलेला होता. त्यामुळे या लढ्याच्या ओघात राजकीय पारतंत्र्याबरोबरच सरंजामशाही, सामाजिक विषमता, आर्थिक शोषण यांसारख्या गोष्टींनाही विरोध होऊ लागला. स्वातंत्र्याप्रमाणेच समतेचे तत्त्वही फार महत्त्वाचे आहे. त्या दृष्टीने शेतकरी, कामगार, स्त्रिया, दलित इत्यादी समाजघटकांनी उभारलेल्या चळवळी आणि समतेला महत्त्व देणारा समाजवादाचा प्रवाह यांचे योगदान मोलाचे ठरले. त्याचे भान ठेवल्याशिवाय आधुनिक भारताची जडणघडण समजू शकणार नाही, म्हणून आपण अशा काही चळवळींचा अभ्यास करूया.

**शेतकरी चळवळ :** ब्रिटिशांच्या आर्थिक धोरणाचे दुष्परिणाम भारतीय शेतकऱ्यांना भोगावे लागत. जमीनदार, सावकार यांना ब्रिटिश सरकार संरक्षण देत असे. ते शेतकऱ्यांवर अन्याय करत. या अन्यायाविरुद्ध शेतकऱ्यांनी अनेक उठाव केले. बंगालमधील शेतकऱ्यांनी नीळ उत्पादनाच्या सक्तीविरुद्ध कृषी संघटना स्थापून उठाव केला. दीनबंधू मित्र यांच्या 'नीलदर्पण' या नाटकाने नीळ उत्पादक शेतकऱ्यांची हलाखीची स्थिती सर्व समाजाच्या नजरेस आणली. १८७५ साली महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी जमीनदार व सावकार यांच्या अत्याचारांविरुद्ध मोठा उठाव केला. बाबा रामचंद्र यांच्या पुढाकाराने १९१८ साली उत्तर प्रदेशातील शेतकऱ्यांनी 'किसान सभा' ही संघटना स्थापन केली. केरळमध्ये मोपला शेतकऱ्यांनी मोठा उठाव केला. तो ब्रिटिश सरकारने चिरडून टाकला.

१९३६ साली प्रा. एन. जी. रंगा यांच्या पुढाकाराने 'अखिल भारतीय किसान सभा' स्थापन झाली. स्वामी सहजानंद सरस्वती हे या सभेचे अध्यक्ष होते. या सभेने शेतकऱ्यांच्या हक्कांचा जाहीरनामा राष्ट्रीय सभेला सादर केला. १९३६ साली महाराष्ट्रातील ग्रामीण भागात फैजपूर येथे राष्ट्रीय सभेचे अधिवेशन भरले होते. या अधिवेशनास हजारो शेतकरी उपस्थित होते.



प्रा.एन.जी.रंगा



साने गुरुजी

१९३८ साली पूर्व खानदेशात अतिवृष्टी होऊन पीक बुडाले. शेतकऱ्यांची स्थिती हलाखीची झाली. शेतसारा माफ करून घेण्यासाठी साने गुरुजींनी जागोजागी सभा-मिरवणुका घेतल्या. कलेक्टर कचेरीवर मोर्चे काढले. १९४२ च्या क्रांतिपर्वात शेतकरी मोठ्या संख्येने सामील झाले.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

साने गुरुजींनी किसान कामगारांची एकजूट बांधली. धुळे-अमळनेर ही कामगार संघटनांची प्रबळ केंद्रे बनवण्याचा त्यांचा प्रयत्न होता. अंमळनेरच्या गिरणी कामगार युनियनचे ते अध्यक्ष होते.

पंढरपूरचे विठ्ठल मंदिर दलितांसाठी खुले करावे, यासाठी त्यांनी पंढरपूर येथे आमरण उपोषण केले होते.

**कामगार संघटन :** एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारतामध्ये कापड गिरण्या, रेल्वे कंपन्या यांसारख्या उद्योगांची सुरुवात झाली होती. कामगार



नारायण मेघाजी लोखंडे


वर्ग मोठ्या प्रमाणात उदयाला आला नव्हता, तरीही या काळात कामगारांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न झाले. शशिपद बॅनर्जी, नारायण मेघाजी लोखंडे यांनी स्थानिक पातळीवर कामगारांचे संघटन केले. लोखंडे यांचे कामगारविषयक कार्य एवढे मोलाचे होते, की त्यांचे वर्णन 'भारतीय कामगार चळवळीचे जनक' असे केले जाते.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

नारायण मेघाजी लोखंडे यांचे मूळ गाव पुणे जिल्ह्यातील सासवडजवळचे कान्हेसर. त्यांनी बॉंबे मिल हँडस असोसिएशन ही गिरणी कामगारांची संघटना १८९० मध्ये स्थापन केली. ही कामगार संघटना भारतातील संघटित चळवळीची सुरुवात मानली जाते. ते महात्मा फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाच्या मुंबई शाखेचे अध्यक्षही होते. त्यांच्या प्रयत्नामुळे १० जून १८९० पासून कामगारांना रविवारची साप्ताहिक सुट्टी मिळू लागली.

याच सुमारास आसाममध्ये चहाच्या मळ्यातील कामगारांच्या दारुण अवस्थेविरुद्ध आंदोलन करण्यात आले. १८९९ मध्ये ग्रेट इंडियन पेनिन्सुलर (जी.आय.पी.) रेल्वेच्या कामगारांनी आपल्या मागण्यांसाठी संप पुकारला. वंगभंग आंदोलनाच्या काळात स्वदेशीला पाठिंबा देण्यासाठी कामगारांनी वेळोवेळी संप केले. पहिल्या महायुद्धानंतर भारतात औद्योगिकीकरणामुळे कामगार वर्गाची वाढ झाली, तेव्हा मात्र राष्ट्रव्यापी कामगार संघटनेची आवश्यकता भासू लागली. या गरजेतून १९२० साली ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसची (आयटक) स्थापना करण्यात आली. ना.म.जोशी यांचा आयटकच्या कार्यात मोठा वाटा होता. लाला लजपतराय हे आयटकच्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. कामगारांनी राष्ट्रीय आंदोलनात सक्रिय सहभाग घ्यावा, असे त्यांनी सांगितले.


कामगार वर्गात समाजवादी विचारांचा प्रसार करून त्यांच्या लढाऊ संघटना उभारण्याचे कार्य श्रीपाद अमृत डांगे, मुझफ्फर अहमद इत्यादी समाजवादी नेत्यांनी केले. १९२८ साली मुंबईतील गिरणी कामगार संघाने सहा महिने संप केला. असे अनेक संप रेल्वे कामगार, ताग कामगार इत्यादींनी केले. कामगार चळवळीची वाढती शक्ती पाहून सरकार अस्वस्थ झाले. ही चळवळ दडपून टाकण्यासाठी कायदे करण्यात आले. कामगारांचे लढे राष्ट्रीय चळवळीला पूरक ठरले.



श्रीपाद अमृत डांगे

**समाजवादी चळवळ :** जनसामान्यांच्या हितरक्षणासाठी ब्रिटिश सरकार उलथून टाकणे आवश्यक आहे, असे राष्ट्रीय सभेतील अनेक तरुण कार्यकर्त्यांना वाटू लागले. त्याचप्रमाणे आर्थिक व सामाजिक समतेच्या तत्वावर समाजाची फेररचना झाली पाहिजे, याची त्यांना जाणीव होऊ लागली. या जाणिवेतून समाजवादी विचारसरणीचा उदय आणि विकास झाला.

राष्ट्रीय सभेतील समाजवादी तरुणांनी नाशिकच्या तुरुंगामध्ये असताना राष्ट्रीय सभेच्या अंतर्गत समाजवादी पक्ष स्थापण्याचा निर्णय घेतला. या निर्णयानुसार १९३४ साली काँग्रेस समाजवादी पक्षाची स्थापना करण्यात आली. त्यामध्ये आचार्य नरेंद्र देव, जयप्रकाश नारायण, मिनू मसानी, डॉ. राममनोहर



आचार्य नरेंद्र देव



डॉ. राममनोहर लोहिया

लोहिया इत्यादी नेते होते. १९४२ च्या 'छोडो भारत' आंदोलनात समाजवादी तरुण अग्रभागी होते.

कार्ल मार्क्स आणि त्याचा साम्यवाद यांचा परिचय भारतीयांना होऊ लागला. लोकमान्य टिळकांनी तर १८८१ मध्येच मार्क्सविषयी लेख लिहिला होता. पहिल्या महायुद्धानंतर भारतात साम्यवादाचा प्रभाव जाणवू लागला. मानवेंद्रनाथ रॉय यांचा आंतरराष्ट्रीय साम्यवादी चळवळीत सक्रिय सहभाग होता.

१९२५ साली भारतात साम्यवादी पक्षाची स्थापना झाली. कामगारांच्या व शेतकऱ्यांच्या लढाऊ संघटना उभारण्याचे कार्य साम्यवादी तरुणांनी केले. सरकारला साम्यवादी चळवळीचा धोका वाटू लागला. सरकारने ही चळवळ चिरडण्याचे ठरवले. श्रीपाद अमृत डांगे, मुझफ्फर अहमद, केशव नीळकंठ जोगळेकर इत्यादींना पकडण्यात आले. ब्रिटिश राज्य उलथून टाकण्याचा कट केल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला. त्यांना वेगवेगळ्या शिक्षा करण्यात आल्या. हा खटला मीरत येथे चालवण्यात आला, म्हणून त्याला 'मीरत कट खटला' असे म्हटले जाते. मीरत खटल्यानंतरही कामगार चळवळीवर साम्यवाद्यांचा प्रभाव कायम राहिला.

**स्त्रियांची चळवळ :** भारतातील समाजव्यवस्थेत स्त्रियांना दुय्यम स्थान होते. अनेक दुष्ट चालीरितींमुळे त्यांच्यावर अन्याय होत असे; परंतु आधुनिक युगात याविरुद्ध जागृती होऊ लागली. स्त्री-विषयक सुधारणा चळवळीत काही पुरुष सुधारकांनी पुढाकार घेतला. काळाच्या ओघात स्त्रियांचे नेतृत्व पुढे येऊ लागले. त्यांच्या स्वतंत्र संस्था-संघटनाही स्थापन होऊ लागल्या. पंडिता रमाबाईंनी स्थापन केलेल्या 'आर्य महिला समाज' व 'शारदासदन' या संस्था, तसेच रमाबाई रानडे यांनी स्थापना केलेली 'सेवासदन' संस्था ही त्याची उदाहरणे आहेत. 'भारत महिला परिषद' (१९०४), 'ऑल इंडिया वुमेन्स कॉन्फरन्स' (१९२७) या संस्थांचीही स्थापना झाली. त्यामुळे हे संस्थात्मक कार्य राष्ट्रीय पातळीपर्यंत जाऊन पोहोचले. वारसा हक्क, मतदानाचा हक्क इत्यादी प्रश्नांबाबत या संघटनांच्या माध्यमातून स्त्रिया संघर्ष करू लागल्या.



पंडिता रमाबाई



रमाबाई रानडे

रखमाबाई जनार्दन सावे या भारताला वैद्यकीय सेवा देणाऱ्या पहिल्या स्त्री डॉक्टर. त्यांनी स्त्रियांसाठी आरोग्याविषयक व्याख्यानमाला चालवल्या. तसेच राजकोट येथे त्यांनी रेडक्रॉस सोसायटीची शाखा उघडली.



डॉ. रखमाबाई सावे

विसाव्या शतकात सार्वजनिक जीवनात स्त्रियांचा सहभाग वाढू लागला. राष्ट्रीय चळवळीत व क्रांतिकार्यात स्त्रियांचा मोलाचा सहभाग होता. १९३५ च्या कायद्यानंतर प्रांतिक मंत्रिमंडळामध्येही स्त्रियांचा समावेश झाला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय संविधानात स्त्री-पुरुष समतेचे तत्त्व स्पष्टपणे नमूद करण्यात आले.


## माहीत आहे का तुम्हांला ?

**डॉ. आनंदीबाई जोशी :** पहिल्या भारतीय महिला डॉक्टर. त्यांचा मुलगा १० दिवसांचा असतानाच मृत्यू पावला. ही खंत त्यांना वैद्यकीय शिक्षणाकडे खेचून घेण्यास कारणीभूत ठरली. मार्च १८८६ मध्ये त्यांनी एम.डी. ची पदवी घेतली. आनंदीबाई भारतात परतताना त्यांना क्षयरोग झाला. पुढे १६ फेब्रुवारी १८८७ रोजी पुण्यात त्यांचा मृत्यू झाला.


डॉ. आनंदीबाई जोशी

**दलित चळवळ :** भारतातील समाजरचना विषमतेवर आधारलेली होती. समाजात दलितांना मिळणाऱ्या अन्याय्य वागणुकीविरुद्ध महात्मा जोतीराव फुले, नारायण गुरू यांसारख्या समाजसुधारकांनी जनजागृती केली. महात्मा फुले यांच्या शिकवणीला अनुसरून गोपाळबाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे यांनी अस्पृश्यता निर्मूलनाचे कार्य केले. गोपाळबाबा वलंगकर यांनी इ.स.१८८८ मध्ये 'विटाळ विध्वंसन' या पुस्तकातून अस्पृश्यतेचे खंडन केले. शिवराम जानबा कांबळे यांनी 'सोमवंशीय मित्र' हे मासिक १ जुलै १९०८ रोजी सुरू केले. मुरळी, जोगतिणींच्या प्रश्नांना वाचा फोडली. तसेच देवदासींच्या विवाहासाठी पुढाकार घेतला. तमिळनाडूमध्ये पेरियार रामस्वामी यांनी अस्पृश्यता निर्मूलनाची चळवळ उभारली.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी दलितांच्या प्रगतीसाठी १९०६ मध्ये 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन' ही संस्था सुरू केली. दलितांना स्वाभिमानी, सुशिक्षित आणि उद्योगी बनवणे हा त्यांच्या कार्याचा महत्त्वाचा भाग होता; तर उच्चवर्णीयांच्या मनातील दलितविषयक भ्रामक समजूत नष्ट करणे हा त्या कार्याचा दुसरा भाग मानला. त्यासाठी त्यांनी मुंबईत परळ, देवनार या भागांत मराठी शाळा, उद्योगशाळा काढल्या. त्यांनी पुणे येथे पर्वती मंदिरामध्ये प्रवेश सत्याग्रह, दलितांची शेतकी परिषद, संयुक्त मतदारसंघ योजना इत्यादींबाबत दलितवर्गाच्या हिताच्या दृष्टीने ते सक्रियपणे भाग घेत होते.


महर्षी विठ्ठल रामजी शिंदे

राजर्षी शाहू महाराजांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाची पाठराखण केली. त्यांच्याच काळात निर्माण झालेल्या ब्राह्मणेतर चळवळीचे नेतृत्व केले. राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात आरक्षणाचा क्रांतिकारी जाहीरनामा काढला. मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला. त्यांनी जातिभेद निर्मूलनासाठी भरीव कार्य केले. रोटीबंदी, बेटीबंदी व व्यवसाय बंदी असे तीन निर्बंध जाति-व्यवस्थेत होते. यासंदर्भात सभा, परिषदांमधून दलित लोकांच्या हातचे अन्न घेऊन शाहू महाराजांनी रोटीबंदी जाहीरपणे धुडकावून लावली. बेटीबंदीचा निर्बंध समाजात जोपर्यंत पाळला जात आहे तोपर्यंत जातिभेद समूळ नष्ट होणार नाही, अशी शाहू महाराजांची धारणा होती. त्यांनी आपल्या संस्थानात आंतरजातीय विवाहास कायदेशीर मान्यता देणारा कायदा मंजूर केला. २२ फेब्रुवारी १९१८ रोजी कोल्हापूर सरकारच्या गॅझेटमध्ये जाहीरनामा प्रसिद्ध होऊन संस्थानातील 'बलुतेदारी पद्धती' नष्ट करण्यात आली. कोणताही व्यवसाय कोणालाही करण्याची परवानगी देण्यात आली. शाहू महाराजांनी व्यवसाय स्वातंत्र्य देऊन एक प्रकारच्या सामाजिक गुलामगिरीतून लोकांची मुक्तता केली.


राजर्षी शाहू महाराज



ठक्कर बाप्पा

दक्षिण भारतात जस्टिस पक्षाने सामाजिक समतेसाठी मोलाचे कार्य केले. महात्मा गांधींनी अस्पृश्यतेचा प्रश्न हाती घेऊन तो काँग्रेस पक्षाच्या व्यासपीठावर मांडला. येरवडा येथील तुरुंगात असताना सनातनी हिंदू पंडितांशी वाद करून अस्पृश्यतेला शास्त्राधार नसल्याचे प्रतिपादन केले. त्यांनी हरिजन सेवक संघास प्रेरणा दिली. त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन अमृतलाल विठ्ठलदास ठक्कर उर्फ ठक्कर बाप्पा, अप्पासाहेब पटवर्धन इत्यादी कार्यकर्त्यांनी समतेच्या कामात स्वतःला झोकून दिले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली दलितांच्या संघर्षाला सुरुवात झाली. स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्त्वांवर समाजाची उभारणी करण्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ध्येय होते. जातिसंस्था समूळ नष्ट झाल्याशिवाय दलितांवरील अन्यायाचा आणि विषमतेचा शेवट होणार नाही, अशी त्यांची खात्री होती. सामाजिक समता हा दलितांचा हक्क आहे, अशी त्यांची धारणा होती. स्वाभिमानावर आधारलेली चळवळ करणे त्यांना अभिप्रेत होते. या भूमिकेतून त्यांनी १९२४ च्या जुलैमध्ये 'बहिष्कृत हितकारिणी सभे'ची स्थापना केली. त्यांनी आपल्या अनुयायांना 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' असा स्फूर्तिदायक संदेश दिला.

बाबासाहेब बोले यांनी मुंबई प्रांताच्या विधिमंडळामध्ये सार्वजनिक पाणवठे अस्पृश्यांना खुले करण्याचे विधेयक संमत करून घेतले होते. तरीही प्रत्यक्षात दलितांना पाणवठे खुले झाले नाहीत, म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांच्या अनुयायांनी महाड येथे चवदार तळ्यावर सत्याग्रह केला. त्यांनी विषमतेचा पुरस्कार करणाऱ्या 'मनुस्मृती'चे दहन केले. नाशिकच्या काळाराम मंदिरामध्ये दलितांना प्रवेश मिळावा, यासाठी १९३० मध्ये सत्याग्रह सुरू केला. या सत्याग्रहाचे नेतृत्व कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांनी केले होते.

वृत्तपत्रे हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीचे अविभाज्य अंग होते. समाजात जागृती निर्माण करण्यासाठी आणि दुःखांना वाचा फोडण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत', 'जनता', 'समता' अशी वृत्तपत्रे सुरू केली.



महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'स्वतंत्र मजूर पक्ष' स्थापन केला. कामगारांच्या हिताच्या नसणाऱ्या कायद्यांना विधिमंडळात विरोध केला. दलितांचे प्रश्न प्रभावीपणे मांडण्यासाठी त्यांनी १९४२ साली 'शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन'ची स्थापना केली. आधुनिक भारतात समतेवर आधारलेली समाजरचना निर्माण करण्याच्या कार्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाद्वारे महत्त्वाचे योगदान दिले. १९५६ मध्ये नागपूर येथे आपल्या असंख्य अनुयायांसह मानवतेचा व समतेचा पुरस्कार करणाऱ्या बौद्ध धर्माचा त्यांनी स्वीकार केला.

आधुनिक भारताच्या जडणघडणीत समतेसाठी उभारलेल्या लढ्याला महत्त्वाचे स्थान आहे.

## स्वाध्याय

**१. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

(लाला लजपतराय, साने गुरुजी, रखमाबाई जनार्दन सावे)

(१) राजकोट येथे रेडक्रॉस सोसायटीची स्थापना ........................ यांनी केली.

(२) अंमळनेरच्या गिरणी कामगार युनियनचे अध्यक्ष ........................ हे होते.

(३) आयटकच्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष ........................ होते.

**२. टीपा लिहा.**

(१) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे सामाजिक कार्य

(२) राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात केलेल्या सुधारणा

**३. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

(१) सरकारने साम्यवादी चळवळ चिरडण्याचे ठरवले.

(२) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक, बहिष्कृत भारत यांसारखी वृत्तपत्रे सुरू केली.

(३) राष्ट्रव्यापी कामगार संघटनेची आवश्यकता भासू लागली.

**४. पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) आधुनिक भारताच्या जडणघडणीत समतेचा लढा महत्त्वाचा का ठरतो ?

(२) पूर्व खानदेशात साने गुरुजींनी केलेले कार्य लिहा.

(३) कामगारांनी उभे केलेले लढे राष्ट्रीय चळवळीस पूरक कसे ठरले ?

(४) स्त्रीविषयक सुधारणा चळवळीचे स्वरूप स्पष्ट करा.

**उपक्रम**

(१) डॉ.आनंदीबाई जोशी यांच्या जीवनावरील पुस्तक वाचा.

(२) राजर्षी शाहू महाराज यांचे चरित्र वाचा.

96NKZ8

# १२. स्वातंत्र्यप्राप्ती

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात भारतीय स्वातंत्र्यलढा व्यापक झाला होता. भारताच्या स्वातंत्र्याच्या मागणीचा जोर वाढत होता. त्याची गंभीर दखल घेणे आवश्यक आहे, याची जाणीव ब्रिटिश राज्यकर्त्यांना झाली. त्या दृष्टीने भारताला स्वातंत्र्य देण्यासाठी ब्रिटिश सरकार विविध योजना तयार करू लागले.

राष्ट्रीय सभेची उभारणी धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वावर झाली होती. राष्ट्रीय आंदोलनात सर्व जाती-धर्मांचे लोक सामील झालेले होते. ही चळवळ कमकुवत करण्यासाठी ब्रिटिशांनी 'फोडा आणि राज्य करा' या नीतीचा अवलंब केला. त्याचा परिणाम 'मुस्लीम लीग'ची स्थापना होण्यात झाला.

१९३० साली डॉ.मुहम्मद इक्बाल या प्रसिद्ध कवीने स्वतंत्र मुस्लीम राष्ट्राचा विचार मांडला. पुढे चौधरी रहमत अली यांनी पाकिस्तानची कल्पना मांडली. बॅरिस्टर महम्मद अली जीना यांनी द्विराष्ट्र सिद्धान्त मांडून पाकिस्तान या स्वतंत्र मुस्लीम राष्ट्राची मागणी केली. राष्ट्रीय सभा ही केवळ हिंदूंची संघटना आहे, तिच्यापासून मुसलमानांचा काहीही फायदा होणार नाही, असा प्रचार बॅ.जीना आणि मुस्लीम लीग यांनी सुरू केला.

**वेव्हेल योजना :** जून १९४५ मध्ये भारताचे व्हाईसरॉय लॉर्ड वेव्हेल यांनी एक योजना तयार केली. या योजनेत विविध तरतुदी होत्या. यात केंद्रीय व प्रांतिक विधिमंडळात मुस्लीम, दलित व अल्पसंख्याकांना योग्य ते प्रतिनिधित्व देण्यात येईल, व्हाईसरॉयच्या कार्यकारी मंडळात हिंदू व मुस्लीम सदस्यांची संख्या समान राहील, अशा काही प्रमुख तरतुदी होत्या. या योजनेवर विचार करण्यासाठी सिमला येथे भारतातील प्रमुख राजकीय पक्षांची बैठक आयोजित करण्यात आली होती. व्हॉइसरॉयच्या कार्यकारी मंडळात मुस्लीम प्रतिनिधींची नावे सुचवण्याचा अधिकार केवळ मुस्लीम लीगला असावा, असा बॅ.जीनांनी आग्रह धरला. राष्ट्रीय सभेने त्यास विरोध केला. त्यामुळे वेव्हेल योजना यशस्वी होऊ शकली नाही.

**त्रिमंत्री योजना :** दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर भारताला स्वातंत्र्य देण्यास ब्रिटिश राज्यकर्ते अनुकूल बनले. ब्रिटिश प्रधानमंत्री ॲटली यांनी पार्लमेंटमध्ये भारताविषयीचे धोरण स्पष्ट केले. त्यानुसार भारतीय जनतेचा भारतीय संविधान तयार करण्याचा अधिकार मान्य करण्यात आला. अल्पसंख्याकांचे प्रश्न भारतीय स्वातंत्र्याच्या आड येणार नाहीत हेही स्पष्ट करण्यात आले. १९४६ च्या मार्चमध्ये पॅथिक लॉरेन्स, स्टॅफर्ड क्रिप्स आणि ए.व्ही. अलेक्झांडर या ब्रिटिश मंत्र्यांच्या शिष्टमंडळाने भारताच्या संदर्भात इंग्लंडची योजना भारतीय नेत्यांसमोर मांडली. तिला 'त्रिमंत्री योजना' म्हणतात.

या योजनेतील काही तरतुदी राष्ट्रीय सभेला मान्य नव्हत्या. तसेच मुस्लिमांचे स्वतंत्र राज्य स्थापन करण्याची तरतूद या योजनेत नाही, म्हणून मुस्लीम लीगही असंतुष्ट होती. यामुळे त्रिमंत्री योजना पूर्णतः मान्य झाली नाही.

**प्रत्यक्ष कृतिदिन :** पाकिस्तानची मागणी पूर्ण होत नसल्याचे पाहून मुस्लीम लीगने प्रत्यक्ष कृती करण्याचे ठरवले. त्यानुसार १६ ऑगस्ट १९४६ हा दिवस प्रत्यक्ष कृतिदिन म्हणून पाळण्याचे मुस्लीम लीगने जाहीर केले. या दिवशी मुस्लीम लीगच्या अनुयायांनी हिंसक मार्गाचा अवलंब केला. देशामध्ये विविध ठिकाणी हिंदू मुस्लीम दंगली झाल्या. बंगाल प्रांतात नोआखाली येथे भीषण कत्तली झाल्या. हा हिंसाचार थांबवण्यासाठी गांधीजी आपल्या प्राणाची पर्वा न करता तेथे गेले. तेथे शांतता प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली.

**हंगामी सरकारची स्थापना :** देशात हिंसाचाराचा डोंब उसळला असताना व्हॉइसरॉय वेव्हेल यांनी हंगामी सरकारची स्थापना केली. पं.जवाहरलाल नेहरू हे या सरकारचे प्रमुख होते. हंगामी सरकारमध्ये सामील न होण्याचा निर्णय सुरुवातीच्या काळात मुस्लीम लीगने घेतला होता. काही काळानंतर मुस्लीम लीग हंगामी सरकारमध्ये सामील झाले. परंतु मुस्लीम लीगच्या नेत्यांनी अडवणुकीची भूमिका घेतल्यामुळे हंगामी सरकारचा कारभार सुरळीत चालू शकला नाही.

**माउंटबॅटन योजना :** इंग्लंडचे पंतप्रधान ॲटली यांनी जून १९४८ पूर्वी इंग्लंड भारतावरील आपली सत्ता सोडून देईल असे घोषित केले. भारतातील सत्तांतराच्या पार्श्वभूमीवर लॉर्ड माउंटबॅटन यांची भारताचे व्हाईसरॉय म्हणून नियुक्ती केली गेली. लॉर्ड माउंटबॅटन यांनी भारतातील प्रमुख नेत्यांसोबत विचारविनिमय केला. त्यानंतर भारत व पाकिस्तान या दोन स्वतंत्र राष्ट्रांची निर्मिती करण्याची योजना त्यांनी तयार केली. राष्ट्रीय सभेचा फाळणीस विरोध होता. देशाचे ऐक्य हा राष्ट्रीय सभेच्या भूमिकेचा मूळ



आधार होता; परंतु मुस्लीम लीगने पाकिस्तानच्या निर्मितीचा अट्टहास धरला. त्यामुळे फाळणीशिवाय दुसरा पर्याय उरला नव्हता. राष्ट्रीय सभेने अत्यंत नाइलाजाने फाळणीच्या निर्णयाला मान्यता दिली.

**भारतीय स्वातंत्र्याचा कायदा :** माउंटबॅटन योजनेच्या आधारे १८ जुलै १९४७ रोजी इंग्लंडच्या पार्लमेंटने भारताच्या स्वातंत्र्याचा कायदा संमत केला. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत व पाकिस्तान ही स्वतंत्र राष्ट्रे अस्तित्वात येतील. त्यानंतर त्यांच्यावर ब्रिटिश पार्लमेंटचा कोणताही अधिकार राहणार नाही. संस्थानांवरील ब्रिटिशांचे स्वामित्व संपुष्टात येईल. त्यांना भारत अथवा पाकिस्तानात सामील होता येईल किंवा स्वतंत्र राहता येईल अशी तरतूद या कायद्यात करण्यात आली.

**स्वातंत्र्यप्राप्ती :** भारतीय स्वातंत्र्याच्या कायद्यानुसार १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य देण्यात आले. १४ ऑगस्ट १९४७ च्या मध्यरात्री दिल्ली येथे संसदभवनाच्या सभागृहात संविधानसभेची बैठक सुरू होती. मध्यरात्री बाराचे ठोके पडले आणि भारताचे पारतंत्र्य संपले. ब्रिटिशांचा युनियन जॅक खाली उतरवून त्याच्या जागी भारताचा तिरंगी ध्वज फडकवण्यात आला. दीडशे वर्षांच्या गुलामीतून भारत स्वतंत्र झाला.

स्वातंत्र्यप्राप्तीचा आनंद निर्भेळ नव्हता. देशाची फाळणी झाली, त्या वेळी झालेल्या भयानक हिंसाचारामुळे भारतीय जनता दुःखी होती. स्वातंत्र्य सोहळ्यात सहभागी न होता गांधीजी बंगालमध्ये जिवाचे रान करत होते. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अवघ्या सहा महिन्यांत ३० जानेवारी १९४८ रोजी नथुराम गोडसे याने गांधीजींची निर्घृण हत्या केली. हिंदू-मुस्लीम ऐक्य टिकवण्यासाठी गांधीजी अहर्निश झटले आणि त्यासाठी त्यांनी आपल्या प्राणांचे मोल दिले.

96XH1V

## स्वाध्याय

**१. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

(१) हंगामी सरकारचे ........... हे प्रमुख होते.

(अ) वल्लभभाई पटेल (ब) महात्मा गांधी

(क) पं.जवाहरलाल नेहरू (ड) बॅ.जीना

(२) भारत व पाकिस्तान या दोन स्वतंत्र राष्ट्रांची निर्मिती करण्याची योजना .......... यांनी तयार केली.

(अ) लॉर्ड वेव्हेल (ब) स्टॅफर्ड क्रिप्स

(क) लॉर्ड माउंटबॅटन (ड) पॅथिक लॉरेन्स

**२. पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(१) बॅ.जीना यांनी कोणत्या मागणीचा आग्रहाने पुरस्कार केला ?

(२) त्रिमंत्री योजनेत सहभागी मंत्र्यांची नावे लिहा.

**३. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

(१) राष्ट्रीय सभेने फाळणीस मान्यता दिली.

(२) हंगामी सरकारचा कारभार सुरळीत चालू शकला नाही.

(३) वेव्हेल योजना यशस्वी होऊ शकली नाही.

**४. दिलेल्या कालरेषेवर घटनाक्रम लिहा.**

१९४५ १९४६ १९४७ १९४८

**५. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

(१) ब्रिटिशांनी भारताला स्वातंत्र्य देण्याच्या दृष्टीने पावले का उचलली ?

(२) माउंटबॅटन योजनेविषयी माहिती लिहा.

(३) १६ ऑगस्ट हा दिवस प्रत्यक्ष कृतिदिन म्हणून पाळण्याचे मुस्लीम लीगने का जाहीर केले ? त्याचे कोणते परिणाम झाले ?

**उपक्रम**

विविध संदर्भग्रंथ तसेच आंतरजालाच्या साहाय्याने स्वातंत्र्य मिळाल्यावर सामान्य जनतेची काय प्रतिक्रिया होती, याविषयी माहिती मिळवा.

# १३. स्वातंत्र्यलढ्याची परिपूर्ती

भारत स्वतंत्र झाला तरी स्वातंत्र्यलढा अद्याप संपलेला नव्हता. भारतात अनेक संस्थाने होती. संस्थानांना भारतात सामील होण्याचा किंवा स्वतंत्र राहण्याचा हक्क मिळालेला होता. त्यामुळे अखंड भारताचे राष्ट्रीय सभेचे स्वप्न अपुरे राहिले होते. संस्थाने स्वतंत्र राहिल्यामुळे भारताचे अनेक तुकडे पडणार होते. पोर्तुगीज आणि फ्रेंच सत्तांनी भारतातील काही भागांवरील सत्ता सोडून दिलेली नव्हती, पण हे प्रश्न भारताने खंबीरपणे सोडवले. त्याची माहिती आपण या पाठात घेऊ.

**संस्थानांचे भारतात विलीनीकरण :** भारतात लहान-मोठी अशी सहाशेच्यावर संस्थाने होती. असहकार आंदोलनाच्या प्रभावामुळे संस्थानांमध्ये राजकीय जागृतीला सुरुवात झाली. संस्थानांमध्ये प्रजामंडळे स्थापन होऊ लागली. प्रजामंडळे म्हणजे संस्थानांतील प्रजेच्या हितासाठी व त्यांना राजकीय अधिकार मिळावे यासाठी काम करणाऱ्या जनसंघटना होत्या. १९२७ मध्ये अशा प्रजामंडळांची मिळून एक अखिल भारतीय प्रजा परिषद स्थापन करण्यात आली. त्यामुळे संस्थानांमधील चळवळीला चालना मिळाली. भारत स्वतंत्र झाल्यावर या संस्थानांच्या विलीनीकरणाचा प्रश्न सोडवण्यासाठी भारताचे तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी अतिशय मुत्सद्दीपणे मार्ग काढला. त्यांनी संस्थानिकांना विश्वासात घेऊन सर्वांना मान्य होईल असा 'सामीलनामा' तयार केला.




सरदार वल्लभभाई पटेल

भारतात सामील होणे संस्थानिकांच्या कसे हिताचे आहे, हे सरदार पटेलांनी संस्थानिकांना पटवून दिले. त्यांच्या या आवाहनाला संस्थानिकांनी चांगला प्रतिसाद दिला. जुनागड, हैदराबाद व काश्मीर या संस्थानांचा अपवाद वगळता सर्व संस्थाने भारतात विलीन झाली. संस्थानांच्या विलीनीकरणाचा प्रश्न सरदार पटेलांनी कणखर भूमिका घेऊन सोडवला.

**जुनागडचे विलीनीकरण :** जुनागड हे सौराष्ट्रातील एक संस्थान होते. तेथील प्रजेला भारतात सामील व्हायचे होते. जुनागडचा नवाब मात्र पाकिस्तानात सामील होण्याच्या विचारात होता. त्याच्या या निर्णयाला प्रजेने कसून विरोध केला, तेव्हा नवाब पाकिस्तानात निघून गेला. त्यानंतर १९४८ च्या फेब्रुवारीमध्ये जुनागड भारतात विलीन झाले.

**हैदराबाद मुक्तिसंग्राम :** हैदराबाद हे भारतातील सर्वांत मोठे संस्थान होते. त्यामध्ये तेलुगु, कन्नड, मराठी भाषक प्रांत होते. त्या ठिकाणी निजामाची एकतंत्री राजवट होती. तेथे नागरी व राजकीय हक्कांचा अभाव होता. आपले हक्क मिळवण्यासाठी हैदराबाद संस्थानातील जनतेने तेलंगण भागात आंध्र परिषद, मराठवाडा भागात महाराष्ट्र परिषद व कर्नाटक भागात कर्नाटक परिषद या संस्था स्थापन केल्या. १९३८ मध्ये स्वामी रामानंदतीर्थ यांनी हैदराबाद स्टेट काँग्रेसची स्थापना केली. निजामाने या संघटनेवर बंदी घातली. हैदराबाद स्टेट काँग्रेसला मान्यता मिळवण्यासाठी व लोकशाही हक्कांसाठी लढा सुरू झाला. या लढ्याचे नेतृत्व स्वामी रामानंद तीर्थ या झुंजार सेनानीने केले. त्यांना नारायण रेड्डी, सिराझ-उल्-हसन तिरमिजी यांची साथ लाभली. पी.व्ही.नरसिंहराव व गोविंदभाई श्रॉफ हे स्वामीजींचे निष्ठावान अनुयायी होते.



स्वामी रामानंद तीर्थ

१९४७ च्या जुलैमध्ये हैदराबाद स्टेट काँग्रेसने हैदराबाद संस्थान भारतात विलीन करावे असा ठराव केला, मात्र निजामाने भारतविरोधी धोरण स्वीकारले.

तो हैदराबाद संस्थान पाकिस्तानात विलीन करण्याच्या हालचाली करू लागला. निजामाचा सहकारी कासीम रझवी याने संस्थानातील प्रजेची भारतात विलीन होण्याची मागणी धुडकावून लावण्यासाठी 'रझाकार' नावाची संघटना स्थापन केली. कासीम रझवी व त्याच्या साथीदारांनी हिंदूंवरच नव्हे, तर लोकशाहीवादी चळवळीला पाठिंबा देणाऱ्या मुस्लिमांवरही अत्याचार केले. त्यामुळे सर्वत्र लोकमत भडकू लागले. निजामाशी सामोपचाराने बोलणी करण्याचा प्रयत्न भारत सरकार करत होते, परंतु निजाम दाद देत नव्हता. अखेरीस भारत सरकारने १३ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाविरुद्ध पोलिस कारवाई सुरू केली. यास 'ऑपरेशन पोलो' असे सांकेतिक नाव होते. शेवटी १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजाम शरण आला. हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले. संस्थानी प्रजेचा लढा यशस्वी झाला. या लढ्यात आर्य समाजाचे विशेष योगदान होते.

**हैदराबाद मुक्तिसंग्रामातील मराठवाड्याचे योगदान :** या लढ्यात स्वामी रामानंद तीर्थ, बाबासाहेब परांजपे, गोविंदभाई श्रॉफ, अनंत भालेराव, आशाताई वाघमारे इत्यादींनी मौलिक योगदान दिले.

'वंदे मातरम्' चळवळीद्‌वारे विद्यार्थी हैदराबाद मुक्तिलढ्यात सहभागी झाले. तसेच हैदराबाद मुक्तिसंग्रामात वेदप्रकाश, श्यामलाल, गोविंद पानसरे, बहिर्जी शिंदे, श्रीधर वर्तक, जर्नादन मामा, शोएब उल्ला खान इत्यादींनी हौतात्म्य पत्करले. त्यांचे बलिदान भारतीयांना प्रेरणादायी ठरले आहे. यावरून हैदराबादच्या मुक्तिलढ्यात मराठवाड्यातील नेत्यांचा व जनतेचा सिंहाचा वाटा होता, हे लक्षात येते.

१७ सप्टेंबर हा हैदराबाद मुक्तिसंग्रामाचा दिवस मराठवाड्यात 'मराठवाडा मुक्तिदिन' म्हणून साजरा केला जातो. स्वतंत्र भारतात मराठवाड्याचा समावेश १५ ऑगस्ट १९४७ मध्ये झालेला नव्हता. हा प्रदेश १९४८ मध्ये जनतेच्या स्फूर्तिदायी लढ्यानंतर स्वतंत्र भारतात विलीन करण्यात आला.

**काश्मीरची समस्या :** काश्मीर संस्थानचा राजा हरिसिंग याने स्वतंत्र राहण्याचे ठरवले होते. काश्मीर पाकिस्तानात सामील करून घेण्याचा पाकिस्तानचा मानस होता. यासाठी पाकिस्तान हरिसिंगावर दडपण आणू लागले. १९४७ च्या ऑक्टोबरमध्ये पाकिस्तानच्या चिथावणीने सशस्त्र घुसखोरांनी काश्मीरवर हल्ला केला, तेव्हा भारतात सामील होण्याच्या करारावर हरिसिंगाने स्वाक्षरी केली. अशा प्रकारे भारतात विलीन झाल्यानंतर भारतीय लष्कर काश्मीरच्या रक्षणासाठी पाठवले गेले. लष्कराने काश्मीरचा मोठा भाग घुसखोरांच्या हातून परत मिळवला. काही भाग मात्र पाकिस्तानच्या ताब्यात राहिला.

**फ्रेंच वसाहतींचे विलीनीकरण :** भारत स्वतंत्र झाल्यानंतरही चंद्रनगर, पुदुच्चेरी, कारिकल, माहे व याणम या प्रदेशांवर फ्रान्सचे आधिपत्य होते. तेथील भारतीय रहिवासी भारतात सामील होण्यास उत्सुक होते. हे प्रदेश भारताचे घटक असल्यामुळे ते भारताच्या स्वाधीन करावे, अशी मागणी भारत सरकारने केली.

फ्रान्सने १९४९ साली चंद्रनगरमध्ये सार्वमत घेतले. तेथील जनतेने भारताच्या बाजूने कौल दिला. चंद्रनगर भारताच्या स्वाधीन करण्यात आले. त्यानंतर फ्रान्सने भारताचे इतरही प्रदेश भारत सरकारच्या हाती सोपवले.


डॉ. टी. बी. कुन्हा

**गोवामुक्ती लढा :** पोर्तुगालने मात्र आपल्या ताब्यातील भारतीय प्रदेश भारताच्या स्वाधीन करण्यास नकार दिला. तो प्रदेश मिळवण्यासाठी भारतीयांना लढा द्यावा लागला. या लढ्यात डॉ. टी. बी. कुन्हा हे आघाडीवर होते. त्यांनी पोर्तुगीज सरकारविरुद्ध जनतेत जागृती घडवून आणण्याचे कार्य केले. त्यांनी पोर्तुगिजांच्या विरुद्ध लढा उभारण्याच्या उद्देशाने गोवा काँग्रेस

समिती स्थापन केली. पुढे १९४५ मध्ये डॉ. कुन्हा यांनी 'गोवा युथ लीग' ही संघटना मुंबईत स्थापन केली. १९४६ मध्ये त्यांनी गोव्यात जाऊन भाषणबंदीचा हुकूम मोडला. त्याबद्दल डॉ. कुन्हांना आठ वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. इ.स.१९४६ मध्येच डॉ.राममनोहर लोहिया यांनी गोवामुक्तीसाठी सत्याग्रहाचा लढा सुरू केला. त्यांनी बंदीहुकूम मोडून गोव्यात मडगाव येथे भाषण केले. त्याबद्दल त्यांना पोर्तुगीज सरकारने हद्दपार केले.

याच सुमारास गुजरातमधील दादरा आणि नगर हवेली येथील पोर्तुगीज वसाहती मुक्त करण्यासाठी 'आझाद गोमंतक' दलाची उभारणी करण्यात आली. २ ऑगस्ट १९५४ रोजी या दलाच्या तरुणांनी सशस्त्र हल्ला करून दादरा आणि नगर हवेलीचा प्रदेश पोर्तुगीज सत्तेपासून मुक्त केला. या हल्ल्यात विश्वनाथ लवंदे, राजाभाऊ वाकणकर, सुधीर फडके, नानासाहेब काजरेकर इत्यादींनी भाग घेतला होता. १९५४ मध्ये गोवामुक्ती समिती स्थापन करण्यात आली. या समितीने महाराष्ट्रातून सत्याग्रहींच्या अनेक तुकड्या गोव्यात पाठवल्या. त्यांत ना. ग. गोरे, सेनापती बापट, पीटर अल्वारिस, महादेवशास्त्री जोशी व त्यांच्या पत्नी सुधाताई इत्यादींचा सहभाग होता. मोहन रानडे हे गोवामुक्ती आंदोलनातील एक धडाडीचे नेते होते. सत्याग्रहींवर पोर्तुगीज सत्तेने अमर्याद जुलूम-अत्याचार केले. यामुळे भारतातील जनमत अधिकच प्रक्षुब्ध झाले.

गोव्यातील स्वातंत्र्यलढ्याने उग्र स्वरूप धारण केले. भारत सरकार पोर्तुगीज सरकारशी सामोपचाराने वाटाघाटी करत होते, मात्र त्याला दाद मिळत नव्हती. शेवटी भारत सरकारने नाइलाजाने लष्करी बळाचा वापर करण्याचा निर्णय घेतला. १९६१ च्या डिसेंबरमध्ये भारतीय सैन्याने गोव्यात प्रवेश केला. अल्पावधीतच पोर्तुगीज लष्कराने शरणागती पत्करली. १९ डिसेंबर १९६१ रोजी गोवा पोर्तुगिजांच्या वर्चस्वातून मुक्त झाला. भारताच्या भूमीवरून साम्राज्यवादाचे पूर्णपणे उच्चाटन झाले. भारताच्या स्वातंत्र्यलढ्याची खऱ्या अर्थाने परिपूर्ती झाली.

## स्वाध्याय

**१. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

(१) भारतात लहान-मोठी अशी सहाशेच्या वर ........... होती.
(अ) राज्ये (ब) खेडी (क) संस्थाने (ड) शहरे

(२) जुनागड, .......... व काश्मीर या संस्थानाचा अपवाद वगळता सर्व संस्थाने भारतात विलीन झाली.
(अ) औंध (ब) झाशी (क) वडोदरा (ड) हैदराबाद

**२. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

(१) जुनागड भारतात विलीन झाले.
(२) भारत सरकारने निजामाविरुद्ध पोलीस कारवाई सुरू केली.
(३) भारतात सामील होण्याच्या करारावर हरिसिंगाने स्वाक्षरी केली.

**३. थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) संस्थानांच्या विलीनीकरणातील सरदार वल्लभभाई पटेल यांचे योगदान स्पष्ट करा.
(२) हैदराबाद मुक्तिसंग्रामातील स्वामी रामानंद तीर्थ यांचे योगदान स्पष्ट करा.

**उपक्रम**

'हैदराबाद मुक्तिसंग्राम' या विषयावर चित्र व माहिती संकलित करा. इतिहास कक्षात त्यावर आधारित तक्त्यांचे प्रदर्शन आयोजित करा.

977D3I

# १४. महाराष्ट्र राज्याची निर्मिती

भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर भाषावार प्रांतरचनेची मागणी मोठ्या प्रमाणात केली जात होती. महाराष्ट्रातही मराठी भाषिक राज्याची मागणी करणारी 'संयुक्त महाराष्ट्र चळवळ' इ.स.१९४६ पासून सुरू झाली. अनेक स्थित्यंतरातून या चळवळीची वाटचाल होऊन शेवटी १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली.

**पार्श्वभूमी :** मराठी भाषिक लोकांच्या एकीकरणाचा विचार विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून अनेक जाणकारांनी व्यक्त करण्यास सुरुवात केला. १९११ मध्ये इंग्रज सरकारला बंगालची फाळणी रद्द करावी लागली. त्या पार्श्वभूमीवर न.चिं.केळकर यांनी लिहिले की, 'मराठी भाषा बोलणाऱ्यांची सर्व लोकसंख्या एका अमलाखाली असावी.' लोकमान्य टिळकांनी १९१५ साली भाषावार प्रांतरचनेची मागणी केली होती. परंतु त्या काळात भारताच्या स्वातंत्र्याचा प्रश्न अधिक महत्त्वाचा असल्याने हा प्रश्न मागे पडला.

१२ मे १९४६ मध्ये बेळगाव येथे आयोजित केलेल्या साहित्य संमेलनात संयुक्त महाराष्ट्रासंदर्भात महत्वपूर्ण ठराव मंजूर करण्यात आला.

**संयुक्त महाराष्ट्र परिषद :** २८ जुलै रोजी मुंबई येथे शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली 'महाराष्ट्र एकीकरण परिषद' भरली. या परिषदेने मराठी भाषिक प्रदेशांचा एक प्रांत करावा. यात मुंबई, मध्य प्रांतातील मराठी भाषिक तसेच मराठवाडा व गोमंतक या मराठी भाषिक भागाचा समावेश करावा असा ठराव संमत केला.

**दार कमिशन :** संविधान सभेचे अध्यक्ष डॉ.राजेंद्रप्रसाद यांनी १७ जून १९४७ रोजी न्यायाधीश एस.के.दार यांच्या अध्यक्षतेखाली भाषावार प्रांतरचनेसाठी 'दार कमिशन'ची स्थापना केली. १० डिसेंबर १९४८ रोजी दार कमिशनचा अहवाल प्रसिद्ध झाला. परंतु त्यामुळे प्रश्न सुटला नाही.

**जे.व्ही.पी.समिती (त्रिसदस्य समिती) :** भाषावार प्रांतरचना निर्माण करण्याच्या परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी काँग्रेसने २९ डिसेंबर १९४८ रोजी एक समिती नेमली. यात पं. जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल आणि पट्टाभिसितारामय्या यांचा समावेश होता. या तीन सदस्यांच्या आद्याक्षरावरून जे.व्ही.पी.ही समिती ओळखली जाते. या समितीने आपल्या अहवालात भाषावार प्रांतरचना काँग्रेसला तत्वतः मान्य आहे. पण ही योग्य वेळ नाही, अशी शिफारस केली. या अहवालाविरुद्ध महाराष्ट्रभर तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. त्याच वेळी जनजागृतीसाठी सेनापती बापट यांनी प्रभात फेऱ्या काढल्या.

आचार्य अत्रे यांनी मुंबई महापालिकेत मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा ठराव मांडला. तो ५० विरुद्ध ३५ मतांनी मंजूर झाला. यामुळे मुंबई महाराष्ट्रात असावी, ही जनतेची इच्छा सिद्ध झाली.

**राज्य पुनर्रचना आयोग :** भारत सरकारने न्यायमूर्ती एस.फाजल अली यांच्या अध्यक्षतेखाली २९ डिसेंबर १९५३ रोजी 'राज्य पुनर्रचना आयोग' स्थापन केला. या आयोगाने १० ऑक्टोबर १९५५ रोजी आपला अहवाल सादर केला. या अहवालात मुंबईचे द्विभाषिक राज्य निर्माण करावे अशी शिफारस केली.

**नागपूर करार :** सर्व मराठी भाषिक जनतेचे एक राज्य स्थापन करण्यासाठी १९५३ मध्ये नागपूर करार झाला. या कराराप्रमाणे पश्चिम महाराष्ट्र व विदर्भ-मराठवाड्यासह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली. संविधानातील १९५६ च्या दुरुस्तीप्रमाणे कलम ३७१ (२) चा समावेश संविधानात करण्यात आला. त्याप्रमाणे विकास कार्यासाठी समन्यायी निधी, तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणासाठी पुरेसा निधी, त्या त्या भागातील लोकसंख्येच्या प्रमाणात राज्यशासनाच्या

सेवेत नोकऱ्यांच्या संधी आणि महाराष्ट्र विधानसभेचे वार्षिक एक अधिवेशन नागपूर येथे घेणे इत्यादींची नागपूर करारादव्‌ारे हमी देण्यात आली.

मराठी भाषिकांचा मुंबईसह महाराष्ट्र निर्माण व्हावा यासाठी संघर्ष सुरू झाला होता. मुंबईत कामगार मैदानावर मोठी सभा झाली. त्या वेळी शंकरराव देव म्हणाले, ''महाराष्ट्रापासून मुंबई वेगळी करायला आपण प्राणपणाने विरोध करू.'' जनतेच्या भावनांना आणि मागण्यांना जनआंदोलनांचे स्वरूप येऊ लागले. त्यात महिलाही उत्स्फूर्तपणे सहभागी होऊ लागल्या. सुमतीबाई गोरे, इस्मत चुगताई, दुर्गा भागवत, तारा रेड्डी, चारुशीला गुप्ते, कमलाताई मोरे, सुलताना जोहारी अशा अनेक महिलांनी आंदोलनात भाग घेतला.

७ नोव्हेंबर १९५५ रोजी कामगारांची सभा झाली. यात विविध कामगार संस्था, कम्युनिस्ट, प्रजा समाजवादी, समाजवादी, शेतकरी कामगार पक्ष, जनसंघ असे अनेक राजकीय पक्ष सामील झाले. अध्यक्षस्थानी कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे होते. या अधिवेशनात एस.एम.जोशी यांनी ठराव मांडला की, मुंबई विदर्भासह संयुक्त महाराष्ट्र व्हावा.

**प्रत्यक्ष संघर्षाला सुरुवात :** मराठी भाषिक जनतेतील असंतोष वाढत चालला होता. सेनापती बापट यांच्या नेतृत्वाखाली विधानसभेवर मोठा मोर्चा निघाला. या वेळी मोरारजी देसाई हे मुख्यमंत्री होते. शासनाने बंदी आदेश पुकारला. पोलिसांनी मोर्चावर लाठीमार, अश्रुधुराचा वापर केला. त्याच दिवशी सायंकाळी कामगार मैदानावर सुमारे ५० हजार लोकांच्या उपस्थितीत जाहीर सभा झाली. कॉम्रेड डांगे यांनी मार्गदर्शन केले. संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचा लढा अधिक गतिमान करण्यासाठी २१ नोव्हेंबर १९५५ रोजी एक दिवसाचा लाक्षणिक संप करण्याचा निर्णय घेतला गेला.

**संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना :** मराठी भाषिक जनतेच्या संयुक्त महाराष्ट्र मागणीचा प्रश्न



प्र.के.अत्रे

बिकट होत गेला. राज्यभर असंतोष धुमसत होता. ६ फेब्रुवारी १९५६ रोजी केशवराव जेधे यांच्या अध्यक्षतेखाली पुण्याच्या टिळक स्मारक मंदिरात सभा झाली. यात समितीने आपली कार्यकारिणी जाहीर केली. त्यानुसार अध्यक्षपदी कॉ.श्रीपाद अमृत डांगे, उपाध्यक्ष डॉ.त्र्यं.रा.नरवणे तर सचिवपदी एस.एम.जोशी यांची निवड झाली. समितीची स्थापना करण्यात ग.त्र्यं.माडखोलकर, आचार्य प्र.के.अत्रे, मधु दंडवते, प्रबोधनकार केशव ठाकरे, य.कृ.सोवनी यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली. याबरोबरच सेनापती बापट, क्रांतिसिंह नाना पाटील, लालजी पेंडसे, अहिल्याबाई रांगणेकर यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीत मोठे योगदान दिले. आंदोलन महाराष्ट्रातील खेड्यापाड्यापर्यंत पोहचवले.



एस.एम.जोशी



प्रबोधनकार ठाकरे

ज्या वेळी मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही हे स्पष्ट झाले, त्या वेळी प्रचंड जनआंदोलन उभे राहिले. या चळवळीत राज्य शासनाने केलेल्या गोळीबारात १०६ जण हुतात्मा झाले. पुढे संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी हौतात्म्य पत्करलेल्या या १०६ सुपुत्रांचे 'हुतात्मा स्मारक' मुंबईत फ्लोरा फाऊंटनजवळ उभारले.

१ नोव्हेंबर १९५६ ला द्विभाषिक मुंबई राज्य अस्तित्वात आले. त्यानंतर १९५७ साली लोकसभा,

### माहीत आहे का तुम्हांला ?



लोकशाहीर अण्णाभाऊ साठे



शाहीर अमर शेख



शाहीर द.ना.गवाणकर

**मराठी वृत्तपत्रांची आणि शाहिरांची कामगिरी :** या आंदोलनात वृत्तपत्रांची भूमिका महत्त्वाची होती. प्रबोधन, केसरी, सकाळ, नवाकाळ, नवयुग, प्रभात अशा अनेक वृत्तपत्रांनी जनजागृतीचे काम केले. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात आचार्य अत्रेंच्या 'मराठा' या वृत्तपत्राने वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी केली. बाळासाहेब ठाकरे यांनी 'मावळा' या टोपणनावाने व्यंगचित्र काढून जनआंदोलन व्यापक बनवले.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, शाहीर अमर शेख व शाहीर द.ना.गवाणकर यांनी आपल्या लेखणीतून मोठ्या प्रमाणात जनजागृती केली.

विधानसभा व मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुका झाल्या. त्यात संयुक्त महाराष्ट्र समितीला मोठे यश मिळाले. या निकालावरून मतदार द्विभाषिकांविरुद्ध आणि संयुक्त महाराष्ट्राच्या बाजूने आहेत, हे स्पष्ट झाले.

प्रतापगडावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण प्रधानमंत्री पं.जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते ३० नोव्हेंबर १९५७ रोजी होणार होते. या वेळी संयुक्त महाराष्ट्र समितीने भाई माधवराव बागल यांच्या नेतृत्वाखाली प्रचंड मोर्चा काढला. एस.एम.जोशी, ना.ग.गोरे, जयंतराव टिळक, प्र.के.अत्रे, उद्धवराव पाटील इत्यादी नेते उपस्थित होते. समितीने पसरणी घाट व पोलादपूरजवळ तीव्र निदर्शने केली. मराठी भाषिकांच्या भावनांची आणि एकूण परिस्थितीची जाणीव पं.नेहरूंना करून देण्यात



उद्धवराव पाटील

समिती यशस्वी झाली.

संयुक्त महाराष्ट्र समितीच्या नेतृत्वाखालील आंदोलनामुळे केंद्र सरकार महाराष्ट्र निर्मितीस अनुकूल झाले. या प्रसंगी काँग्रेसच्या अध्यक्ष इंदिरा गांधी यांनी आपले वजन संयुक्त महाराष्ट्राच्या पारड्यात टाकले. महाराष्ट्र व गुजरात या दोन भाषिक प्रांतांच्या रचनेस केंद्र सरकारने अनुमती दिली. एप्रिल १९६० मध्ये संसदेने मुंबई पुनर्रचना कायदा मंजूर केला. या कायद्यानुसार १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती केली.

१ मे १९६० रोजी पहाटे राजभवनात झालेल्या विशेष समारंभात पंडित नेहरूंनी कामगार दिनाला महाराष्ट्र राज्याची अधिकृत घोषणा केली. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांनी जबाबदारी स्वीकारली.



यशवंतराव चव्हाण

## स्वाध्याय

**१. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

(१) १ मे १९६० रोजी .......... राज्याची निर्मिती झाली.

(अ) गोवा (ब) कर्नाटक
(क) आंध्रप्रदेश (ड) महाराष्ट्र

(२) मुंबई महापालिकेत मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा ठराव ......... यांनी मांडला.

(अ) ग.त्र्यं.माडखोलकर (ब) आचार्य अत्रे
(क) द.वा.पोतदार (ड) शंकरराव देव

(३) महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून ......... यांनी जबाबदारी स्वीकारली.

(अ) यशवंतराव चव्हाण (ब) पृथ्वीराज चव्हाण
(क) शंकरराव चव्हाण (ड) विलासराव देशमुख

**२. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

(१) संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना करण्यात आली.

(२) संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात वृत्तपत्रांची भूमिका महत्त्वाची होती.

**३. टीपा लिहा.**

(१) संयुक्त महाराष्ट्र परिषद

(२) संयुक्त महाराष्ट्र समितीचे योगदान

**४. पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.**

सचिव ..............................
अध्यक्ष ..............................
उपाध्यक्ष ..............................
संयुक्त महाराष्ट्र समिती

**उपक्रम**

महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिलेल्या व्यक्तींची माहिती मिळवा व त्यावर आधारित प्रकल्प शिक्षकांच्या साहाय्याने तयार करा.

97G956

# नागरिकशास्त्र

## (संसदीय शासनपद्धती)

### अनुक्रमणिका


| क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | संसदीय शासन पद्धतीची ओळख ............ | ६८ |
| २. | भारताची संसद ................................ | ७१ |
| ३. | केंद्रीय कार्यकारी मंडळ ........................ | ७५ |
| ४. | भारतातील न्यायव्यवस्था ...................... | ७९ |
| ५. | राज्यशासन ..................................... | ८३ |
| ६. | नोकरशाही ...................................... | ८६ |

# अध्ययन निष्पत्ती

| सुचवलेली शैक्षणिक प्रक्रिया | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|
| **वैयक्तिकरीत्या / अध्ययनार्थ्यास जोडीने / गटामध्ये अध्ययनाच्या संधी देणे व त्यास पुढील गोष्टींसाठी प्रवृत्त करणे.**<br>• संविधान, संसद, न्यायसंस्था, सीमांतीकरण किंवा समासीकरण (marginalization) यांसारख्या संकल्पनांवरील चर्चांत सहभागी होणे.<br>• भारतीय संविधानाचे महत्त्व, प्रास्ताविका, संसदीय शासनपद्धती, सत्तेचे विभाजन, संघराज्यवाद यांवर रेखाचित्र व चित्रांसह भित्तिपत्रके बनवणे आणि लेखी/तोंडी सादरीकरण करणे.<br>• वर्गात/शाळेत/घरात/समाजात स्वातंत्र्य, समता व बंधुता ही तत्त्वे कशी आचरली जातात यावर वादविवाद करणे.<br>• राज्याच्या/केंद्रशासित प्रदेशाच्या लोकसभा मतदारसंघाच्या नकाशाचे निरीक्षण करणे.<br>• बालसंसद व अभिरूप आचारसंहितेसह अभिरूप निवडणुकांचे आयोजन करणे.<br>• आपल्या परिसरातील/शेजारील नोंदणीकृत मतदारांची यादी तयार करणे.<br>• आपल्या परिसरात मतदानाचे महत्त्व यावर जागृती अभियानाचे आयोजन करणे.<br>• आपल्या मतदारसंघातील लोकप्रतिनिधींनी हाती घेतलेल्या सार्वजनिक कामांविषयी जाणून घेणे.<br>• प्राथमिक माहिती अहवाल (FIR) मधील आशयाची तपासणी करणे.<br>• दावेदारांना न्याय मिळण्यातील न्यायाधीशांची भूमिका यावर विस्तृत व चिकित्सक लेखनाच्या माध्यमातून स्वमत अभिव्यक्तीची संधी देणे.<br>• विशेषतः स्त्रिया, अनुसूचित जाती व जमाती, भटके व विमुक्त, धार्मिक व भाषिक अल्पसंख्याक, दिव्यांग, विशेष गरजा असणारी बालके, इतर वंचित गट यांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन, संरक्षण व प्रचार, यांवर गटचर्चेचे आयोजन करणे.<br>• बालकामगार, बालहक्क व भारतातील फौजदारी न्यायव्यवस्था यांवरील भूमिकापालन.<br>• सार्वजनिक सुविधा व पाण्याची, आरोग्य सोईची, विजेच्या उपलब्धतेत असणारी विषमता यांवर सहाध्यायींबरोबर अनुभवांचे आदान-प्रदान करण्याची संधी देणे.<br>• सार्वजनिक सुविधा पुरवण्यास शासन कसे जबाबदार आहे, यावर वादविवादाचे आयोजन करणे. | **अध्ययनार्थी**<br>• भारताच्या संविधानाच्या संदर्भात आपल्या प्रदेशातील सामाजिक आणि राजकीय समस्यांचा अन्वयार्थ लावतात.<br>• घटक राज्यशासन व केंद्रशासन यांत फरक करतात.<br>• लोकसभेच्या निवडणूक प्रक्रियेचे वर्णन करतात.<br>• राज्य/केंद्रशासित प्रदेशांच्या लोकसभेच्या मतदारसंघ नकाशात स्वतःच्या मतदार संघाचे स्थान निश्चित करून स्थानिक लोकप्रतिनिधींची नावे लिहितात.<br>• कायद्याच्या निर्मितीच्या प्रक्रियेचे वर्णन करतात. (उदा., घरगुती हिंसाचारापासून संरक्षण देणारा कायदा, माहितीच्या अधिकाराचा कायदा, शिक्षणाच्या हक्काचा कायदा, इत्यादी)<br>• काही महत्त्वाचे न्यायालयीन निर्णय सांगून त्याआधारे भारतातील न्यायालयीन व्यवस्थेचे कार्य स्पष्ट करतात.<br>• ‘प्रथम माहिती अहवाल’ कसा दाखल करावा याचे प्रात्यक्षिक दाखवतात.<br>• आपल्या प्रदेशातील दुर्बल समाजघटकांना परिघाबाहेर का राहावे लागते त्या कारणांचे व परिणामांचे विश्लेषण करतात.<br>• पाणी, सार्वजनिक स्वच्छता, रस्ते, वीज इत्यादी सार्वजनिक सुविधा पुरवण्यातील शासनाची भूमिका ओळखतात व या सेवांच्या उपलब्धतेची दखल घेतात.<br>• महाराष्ट्रातील शासनयंत्रणेचे स्वरूप स्पष्ट करतात. |

# १. संसदीय शासन पद्धतीची ओळख

भारताच्या संविधानात कशा प्रकारची शासनयंत्रणा अथवा शासनपद्धती नमूद केली आहे याचा अभ्यास आपण या पाठात करणार आहोत.

**हे प्रश्न तुम्हांलाही पडले आहेत का ?**

- संसदीय शासन पद्धती म्हणजे काय ?
- भारताचे प्रधानमंत्री आहेत पण अमेरिकेचे प्रधानमंत्री का नाहीत ?
- संसदीय शासन पद्धती आणि अध्यक्षीय शासनपद्धती यांत काय फरक आहे ?

वर उल्लेखलेल्या काही प्रश्नांमधून आपल्या असे लक्षात येईल की प्रत्येक देशातील शासनपद्धतीचे स्वरूप वेगवेगळे असते. विविध प्रकारच्या शासनपद्धतींचे स्वरूप समजावून घेण्यापूर्वी आपण शासनसंस्थेच्या प्रमुख शाखांची थोडक्यात माहिती घेऊ.

यातील कायदेमंडळ कायद्यांच्या निर्मितीचे कार्य करते. कार्यकारी मंडळ त्या कायद्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करते. न्यायमंडळ न्याय देण्याचे कार्य करते. या तीनही शाखांची कार्ये, त्यांचे अधिकारक्षेत्र व त्यांच्यावरील मर्यादा, तीनही शाखांचे परस्परांमधील संबंध संविधान ठरवते. हे संबंध कशा प्रकारचे असतात यावरून शासनसंस्थेचे स्वरूप ठरते.

शासनपद्धतीचे प्रमुख दोन प्रकार यावरून निर्माण झालेले दिसतात. (१) संसदीय शासनपद्धती (२) अध्यक्षीय शासनपद्धती.

## संसदीय शासनपद्धती

संसदीय शासनपद्धती ही प्रामुख्याने इंग्लंडमध्ये विकसित झाली. इंग्लंडमध्ये अलिखित संविधान असून आजही तेथील बराचसा राज्यकारभार रूढ संकेतांच्या आधारे चालतो. 'पार्लमेंट' ही अशीच तेथे उत्क्रांत झालेली संस्था आहे. पार्लमेंटवर आधारित पार्लमेंटरी (Parliamentary) शासनपद्धती हे इंग्लंडचे योगदान मानले जाते. भारतात ही शासनपद्धती संसदीय शासनपद्धती म्हणून आपण स्वीकारलेली आहे. अर्थात इंग्लंडमधील पार्लमेंटरी शासनपद्धती व भारतातील संसदीय शासनपद्धतीत व्यापक अर्थाने साम्य दिसते. परंतु संस्थात्मक आशयाच्या दृष्टीने भारतीय शासन पद्धती वेगळी आहे.

भारतीय संसदीय शासन पद्धतीची पुढील वैशिष्ट्ये समजावून घेऊ.

- संसदीय शासनपद्धती ही राज्यकारभाराची एक पद्धत आहे. केंद्रीय शासन यंत्रणेच्या कायदेमंडळाला संसद असे म्हटले जाते. राष्ट्रपती, लोकसभा आणि राज्यसभा मिळून संसद तयार होते.
- संसदेच्या लोकसभेतील प्रतिनिधी जनतेकडून थेटपणाने निवडले जातात. या सभागृहातील सदस्यांची संख्या निश्चित असते.
- लोकसभेच्या निवडणुका ठरावीक मुदतीनंतर होतात. या निवडणुका सर्व राजकीय पक्ष लढवतात. त्यात ज्या राजकीय पक्षाला निम्म्यापेक्षा जास्त जागा मिळतात, तो बहुमतातला पक्ष मानला जातो. बहुमत असलेला पक्ष सरकार बनवतो.
- काही वेळेस कोणत्याही एका पक्षाला असे स्पष्ट बहुमत मिळत नाही, अशावेळी काही पक्ष एकत्र येऊन आपले बहुमत सिद्ध करतात व त्यांना सरकार स्थापन करता येते. यास आघाडी सरकार असे म्हणतात.
- अशा तऱ्हेने जनतेकडून निवडून आलेले प्रतिनिधी कायदेमंडळाचे सभासद होतात व बहुमतातल्या पक्षाला आपले सरकार स्थापन करता येते.

- या बहुमतातल्या पक्षाचा नेता प्रधानमंत्री होतो व तो आपल्या काही सहकाऱ्यांची मंत्रिपदासाठी निवड करतो.
- प्रधानमंत्री व त्यांनी निवडलेले मंत्रिमंडळ हे संसदीय शासनपद्धतीतील कार्यकारी मंडळ होय. संसदीय शासनपद्धतीतल्या कार्यकारी मंडळावर दुहेरी जबाबदारी असते. (१) कार्यकारी मंडळ म्हणून त्यांना कायद्यांची अंमलबजावणी करावी लागते. (२) ते कायदेमंडळाचेही सदस्य असतात म्हणून त्यांना कायदेमंडळाशी संबंधित जबाबदाऱ्याही पार पाडाव्या लागतात.

प्रधानमंत्री व त्यांचे मंत्रिमंडळ आपल्या सर्व कृती आणि धोरणांसाठी पुन्हा कायदेमंडळालाच जबाबदार असतात. याचा अर्थ असा की, मंत्रिमंडळाला कायदेमंडळाला बरोबर घेऊन राज्यकारभार करावा लागतो. म्हणूनच संसदीय शासन पद्धतीला 'जबाबदार शासनपद्धती' म्हणतात. तसेच सामूहिक जबाबदारी हे संसदीय शासन पद्धतीचे आणखी एक खास वैशिष्ट्य आहे. एखाद्या खात्याचा निर्णय हा राज्याचा निर्णय मानला जातो. या निर्णयाची जबाबदारी संपूर्ण मंत्रिमंडळाची असते. ती प्रत्यक्षात कशी आणली जाते, हे सोदाहरण आपण पुढील दोन पाठांत पाहणार आहोत.

संसदीय शासनपद्धतीत कार्यकारी मंडळ कायदेमंडळाच्या विश्वासावर अवलबूंन असते. याचा अर्थ जोपर्यंत कायदेमंडळाचा कार्यकारी मंडळाला पाठिंबा असतो अथवा संमती असते तोपर्यंतच कार्यकारी मंडळ म्हणजेच प्रधानमंत्री व मंत्रिमंडळ अधिकारावर राहते. कायदेमंडळाला किंवा संसदेला जर असे वाटले की आपल्या इच्छेनुसार कार्यकारी मंडळ कार्य करत नाही तेव्हा संसद अविश्वासाचा ठराव मांडून कार्यकारी मंडळाला सत्तेपासून दूर करते. अविश्वासाचा ठराव हे नियंत्रणाचे एक प्रभावी साधन आहे.

संसदीय शासनपद्धतीत संसद किंवा कायदेमंडळ श्रेष्ठ असते. लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी सामान्य जनतेच्या अपेक्षा संसदेत व्यक्त करतात. लोकहितासाठी काय केले जावे हे संसद ठरवते. ते लोकांच्या प्रतिनिधींचे सभागृह असल्याने व जनतेचा सर्वश्रेष्ठ अधिकार व्यक्त करत असल्याने संसदेचा दर्जा श्रेष्ठ असतो.

### संसदीय शासनपद्धती आपण का स्वीकारली?

भारताने संसदीय शासनपद्धतीचा स्वीकार करण्यामागे काही कारणे आहेत. ब्रिटिश राजवटीच्या काळातच भारतात संसदीय संस्थांची निर्मिती झाली होती. ब्रिटिशांनी या पद्धतीने राज्यकारभार करण्यास सुरुवात केली होती. संसदीय शासनपद्धती हा सुद्धा भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचा एक आविष्कार आहे. त्यामुळे या पद्धतीचा भारतीयांना परिचय झाला होता. संविधान सभेत या पद्धतीवर बरीच चर्चाही झाली. संविधानकर्त्यांनी या पद्धतीत भारतीय परिस्थितीला अनुकूल ठरतील असे बदल केले.

संसदीय शासनपद्धतीत चर्चा, विचारविनिमयाला मोठा वाव असतो. सार्वजनिक हिताच्या प्रश्नांवर संसदेत चर्चा होते. या चर्चेत विरोधी पक्षांचे सभासदही भाग घेतात. योग्य ठिकाणी शासनाला सहकार्य करणे, धोरणातल्या किंवा कायद्यातील त्रुटी दाखवून देणे, प्रश्नांची अभ्यासपूर्ण मांडणी करणे इत्यादी बाबी विरोधी पक्ष करू शकतात. यामुळे संसदेला अधिक निर्दोष कायदे करणे शक्य होते.

### अध्यक्षीय शासनपद्धती

राज्यकारभाराची आणखी एक पद्धती म्हणून अध्यक्षीय शासनपद्धतीचा उल्लेख करता येईल. अशी शासनपद्धती अमेरिका या देशात आहे. ही पद्धती संसदीय शासनपद्धतीपेक्षा वेगळी आहे. कायदेमंडळापासून कार्यकारी मंडळ अलिप्त असलेली आणि ज्यात कार्यकारी प्रमुख (राष्ट्राध्यक्ष) थेट जनतेकडून निवडला जातो. ती पद्धत म्हणजे अध्यक्षीय शासनपद्धती होय. शासनसंस्थांच्या तीनही शाखा या पद्धतीत एकमेकांपासून स्वतंत्र असतात, परंतु त्यांच्या कार्यात एकसूत्रता येईल इतपत त्यांच्यात

संबंधही असतात. अध्यक्षीय शासनपद्धतीचा अवलंब अमेरिकेने केला आहे. या शासनपद्धतीची काही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

- अध्यक्षीय शासनपद्धतीत कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ थेटपणे परस्परांवर अवलंबून नसतात. कायदेमंडळाची दोन्ही सभागृहे तसेच राष्ट्राध्यक्ष हे जनतेकडून निवडले जातात. राष्ट्राध्यक्ष कार्यकारी प्रमुख असतात व त्यांच्या हाती कायद्यांच्या अंमलबजावणीसह अन्य अनेक अधिकार असतात.
- अध्यक्षीय शासनपद्धतीतही अशा प्रकारची रचना असली तरी कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ परस्परांवर नियंत्रण ठेवते. परस्परांवरील नियंत्रणामुळे जबाबदार पद्धतीने राज्यकारभार होऊ शकतो.

संसदीय आणि अध्यक्षीय शासनपद्धतीं व्यतिरिक्त अन्य काही शासनपद्धती फ्रान्स, स्वित्झर्लंड, जर्मनी इत्यादी देशांमध्ये अवलंबल्या जातात. विविध देश आपल्या परिस्थितीस अनुरूप अशा प्रकारच्या शासनपद्धतीचा अवलंब करताना दिसतात.

पुढील पाठात आपण भारताच्या संसदेची रचना, कार्यपद्धती व भूमिका विचारात घेणार आहोत.

## स्वाध्याय

**१. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

(१) संसदीय शासन पद्धती ......... येथे विकसित झाली.

(अ) इंग्लंड (ब) फ्रान्स
(क) अमेरिका (ड) नेपाळ

(२) अध्यक्षीय शासन पद्धतीत ......... हे कार्यकारी प्रमुख असतात.

(अ) प्रधानमंत्री (ब) लोकसभा अध्यक्ष
(क) राष्ट्राध्यक्ष (ड) राज्यपाल

**२. खालील तक्त्यातील माहिती पूर्ण करा.**

| अ. क्र. | मंडळाचे नाव | कार्ये |
|---|---|---|
| १. | कायदेमंडळ | |
| २. | कार्यकारी मंडळ | |
| ३. | न्यायमंडळ | |

**३. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

(१) भारताने संसदीय शासनपद्धतीचा स्वीकार केला.

(२) संसदीय शासनपद्धतीत चर्चा व विचारविनिमय महत्त्वाचे असते.

**४. खालील प्रश्नांची २५ ते ३० शब्दांत उत्तरे लिहा.**

(१) जबाबदार शासनपद्धती म्हणजे काय ?

(२) अध्यक्षीय शासनपद्धतीची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

**५. विरोधी पक्षांची भूमिका महत्त्वपूर्ण का असते ? याबाबत तुमचे मत लिहा.**

**उपक्रम**

दूरदर्शन या राष्ट्रीय वाहिनीवरील लोकसभेच्या व राज्यसभेच्या कामकाजाचे थेट प्रक्षेपण पाहून त्याची निरीक्षणे लिहा.

97Q56T

# २. भारताची संसद



संसद भवन, नवी दिल्ली

संसदीय शासनपद्धतीत संसद महत्वाची असते, हे आपण पाहिले. प्रस्तुत पाठात भारताच्या संसदेचा विचार करायचा आहे.

भारताच्या संसदेची निर्मिती संविधानाने केली आहे. राष्ट्रीय पातळीवरील म्हणजे केंद्रीय शासन यंत्रणेच्या कायदेमंडळाला 'संसद' असे म्हटले जाते. त्यानुसार संसदेत राष्ट्रपती, लोकसभा व राज्यसभा यांचा समावेश असतो. राष्ट्रपती भारताच्या संसदेचे अविभाज्य घटक असतात. परंतु त्यांना संसदेच्या सभागृहात उपस्थित राहून विचारविनिमयात भाग घेता येत नाही.

**शोधा पाहू ?**

घटक राज्यांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात लोकसभेतील जागा मिळतात. निवडणुकीसाठी प्रत्येक राज्याचे भौगोलिक मतदारसंघात विभाजन केले जाते. मतदारसंघाची लोकसंख्या साधारणतः सारखी असते. विविध घटकराज्यांना लोकसभेत किती जागा आहेत हे आंतरजालाच्या (इंटरनेट) माध्यमातून शोधा. उदा.,

महाराष्ट्र : ४८ जागा

गुजरात :

मध्यप्रदेश :

उत्तरप्रदेश :

गोवा :

संसदेच्या दोन सभागृहांना लोकसभा व राज्यसभा असे म्हटले जाते.

**लोकसभा :** भारतीय संसदेचे कनिष्ठ आणि प्रथम सभागृह म्हणजे लोकसभा. लोकसभा हे संसदेचे जनतेकडून थेटपणे निवडून येणारे सभागृह आहे. म्हणून लोकसभेला पहिले सभागृह असेही म्हणतात.

लोकसभेच्या निवडणुकीसाठी भौगोलिक मतदार संघ निर्माण केलेले आहेत. लोकसभेची मुदत पाच वर्षांची असते. लोकसभेच्या निवडणुका दर पाच वर्षांनी होतात. या निवडणुका सार्वत्रिक निवडणुका म्हणून ओळखल्या जातात. काही वेळेस पाच वर्षांची मुदत पूर्ण होण्याआधीच लोकसभा विसर्जित झाल्याची काही उदाहरणे आहेत. अशा वेळी घेतलेल्या निवडणुकांना मध्यावधी निवडणुका म्हणतात.

लोकसभा हे देशातील लोकांचे प्रतिनिधित्व करणारे सभागृह आहे. लोकसभेची सदस्य संख्या संविधानानुसार जास्तीत जास्त ५५२ असते. आपल्या देशातील सर्व समाजघटकांना प्रतिनिधित्व मिळावे, म्हणून अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यासाठी आरक्षण देण्यात आले आहे. तसेच अँग्लो इंडियन समाजास पुरेसे प्रतिनिधित्व नसल्यास त्या समाजाच्या दोन प्रतिनिधींची नेमणूक राष्ट्रपती लोकसभेवर करू शकतात.

**राज्यसभा :** भारतीय संसदेचे वरिष्ठ आणि द्वितीय सभागृह म्हणजे राज्यसभा. भारताच्या संसदेचे राज्यसभा हे अप्रत्यक्षरीत्या निवडून येणारे सभागृह आहे. राज्यसभा भारतीय संघराज्यातील २९



**करून पहा.**

**मेरी** : मी दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर लोकसभेची निवडणूक लढवू शकते का?

**राधिका** : नाही! तू १८ वर्षांची झालीस की तुला मतदान करता येईल, पण निवडणूक नाही लढवता येणार!

**रणवीर** : अरे, तुम्हांला माहीत आहे ना की लोकसभेची निवडणूक लढवायची असेल तर वयाची २५ वर्षे पूर्ण असावी लागतात.

**शबाना** : आपल्या शेजारच्या देशातील व्यक्तीने लोकसभेची निवडणूक लढवायची ठरवले तर?

**मुस्कान** : ते कसे शक्य आहे? ती व्यक्ती भारताची नागरिक आहे का?

**प्रणव** : समजा, मला केरळमधून निवडणूक लढवायची आहे, ते तरी शक्य आहे का?

**राधिका** : हो ! कारण आपले शिक्षक म्हणाले की लोकसभेसाठी कोणत्याही राज्याच्या मतदारसंघातून निवडणूक लढवता येते.

**मृणाल** : वय, नागरिकत्व यासंबंधीच्या अटी समजल्या. पण निवडणूक लढवण्यास अपात्र कोणाला समजायचे?

**मेरी** : पात्रतेप्रमाणेच अपात्रतेच्याही काही अटी असणारच. चला, आपण शिक्षकांकडून समजून घेऊ.

घटकराज्ये आणि ७ संघशासित प्रदेशांचे प्रतिनिधित्व करते. याचा अर्थ असा की, राज्यसभेत घटकराज्यांचे प्रतिनिधी सदस्य म्हणून काम करतात.

राज्यसभेची एकूण सदस्यसंख्या २५० आहे. यांपैकी २३८ सदस्य विविध घटकराज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातून निवडून येतात. राज्यसभेत प्रत्येक घटकराज्यांची सदस्यसंख्या सारखी नसते. लोकसंख्येच्या प्रमाणात त्यांना राज्यसभेत प्रतिनिधित्व असते. उरलेल्या १२ सदस्यांची राष्ट्रपती नेमणूक करतात. साहित्य, विज्ञान, कला, क्रीडा आणि सामाजिक कार्य इत्यादी क्षेत्रांतील कामाचा प्रत्यक्ष अनुभव असणाऱ्या किंवा त्याचे विशेष ज्ञान असणाऱ्या व्यक्तींपैकी काहींची राज्यसभेवर नेमणूक केली जाते. राज्यसभेवर सदस्यांची निवड प्रमाणशीर प्रतिनिधित्व पद्धतीने होते.

राज्यसभा कधीही एकत्रितपणे विसर्जित होत नाही, म्हणून ते कायमस्वरूपी सभागृह मानले जाते. अर्थात दर दोन वर्षांनी राज्यसभेतील सहा वर्षांचा कार्यकाल पूर्ण केलेले १/३ सदस्य निवृत्त होतात आणि पुन्हा तितक्याच सभासदांची निवड केली जाते. टप्प्याटप्प्याने मोजक्याच संख्येने सदस्य निवृत्त होत असल्याने राज्यसभा सतत कार्यरत असते. राज्यसभेची निवडणूक लढवणारी व्यक्ती भारतीय नागरिक असली पाहिजे. तिचे वय ३० वर्षे पूर्ण असले पाहिजे.

लोकसभा व राज्यसभा सदस्यांना खासदार म्हणतात. खासदार हे आपल्या मतदार संघाचे प्रश्न, समस्या लोकसभेत मांडून हे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करतात. मतदार संघाच्या विकासकामासाठी त्यांना विकासनिधी शासन देते.

**संसदेची कार्ये :** भारतीय संसदेच्या लोकसभा आणि राज्यसभा या दोन सभागृहांविषयी जाणून घेतल्यानंतर त्यांच्या कार्याचा आता आपण आढावा घेऊ.

**कायद्यांची निर्मिती :** लोकांचे हित आणि त्यांचे कल्याण साध्य व्हावे आणि संविधानातील उद्दिष्टांना प्रत्यक्षात आणता यावे म्हणून संसदेला अनेक नव्या कायद्यांची निर्मिती करावी लागते. त्याचबरोबर कालबाह्य झालेले कायदे रद्द करावे लागतात, काही कायद्यांत योग्य ते बदल करावे लागतात. कायद्याच्या निर्मितीची प्रक्रिया संविधानानेच स्पष्ट केली आहे. त्यानुसार संसद ही आपली प्राथमिक किंवा मुख्य जबाबदारी पार पाडते.



**सांगा पाहू ?**

कायदे कालबाह्य झाले म्हणून रद्द करण्यात आलेल्या कायद्यांची काही उदाहरणे तुम्ही देऊ शकाल का ? उदा., संस्थानिकांचे तनखे.

**मंत्रिमंडळावर नियंत्रण :** प्रधानमंत्री व त्यांचे मंत्रिमंडळ संसदेतूनच निर्माण होते व संसदेचे त्यांच्यावर नियंत्रण असते. नियंत्रणाचे विविध मार्ग संसदेला उपलब्ध असतात. संसदेला डावलून मंत्रिमंडळ कारभार करणार नाही हे पाहण्याची जबाबदारी संसदेवर असते.

**संविधान दुरुस्ती :** भारताच्या संविधानात काही बदल करायचे झाल्यास संसद त्यासंदर्भात निर्णय घेते. संविधानात दुरुस्ती करायचा प्रस्ताव महत्त्वाचा असतो. त्याच्या आवश्यकतेवर संसद चर्चा करून तो प्रस्ताव स्वीकारायचा की नाही हे ठरवते. भारताच्या संविधानात दुरुस्तीच्या पुढील पद्धती आहेत. (१) भारताच्या संविधानातील काही तरतुदी संसदेच्या साध्या बहुमताने बदलल्या जातात. (२) काही तरतुदींना मात्र संसदेच्या विशेष बहुमताची (२/३) गरज असते. (३) तर काही तरतुदी संसदेचे विशेष बहुमत अधिक, निम्म्यापेक्षा अधिक घटकराज्यांच्या मान्यतेने बदलल्या जातात.

**लोकसभेचे अध्यक्ष :** लोकसभेच्या निवडणुका झाल्यानंतरच्या पहिल्या बैठकीत लोकसभेचे सदस्य आपल्यापैकी एकाची 'अध्यक्ष' म्हणून निवड करतात आणि आणखी एकाची 'उपाध्यक्ष' म्हणून निवड करतात. लोकसभेचे कामकाज लोकसभा अध्यक्षाच्या मार्गदर्शनानुसार आणि नियंत्रणाखाली चालते.

लोकसभा भारतीय जनतेचे प्रतिनिधित्व करते आणि अध्यक्ष लोकसभेचे प्रतिनिधित्व करतात. अध्यक्षपदावर निवडून आल्यानंतर अध्यक्षाने संपूर्ण सभागृहाचे कामकाज अतिशय निःपक्षपातीपणे चालवायचे असते. लोकसभेच्या सभासदांना लोकप्रतिनिधी या नात्याने काही हक्क आणि विशेषाधिकार असतात. त्यांची जपणूक अध्यक्ष करतात. सभागृहाचे कामकाज सुरळीतपणे चालवणे, सभागृहाची प्रतिष्ठा राखणे, कामकाजविषयक नियमांचा अर्थ लावून त्यानुसार ते चालवणे इत्यादी कामेही अध्यक्षांना करावी लागतात.

**राज्यसभेचे सभापती :** राज्यसभेचे संपूर्ण कामकाज सभापतींच्या नियंत्रणाखाली चालवले जाते. भारताचे उपराष्ट्रपती राज्यसभेचे पदसिद्ध सभापती असतात. राज्यसभा सभापतींनाही सभागृहात शिस्त राखणे, चर्चा घडवून आणणे, सदस्यांना बोलण्याची संधी देणे इत्यादी कार्ये करावी लागतात.

**हे समजून घ्या!**

लोकसभा व राज्यसभा या दोन्ही सभागृहांना सारखे अधिकार आहेत. पण त्याचबरोबर काही अधिकार असे आहेत की जे लोकसभेला आहेत पण राज्यसभेला नाहीत. उदाहरणार्थ, कराविषयीचे प्रस्ताव पैशांशी संबंधित असतात. पैशांसंबंधीचे प्रस्ताव 'आर्थिक' मानले जातात व असे सर्व प्रस्ताव केवळ लोकसभेत मांडले जातात व तिथेच ते मंजूर होतात. राज्यसभेला या संदर्भात फार मर्यादित अधिकार आहेत.

काही अधिकार राज्यसभेला आहेत पण लोकसभेला नाहीत. उदा., राज्यसूचीतील एखाद्या विषयावर राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीने संसदेने कायदा करावा असे वाटल्यास, तसा ठराव राज्यसभेला संमत करता येतो.

## संसद कायदे कसे तयार करते?

आपल्या देशात संसदेला कायदे करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. कायदा तयार करण्यासाठी विशिष्ट पद्धत स्वीकारण्यात येते. त्या पद्धतीला 'कायदानिर्मितीची प्रक्रिया' असे म्हणतात.

कायद्याचा कच्चा मसुदा प्रथम तयार केला जातो. या कच्च्या मसुद्याला किंवा आराखड्याला कायद्याचा प्रस्ताव किंवा विधेयक म्हटले जाते.

संसदेच्या सभागृहात सादर केली जाणारी विधेयके मुख्यतः दोन प्रकारची असतात. (१) अर्थ विधेयक (२) सर्वसाधारण विधेयक.

विधेयकाचे कायद्यात रूपांतर होण्यासाठी ते पुढील प्रक्रियेमधून जाते.

**पहिले वाचन :** संबंधित खात्याचा मंत्री किंवा संसद सदस्य विधेयक सादर करतो व विधेयक

मांडताना त्याचे स्वरूप थोडक्यात स्पष्ट करतो. यास विधेयकाचे 'पहिले वाचन' असे म्हणतात.

**दुसरे वाचन :** दुसऱ्या वाचनाचे दोन टप्पे असतात. पहिल्या टप्प्यात विधेयकातील उद्‌दिष्टांवर चर्चा होते. सभागृहातील सदस्य विधेयकाबद्‌दल आपले मत व्यक्त करतात. विधेयकाचे समर्थक विधेयकाच्या बाजूने मत मांडतात, तर विरोधक विधेयकातील उणिवा व दोष स्पष्ट करतात. सभागृहात विधेयकावर चर्चा झाल्यानंतर गरज भासल्यास ते विधेयक सभागृहाच्या एका समितीकडे पाठवले जाते. विधेयक निर्दोष व्हावे म्हणून सूचना व दुरुस्त्या सुचवणारा अहवाल समिती सभागृहाकडे पाठवते.

त्यानंतर दुसऱ्या वाचनाच्या दुसऱ्या टप्प्यास सुरुवात होते. या टप्प्यात विधेयकावर कलमवार चर्चा होते. सदस्य दुरुस्त्या सुचवू शकतात. त्यानंतर त्यावर सभागृहात मतदान घेतले जाते.

**तिसरे वाचन :** तिसऱ्या वाचनाच्या वेळी विधेयकावर पुन्हा थोडक्यात चर्चा होते. विधेयक मंजूर करण्याच्या ठरावावर मतदान होते. विधेयकास आवश्यक बहुमताची मंजुरी मिळाली तर सभागृहाने विधेयक संमत केले असे मानले जाते.

- संसदेच्या दुसऱ्या सभागृहातही विधेयक वरील सर्व प्रक्रियांमधून जाते. दोन्ही सभागृहांनी विधेयकास मंजुरी दिल्यानंतर ते राष्ट्रपतींच्या संमतीसाठी पाठवले जाते.
- केंद्रात लोकसभा व राज्यसभा यांच्यात विधेयकाबद्‌दल मतभेद झाल्यास दोन्ही सदनांच्या संयुक्त अधिवेशनात विधेयकाचे भवितव्य ठरते.

राष्ट्रपतींच्या संमतीदर्शक स्वाक्षरीनंतर विधेयकाचे रूपांतर कायद्यात होते व कायदा तयार होतो.

**हेही जाणून घ्या.**

- दरवर्षी फेब्रुवारी महिन्यात अर्थमंत्री देशाचे अंदाजपत्रक लोकसभेत सादर करतात.
- राज्यांच्या विधिमंडळातही कायदे करताना संसदेसारखीच पद्‌धत स्वीकारली जाते. राज्य विधिमंडळाने मंजूर केलेल्या विधेयकावर राज्यपालांची संमतीदर्शक स्वाक्षरी झाली, की विधेयकाचे रूपांतर कायद्यात होते.

## स्वाध्याय

**१. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

(१) लोकसभेवर ......... पद्धतीने उमेदवार निवडून पाठवले जातात.
(अ) भौगोलिक मतदार संघ (ब) धार्मिक मतदार संघ (क) स्थानिक शासन संस्था मतदार संघ (ड) प्रमाणशीर प्रतिनिधित्व पद्‌धत

(२) भारताचे .......... हे राज्यसभेचे पदसिद्‌ध सभापती असतात.
(अ) राष्ट्रपती (ब) उपराष्ट्रपती
(क) प्रधानमंत्री (ड) सरन्यायाधीश

**२. शोधा आणि लिहा.**

(१) लोकसभा व राज्यसभेच्या सदस्यांना या नावाने संबोधतात. ............

(२) कायद्याच्या निर्मितीची जबाबदारी यांची आहे ............. .

**३. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

(१) राज्यसभा हे कायमस्वरूपी सभागृह आहे.
(२) लोकसभेला पहिले सभागृह म्हणतात.

**४. खालील प्रश्नांची २५ ते ३० शब्दांत उत्तरे लिहा.**

(१) लोकसभेचे सदस्य कसे निवडले जातात?
(२) लोकसभेच्या अध्यक्षांची कामे स्पष्ट करा.

**५. कायदानिर्मितीच्या प्रक्रियेतील टप्पे स्पष्ट करा.**

**उपक्रम**


राज्यसभेत १२ सदस्यांची नेमणूक राष्ट्रपती करतात. या सदस्यांची निवड करताना कोणते निकष असतात याची माहिती मिळवा.

97Z18G

# ३. केंद्रीय कार्यकारी मंडळ

मागील पाठात आपण केंद्रीय पातळीवरील कायदेमंडळाचा म्हणजेच संसदेची रचना आणि कार्यपद्धती समजून घेतली. या पाठात आपण केंद्रीय कार्यकारी मंडळाचा अभ्यास करणार आहोत.

**संघशासनाची रचना :** संघशासन म्हणजे केंद्रशासन. संघशासनाचे खालील घटक आहेत.




कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ या शासनसंस्थेच्या तीन शाखा असतात आणि जनतेचे हित लक्षात घेऊन जनतेच्या कल्याणासाठी ते काम करतात हे तुम्हांला माहीत आहे. संसदीय शासनपद्धतीत कार्यकारी मंडळ कायदेमंडळाचा भाग असते आणि ते कायदे मंडळाला जबाबदार असते.

**रमा :** राष्ट्रपती हे नामधारी प्रमुख आणि प्रधानमंत्री हे कार्यकारी प्रमुख आहेत. या दोन्ही पदांवरील व्यक्तींमध्ये कशा प्रकारचे संबंध असतील बरे ?

**विद्या :** मला असे वाटते, की प्रधानमंत्री राष्ट्रपतींना नियमितपणे भेटतात आणि ते कसा राज्यकारभार करत आहेत याची माहिती देतात.

होय ! हे बरोबर आहे. देशाचा राज्यकारभार आणि नवनवीन कायदे, धोरणे यांची माहिती प्रधानमंत्री राष्ट्रपतींना देत असतात. किंबहुना अशी माहिती मिळवण्याचा राष्ट्रपतींना अधिकार आहे.

या कार्यकारी मंडळात कोणाचा समावेश असतो, संविधानात त्याबाबत कोणत्या तरतुदी आहेत, कार्यकारी मंडळ लोकांच्या हितासाठी धोरणांची आखणी कशी करते इत्यादी बाबी कार्यकारी मंडळ समजून घेताना आपल्याला माहीत करून घ्यायच्या आहेत.

भारताच्या केंद्रीय कार्यकारी मंडळात राष्ट्रपती, प्रधानमंत्री आणि मंत्रिमंडळ यांचा समावेश होतो.

**राष्ट्रपती :** भारताच्या संविधानातील तरतुदीनुसार राष्ट्रपती हे सर्वोच्च राष्ट्रप्रमुख आहेत. राष्ट्रपतींचे पद अतिशय सन्मानाचे आणि प्रतिष्ठेचे असून ते भारतीय प्रजासत्ताकाचे प्रतिनिधित्व करतात. संविधानाने देशाची संपूर्ण कार्यकारी सत्ता राष्ट्रपतींना दिली आहे. देशाचा राज्यकारभार राष्ट्रपतींच्या नावाने चालतो. असे असले तरी प्रत्यक्ष व्यवहारात प्रधानमंत्री आणि मंत्रिमंडळ राज्यकारभार करते. म्हणूनच राष्ट्रपती हे नामधारी संविधानात्मक प्रमुख आहेत, तर प्रधानमंत्री हे कार्यकारी प्रमुख आहेत.

**राष्ट्रपतींची निवड :** राष्ट्रपतींची निवड भारतीय जनतेकडून अप्रत्यक्षरीत्या होते. भारतातील सर्वसामान्य मतदार राष्ट्रपतींना थेटपणे निवडून देत नाहीत, तर त्यांनी निवडलेल्या संसद सदस्यांकडून आणि विधानसभा सदस्यांकडून राष्ट्रपती निवडले जातात. संसद सदस्य आणि विधानसभा सदस्यांच्या या गटाला निर्वाचन मंडळ असे म्हणतात.

राष्ट्रपतींचा कार्यकाल पाच वर्षांचा असतो. राष्ट्रपती पदाची निवडणूक लढवणारी व्यक्ती भारतीय नागरिक असली पाहिजे. तिचे वय ३५ वर्षे पूर्ण असले पाहिजे. राष्ट्रपतीपदावर निवड झालेल्या व्यक्तीला आपले पद स्वीकारताना शपथ घ्यावी लागते. त्यानुसार संविधानाचे रक्षण करण्याची आणि संविधानानुसार राज्यकारभार होत आहे की नाही हे पाहण्याची जबाबदारी राष्ट्रपतींवर असते. प्रधानमंत्री

व मंत्रिमंडळाने दिलेल्या सल्ल्यानुसार राष्ट्रपती राज्यकारभार करतात.

संविधानाचे रक्षण करण्याची जबाबदारी राष्ट्रपतींवर असते, परंतु त्यांचे एखादे वर्तन संविधानाचा भंग करणारे ठरल्यास राष्ट्रपतींना त्यांच्या पदावरून दूर करण्याचा अधिकार संसदेला असतो. या प्रक्रियेला 'महाभियोग' प्रक्रिया असे म्हणतात. राष्ट्रपतींकडून संविधानाचा भंग झालेला असल्यास तसा आरोप कोणतेही एक सभागृह ठेवते व त्या आरोपांची चौकशी दुसरे सभागृह करते. दोन्ही सभागृहांच्या विशेष बहुमताने (२/३) ठराव संमत होणे आवश्यक असते. त्यानंतर राष्ट्रपती पदावरून दूर होतात.

**राष्ट्रपतींची कार्ये व अधिकार :** संविधानाने राष्ट्रपतींना अनेक कार्ये दिली आहेत. त्यांपैकी काही कार्ये पुढीलप्रमाणे :

(१) संसदेचे अधिवेशन बोलावणे, स्थगित करणे, संसदेला संदेश पाठवणे, लोकसभा मुदतीनंतर किंवा मुदतीपूर्वी बरखास्त करणे हे सर्व अधिकार राष्ट्रपतींना असतात.

(२) लोकसभा व राज्यसभा यांनी संमत केलेल्या विधेयकावर राष्ट्रपतींची स्वाक्षरी आवश्यक असते. त्यांच्या स्वाक्षरीशिवाय विधेयकाचे कायद्यात रूपांतर होत नाही.

(३) प्रधानमंत्र्यांची नेमणूक राष्ट्रपती करतात व त्यांनी सुचवलेल्या व्यक्तींची मंत्रिपदावर नेमणूक राष्ट्रपती करतात.

(४) सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची नेमणूक राष्ट्रपती करतात. त्याचप्रमाणे सर्व राज्यांचे राज्यपाल, मुख्य निवडणूक आयुक्त व अन्य महत्त्वाच्या पदांवरील व्यक्तींची नेमणूक राष्ट्रपती करतात.

(५) राष्ट्रपती संरक्षण दलांचे सर्वोच्च प्रमुख असतात. युद्ध व शांतता यांबाबतचे निर्णय राष्ट्रपती घेतात.

(६) राष्ट्रपतींना काही न्यायालयीन अधिकारही आहेत. उदा., एखाद्या व्यक्तीची शिक्षा कमी करणे, शिक्षेची तीव्रता कमी करणे किंवा अपवादात्मक परिस्थितीत मानवतावादी भूमिकेतून शिक्षा कमी करण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना असतो.

(७) देशात संकटकालीन परिस्थिती उद्भवल्यास राष्ट्रपतींना आणीबाणी जाहीर करण्याचे अधिकार असतात. संविधानात तीन प्रकारच्या आणीबाणी दिलेल्या आहेत. (१) राष्ट्रीय आणीबाणी (२) घटक राज्यांतील आणीबाणी किंवा राष्ट्रपती राजवट (३) आर्थिक आणीबाणी.

राष्ट्रपतींच्या अनुपस्थितीत त्यांची कामे उपराष्ट्रपती पार पाडतात. उपराष्ट्रपतींची निवड संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या सदस्यांकडून होते.



**करून पहा.**

राष्ट्रपतींना दिल्या जाणाऱ्या शपथेचा मसुदा मिळवा. शिक्षकांच्या मदतीने त्यातील आशय समजून घ्या.

**प्रधानमंत्री आणि मंत्रिमंडळ :** राष्ट्रपती संविधानात्मक प्रमुख असतात. त्यांच्या हाती नाममात्र सत्ता असते व प्रत्यक्षात प्रधानमंत्री व त्यांचे मंत्रिमंडळ राज्यकारभार चालवते हे आपणांस माहीत आहे. प्रधानमंत्री कोणती कार्ये आणि भूमिका पार पाडतात ते आपण आता पाहू.

निवडणुकीत बहुमत मिळवलेला पक्ष आपल्या नेत्याची प्रधानमंत्रीपदी निवड करायची हे ठरवतो. त्याच पक्षातील प्रधानमंत्र्यांच्या विश्वासू सहकाऱ्यांचा प्रधानमंत्र्यांच्या मंत्रिमंडळात समावेश होतो. प्रधानमंत्री व अन्य मंत्री संसदेचे सदस्य असणे आवश्यक असते. नसल्यास त्यांना सहा महिन्यांच्या आत संसदेचे सदस्यत्व मिळवावे लागते. प्रधानमंत्री व त्यांचे मंत्रिमंडळ खऱ्या अर्थाने राज्यकारभार करत असते. याचाच अर्थ राज्यकारभाराची वास्तव सत्ता प्रधानमंत्री व मंत्रिमंडळाकडे असते.

## प्रधानमंत्र्यांची कार्ये


(१) प्रधानमंत्र्यांना सर्वप्रथम आपले मंत्रिमंडळ तयार करावे लागते. प्रधानमंत्री आपल्या पक्षातील विश्वासू सहकाऱ्यांना प्राधान्य देतातच पण त्याचबरोबर प्रशासकीय अनुभव, राज्यकारभाराचे कौशल्य, कार्यक्षमता, विषयातील तज्ज्ञता यांचाही विचार मंत्री निवडताना केला जातो.

(२) मंत्रिमंडळात कोणाचा समावेश करायचा हे ठरल्यानंतर प्रधानमंत्री त्यांच्यात खात्यांचे वाटप करण्याचे काम करतात.

(३) प्रधानमंत्री मंत्रिमंडळाचे नेतृत्व करतात. मंत्रिमंडळाच्या सर्व बैठका प्रधानमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली होतात.

(४) खातेवाटप झाल्यानंतर विविध खात्यांमध्ये सुसूत्रता राखणे, खात्यांमधील परस्पर सहकार्य वाढवणे, खात्यांचा कारभार कार्यक्षमतेने होत आहे की नाही हे पाहणे, इत्यादी कामे प्रधानमंत्र्यांना पार पाडावी लागतात.

(५) आंतरराष्ट्रीय क्षेत्रात देशाची प्रतिमा उंचावण्यास जागतिक लोकमत आपल्याला अनुकूल होण्यासाठी प्रयत्न करणे, देशातील जनतेला आश्वस्त करणे, आपत्तीच्या काळात आपत्तीग्रस्तांच्या बाजूने खंबीरपणे उभे राहणे इत्यादी भूमिका प्रधानमंत्री पार पाडू शकतात.



### माहीत आहे का तुम्हांला ?

तुम्ही जम्बो मंत्रिमंडळ असा शब्द ऐकला आहे का ?

याचा अर्थ खूप मोठे मंत्रिमंडळ. आपल्या देशात मंत्रिमंडळाचा आकार मोठा ठेवण्याकडे कल होता. मंत्रिमंडळ मर्यादित आकारमानाचे असावे म्हणून संविधानात दुरुस्ती करण्यात आली. त्यानुसार मंत्रिमंडळाची संख्या लोकसभेच्या एकूण सदस्य संख्येच्या १५ टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही असे निश्चित करण्यात आले.

## मंत्रिमंडळाची कार्ये

(१) संसदीय शासनपद्धतीत मंत्रिमंडळ कायद्यांच्या निर्मितीत पुढाकार घेते. त्याचा आराखडा तयार करून त्यावर चर्चा करते आणि नंतर ते संसदेच्या सभागृहात मांडले जाते. मंत्रिमंडळ सर्व महत्त्वाच्या प्रश्नांवर चर्चा करून निर्णय घेते.

(२) शिक्षण, शेती, उद्योग, आरोग्य, परराष्ट्र व्यवहार अशा अनेक विषयांवर मंत्रिमंडळाला एक निश्चित धोरण किंवा कार्याची दिशा ठरवावी लागते. मंत्रिमंडळाने ठरवलेल्या धोरणाबाबत संसदेला विश्वासात घ्यावे लागते. त्यामुळे मंत्रिमंडळातील मंत्री आपापल्या खात्याचे धोरण संसदेत मांडून त्यावर चर्चा घडवून आणून संसदेकडून ते मंजूर करून घेण्याचा प्रयत्न करतात.

(३) मंत्रिमंडळाची मुख्य जबाबदारी धोरणांच्या अंमलबजावणीची असते. संसदेने धोरणांना किंवा कायद्याच्या प्रस्तावांना मान्यता दिली की मंत्रिमंडळ त्यांची अंमलबजावणी करते.

## संसद मंत्रिमंडळावर कसे नियंत्रण ठेवते ?

संसदीय शासनपद्धतीत संसद मंत्रिमंडळावर नियंत्रण ठेवण्याचे प्रयत्न करत असते. कायद्यांची किंवा धोरणांची निर्मिती, अंमलबजावणी व त्यानंतरच्या काळातही संसद मंत्रिमंडळावर नियंत्रण ठेवते. या नियंत्रणाचे काही मार्ग पुढीलप्रमाणे :

**(१) चर्चा आणि विचारविनिमय :** कायद्याच्या निर्मितीच्या दरम्यान संसद सदस्य चर्चा आणि विचारविनिमय करून मंत्रिमंडळाला धोरणातील अथवा कायद्यातील त्रुटी दाखवून देतात. कायदा निर्दोष होण्याच्या दृष्टीने ही चर्चा खूप महत्त्वाची असते.

**(२) प्रश्नोत्तरे :** संसदेचे अधिवेशन चालू असताना कामकाजाची सुरुवात संसद सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांनी होते. या प्रश्नांना संबंधित मंत्र्यांनी समाधानकारक उत्तरे द्यायची असतात. प्रश्नोत्तरे हा मंत्रिमंडळावर नियंत्रण ठेवण्याचा एक

अतिशय प्रभावी मार्ग आहे. शासनावर टीका करणे, विविध समस्यांवर प्रश्न मांडणे हे या दरम्यान होते. मंत्र्याच्या उत्तराने समाधान न झाल्यास वाद निर्माण होऊ शकतात. आपला निषेध व्यक्त करण्यासाठी काही वेळेस संसद सदस्य सभात्याग करतात किंवा घोषणा देत सभागृहाच्या मध्यवर्ती ठिकाणी जमा होतात.

**(३) शून्य प्रहर :** अधिवेशन काळातील दुपारी १२ चा काळ शून्य प्रहर म्हणून ओळखला जातो. या काळात सार्वजनिकदृष्ट्या कोणत्याही महत्त्वाच्या प्रश्नावर चर्चा घडवून आणता येते.

**(४) अविश्वासाचा ठराव :** मंत्रिमंडळावर नियंत्रण ठेवण्याचा हा एक अत्यंत प्रभावी मार्ग आहे. लोकसभेत जोपर्यंत बहुमत असते तोपर्यंतच सरकार कार्य करू शकते. हे बहुमत संसद सदस्यांनी काढून घेतल्यास सरकार किंवा मंत्रिमंडळ सत्तेवर राहू शकत नाही. 'आमचा मंत्रिमंडळावर विश्वास नाही' असे म्हणून संसद सदस्य अविश्वासाचा ठराव मांडू शकतात. तो बहुमताने संमत झाल्यास मंत्रिमंडळाला राजीनामा द्यावा लागतो.

**सांगा पाहू ?**

संसद सदस्यांना चर्चेत प्रभावी सहभाग घेता यावा म्हणून त्यांनी काय केले पाहिजे ?

कार्यकारी मंडळाच्या नियंत्रणाखाली मोठी नोकरशाही असते. नोकरशाहीच्या रचनेचा अभ्यास आपण सहाव्या प्रकरणात करणार आहोत.

## स्वाध्याय

**१. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करून पुन्हा लिहा.**

(१) भारतातील कार्यकारी सत्ता ......... यांच्याकडे असते.
(राष्ट्रपती, प्रधानमंत्री, सभापती)

(२) राष्ट्रपतीचा कार्यकाल ....... वर्षांचा असतो.
(तीन, चार, पाच)

(३) मंत्रिमंडळाचे नेतृत्व .......... करतात.
(पक्षप्रमुख, प्रधानमंत्री, राष्ट्रपती)

**२. ओळखा आणि लिहा.**

(१) राष्ट्रपती, प्रधानमंत्री, मंत्रिमंडळ यांचा भारताच्या ज्या मंडळात समावेश असतो त्या मंडळाचे नाव –

(२) अधिवेशन काळातील दुपारी १२ चा काळ हा या नावाने ओळखतात –


**३. पुढील संकल्पना तुमच्या शब्दांत लिहा.**

(१) महाभियोग प्रक्रिया (२) अविश्वास ठराव
(३) जम्बो मंत्रिमंडळ

**४. थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) मंत्रिमंडळाची कार्ये स्पष्ट करा.
(२) संसद मंत्रिमंडळावर कशाप्रकारे नियंत्रण ठेवते ?

**५. पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




**उपक्रम**

(१) जर तुम्ही प्रधानमंत्री झालात, तर कोणत्या कामांना प्रथम प्राधान्य द्याल, त्याची प्राधान्यक्रमानुसार यादी करून वर्गात सादरीकरण करा.

(२) भारताच्या राष्ट्रपतींची चित्रे व माहिती मिळवा.

988HA4

# ४. भारतातील न्यायव्यवस्था

कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ यांच्याबरोबरच न्यायमंडळ हा सुद्‌धा शासनसंस्थेचा एक महत्त्वाचा घटक आहे. कायद्यांची निर्मिती कायदेमंडळ करते. कार्यकारी मंडळ त्यांची अंमलबजावणी करते तर न्यायमंडळ न्याय देते. या पाठात आपण न्यायमंडळ न्यायदान कसे करते, त्यामुळे समाजातील अन्याय दूर होऊन सामाजिक स्वास्थ्य कसे प्राप्त होते याचा विचार करणार आहोत. तत्पूर्वी आपण न्यायदानाची आवश्यकता का असते हे समजून घेऊ.

व्यक्ती-व्यक्तींमध्ये मते, विचार, दृष्टिकोन, समजुती, श्रद्‌धा, संस्कृती इत्यादींबाबत भिन्नता असते. सहिष्णुता बाळगल्यास या बाबींमधून संघर्ष निर्माण होत नाहीत. परंतु मतभिन्नता टोकाची झाल्यास त्यातून संघर्ष निर्माण होतात व त्यांचे निराकरण निःपक्षपाती दृष्टीने कायद्यांच्या आधारे होण्याची गरज असते. त्यासाठी न्यायमंडळासारख्या निःस्पृह यंत्रणा आवश्यक असतात.

- व्यक्ती आणि शासनसंस्था यांच्यातही हितसंबंधांबाबत संघर्ष निर्माण होऊ शकतात. शासनाचा एखादा निर्णय अथवा कायदा लोकांना अन्यायकारक वाटू शकतो व त्या विरोधात न्यायालयात दाद मागता येते.
- संविधानातील सामाजिक न्याय व समता या उद्‌दिष्टांना प्रत्यक्ष व्यवहारात आणण्यासाठी ज्याप्रमाणे शासन प्रयत्न करते त्याचप्रमाणे न्यायमंडळही काही खटल्यांच्या निकालाच्या द्‌वारे अथवा सक्रीय भूमिका घेऊन शासनाला पाठिंबा देऊ शकते. समाजातील दुर्बल घटक, महिला, बालके, दिव्यांग आणि तृतीयपंथी (transgender) इत्यादी समाजघटकांना न्यायालय मुख्य प्रवाहात येण्यास मदत करू शकते.
- स्वातंत्र्य, समता, न्याय आणि लोकशाही यांचे फायदे सामान्य माणसाला जेव्हा मिळतात तेव्हा लोकशाहीची व्याप्ती आणि खोली वाढते. लोकशाही बळकट होण्यास ही बाब आवश्यक आहे.
- कायद्याचे अधिराज्य न्यायमंडळामुळे सुरक्षित राहते. गरीब, श्रीमंत, प्रगत-अप्रगत, स्त्री-पुरुष या सर्वांना कायदा समान रीतीने लागू पडतो हे न्यायदानातून स्पष्टपणे व्यक्त होते.
- न्यायदानाद्‌वारे नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण होते. कायद्यानुसार तंट्यांचे निराकरण होते व कोणत्याही गटाची, व्यक्तीची दडपशाही किंवा हुकूमशाही निर्माण होण्यास प्रतिबंध होतो.

**न्यायमंडळाची रचना :** भारत हे संघराज्य आहे. केंद्रशासन आणि घटकराज्यांना स्वतंत्र कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ आहे. परंतु न्यायमंडळ मात्र संपूर्ण देशासाठी एकच आहे. त्यात केंद्र व घटकराज्ये अशी स्वतंत्र विभागणी नाही. याचाच अर्थ, भारतातील न्यायव्यवस्था एकात्म स्वरूपाची आहे. या न्यायव्यवस्थेच्या सर्वोच्च पातळीवर भारताचे सर्वोच्च न्यायालय असून त्याखाली उच्च न्यायालये आहेत. उच्च न्यायालयांच्या नियंत्रणाखाली जिल्हा न्यायालये व त्यानंतर दुय्यम न्यायालये अशी रचना आहे.

**सर्वोच्च न्यायालय :** भारताचे सरन्यायाधीश सर्वोच्च न्यायालयाचे प्रमुख असतात. भारताच्या सरन्यायाधीशांची व अन्य न्यायाधीशांची नेमणूक राष्ट्रपतींकडून केली जाते. सर्वोच्च न्यायालयातील सर्वात ज्येष्ठ न्यायाधीश 'सरन्यायाधीश' या पदावर नेमले जावेत असा संकेत आहे.

न्यायदानाचे काम कोणाच्याही दबावाखाली होता कामा नये. न्यायाधीशांना निर्भयपणे न्यायदान करता यावे यासाठी न्यायमंडळ स्वतंत्र ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. त्यासाठी आपल्या संविधानाने



भारताचे सर्वोच्च न्यायालय-नवी दिल्ली

केलेल्या तरतुदी खालीलप्रमाणे आहेत.

- न्यायाधीशांच्या पात्रतेच्या अटी संविधानाने स्पष्ट केल्या आहेत. निष्णात कायदेतज्ज्ञ असलेल्या, उच्च न्यायालयात न्यायाधीश पदाचा किंवा वकिलीचा अनुभव असलेल्या व्यक्ती पात्र मानल्या जातात.
- न्यायाधीशांची नेमणूक राष्ट्रपती करतात. त्यामुळे राजकीय दबाव दूर ठेवता येतो.
- न्यायाधीशांना सेवा शाश्वती असते. क्षुल्लक कारणासाठी अथवा राजकीय हेतूने त्यांना पदावरून दूर करता येत नाही. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश वयाच्या ६५व्या वर्षी, तर उच्च न्यायालयाचे न्यायाधीश ६२व्या वर्षी सेवानिवृत्त होतात.
- न्यायाधीशांचे वेतन भारताच्या संचित निधीतून दिले जाते, त्यावर संसदेत चर्चा होत नाही.
- न्यायाधीशांच्या कृती व निर्णयांवर व्यक्तिगत टीका करता येत नाही. न्यायालयाचा अवमान करणे हा सुद्धा एक गुन्हा असून त्यासाठी शिक्षा होते. या तरतुदींमुळे अयोग्य टीकेपासून न्यायाधीशांना संरक्षण तर मिळतेच पण त्याच बरोबर न्यायमंडळाचे स्वातंत्र्यही अबाधित राहते.
- संसदेला न्यायाधीशांच्या वर्तनावर चर्चा करता येत नाही. परंतु न्यायाधीशांना या पदावरून दूर करण्याचा व त्यासाठी महाभियोग प्रक्रिया चालवण्याचा अधिकार आहे.

**न्यायालयीन सक्रियता :** न्यायालयाकडे तंटे गेल्यास न्यायालय ते सोडवते ही न्यायालयाबाबतची पारंपरिक प्रतिमा आहे. गेल्या काही दशकांपासून न्यायालयाच्या या प्रतिमेत बदल झाला असून न्यायालय सक्रीय झाले आहे. याचा अर्थ न्यायालय आता संविधानातील न्याय, समतेची उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी पुढाकार घेत आहे. समाजातील दुर्बल घटक, महिला, आदिवासी, कामगार, शेतकरी, बालके यांना कायद्याचे संरक्षण देण्याचा प्रयत्न न्यायालयाने केला आहे. त्यासाठी जनहितार्थ याचिका महत्वाच्या ठरल्या आहेत.

### सर्वोच्च न्यायालयाची कार्ये

* संघराज्याचे न्यायालय या भूमिकेतून केंद्रशासन व घटकराज्ये, घटकराज्ये व घटकराज्ये, केंद्रशासन व घटकराज्ये आणि घटकराज्ये यांच्यातील तंटे सोडवणे.
* नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे रक्षण करणे, त्यासाठी आदेश देणे.
* कनिष्ठ न्यायालयांनी दिलेल्या निर्णयांचा पुनर्विचार करणे, आपल्याही निर्णयांचा पुनर्विचार करणे.
* सार्वजनिकदृष्ट्या महत्वाच्या प्रश्नांवरील कायदेशीर बाजू समजून घेण्यासाठी राष्ट्रपतींनी सल्ला विचारल्यास तो देणे.



### सांगा पाहू ?

राष्ट्रपती एखाद्या महत्वाच्या सार्वजनिक प्रश्नावर सर्वोच्च न्यायालयाचा सल्ला का मागतात ?

**परिच्छेद वाचा आणि लिहा.**

**न्यायालयीन पुनर्विलोकन :** सर्वोच्च न्यायालयावर असणारी आणखी एक महत्त्वाची जबाबदारी म्हणजे संविधानाचे संरक्षण करणे होय. संविधान हा देशाचा मूलभूत कायदा असतो हे तुम्हांला माहीत आहे. या कायद्याचा भंग होईल अथवा त्याविरोधी असेल असे कायदे संसदेला करता येत नाहीत. कार्यकारी मंडळाचेही प्रत्येक धोरण आणि कृती संविधानाशी सुसंगत असावी लागते. संसदेचा एखादा कायदा किंवा कार्यकारी मंडळाची एखादी कृती संविधानातील तरतुदींचा भंग करणारी असल्यास तो कायदा आणि ती कृती न्यायालय बेकायदेशीर ठरवते व रद्द करते. न्यायालयाच्या या अधिकाराला न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार असे म्हणतात.

- न्यायालयाला असा अधिकार असावा का ?

**हे उदाहरण पहा.**

निवडणुकीस उभे राहणाऱ्या उमेदवारांना न्यायालयाने त्यांची मालमत्ता आणि उत्पन्न तसेच शैक्षणिक पात्रता यांविषयीची माहिती शपथपत्राद्वारे देण्यास सांगितले होते. उमेदवारांबाबत अचूक माहितीच्या आधारे मतदारांना मतदान करता येईल हा त्यामागील हेतू होता. आपली निवडणूक प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्याचा हा प्रयत्न नाही का ?

या संदर्भातील न्यायालयाचे आणखी काही आदेश आहेत का ? याबाबत माहिती जाणून घ्या.

जनहितार्थ याचिका म्हणजे सार्वजनिक प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्नशील असलेले नागरिक, सामाजिक संघटना किंवा बिगर शासकीय संघटना यांनी संपूर्ण जनतेच्या वतीने न्यायालयात दाखल झालेली याचिका. न्यायालय त्यावर विचार करून निर्णय देते.

**उच्च न्यायालय :** भारताच्या संविधानातील प्रत्येक घटकराज्यासाठी एक उच्च न्यायालय स्थापन करण्याचा अधिकार संसदेला देण्यात आला आहे. सध्या आपल्या देशात २४ उच्च न्यायालये आहेत.

उच्च न्यायालयात एक मुख्य न्यायाधीश आणि अन्य काही न्यायाधीश असतात.

उच्च न्यायालयातील सर्व न्यायाधीशांच्या नेमणुका राष्ट्रपती करतात.



**करून पहा.**

मुंबई उच्च न्यायालय हे महाराष्ट्र व गोवा ही दोन राज्ये व दादरा नगर हवेली व दीव-दमण हे केंद्रशासित प्रदेशांसाठी आहे. एकापेक्षा अधिक राज्यांसाठी असणाऱ्या उच्च न्यायालयांची आणखी दोन उदाहरणे शोधा.

**उच्च न्यायालयाची कार्ये**

- आपल्या अधिकारक्षेत्रातील दुय्यम न्यायालयांवर नियंत्रण ठेवण्याचा व देखरेखीचा अधिकार.
- मूलभूत हक्कांच्या रक्षणासाठी आदेश देण्याचा अधिकार.
- जिल्हा न्यायालयातील न्यायाधीशांची नेमणूक करताना राज्यपाल उच्च न्यायालयाचा सल्ला घेतात.

**जिल्हा व दुय्यम न्यायालये :** ज्या न्यायसंस्थांशी लोकांचा नेहमी संबंध येतो ती जिल्हा आणि तालुका पातळीवरील न्यायालये होत. प्रत्येक जिल्हा न्यायालयात एक जिल्हा न्यायाधीश असतो.

**भारतातील कायदा पद्धतीच्या शाखा :** कायदा पद्धतीच्या प्रमुख दोन शाखा आहेत.

(१) दिवाणी कायदा (२) फौजदारी कायदा

**दिवाणी कायदा :** व्यक्तीच्या हक्कांवर गदा आणणारे तंटे या कायद्याच्या अंतर्गत येतात.

उदा., जमिनीसंबंधीचे वाद, भाडेकरार, घटस्फोट, इत्यादी. संबंधित न्यायालयापुढे याचिका दाखल केल्यानंतर न्यायालय त्यावर निर्णय देते.

**फौजदारी कायदा :** गंभीर स्वरूपाचे गुन्हे फौजदारी कायद्याच्या आधारे सोडवले जातात. उदा., चोरी, घरफोडी, हुंड्यासाठी छळ, हत्या, इत्यादी. या गुन्ह्यांबाबत प्रथम पोलिसांकडे प्रथम माहिती अहवाल (एफआयआर) दाखल केला जातो. पोलीस त्याचा तपास लावतात आणि नंतर कोर्टात खटला दाखल होतो. गुन्हा सिद्ध झाल्यास शिक्षेचे स्वरूपही गंभीर असते.

भारतातील न्यायव्यवस्थेचे देशाच्या प्रगतीत मोठे योगदान आहे. सामान्य माणसाच्या मनातही न्यायव्यवस्थेबाबत आदर असून त्यावर विश्वास आहे. व्यक्तिस्वातंत्र्याचे, संघराज्याचे, संविधानाचे संरक्षण भारतातील न्यायव्यवस्थेने केले आहे. भारतातील लोकशाही बळकट करण्यात न्यायालयाचा मोठा वाटा आहे.

## स्वाध्याय

**१. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

(१) कायद्यांची निर्मिती ......... करते.
(अ) कायदेमंडळ (ब) मंत्रिमंडळ
(क) न्यायमंडळ (ड) कार्यकारी मंडळ

(२) सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची नेमणूक ......... करतात.
(अ) प्रधानमंत्री (ब) राष्ट्रपती
(क) गृहमंत्री (ड) सरन्यायाधीश

**२. संकल्पना स्पष्ट करा.**

(१) न्यायालयीन पुनर्विलोकन
(२) जनहितार्थ याचिका


**३. टीपा लिहा.**

(१) दिवाणी व फौजदारी कायदा
(२) न्यायालयीन सक्रियता

**४. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) समाजात कायद्यांची गरज का असते ?
(२) सर्वोच्च न्यायालयाची कार्ये स्पष्ट करा.
(३) भारतात न्यायमंडळ स्वतंत्र ठेवण्यासाठी कोणत्या तरतुदी आहेत ?

**५. पुढील तक्ता पूर्ण करा.**




**उपक्रम**

(१) तुमच्या शाळेत 'अभिरूप न्यायालया'चे आयोजन करून विविध जनहितार्थ याचिकेचे प्रश्न तयार करा व अभिरूप न्यायालयात विचारा.

(२) शिक्षकांच्या मदतीने प्रथम माहिती अहवाल (FIR) कसा दाखल करावा याची प्रक्रिया नजीकच्या पोलीसचौकीला भेट देऊन समजून घ्या.

98HSBR

# ५. राज्यशासन

मागील पाठापर्यंत आपण संघशासनाच्या संसदेचे व कार्यकारी मंडळाचे स्वरूप समजून घेतले. भारतातील एकात्म न्यायव्यवस्थेची ओळखही करून घेतली. या पाठात आपण घटकराज्यांची अथवा राज्यशासनाची माहिती घेणार आहोत.

संघराज्य व्यवस्थेत दोन पातळ्यांवर शासन संस्था कार्यरत असतात. राष्ट्रीय पातळीवर संघशासन तर प्रादेशिक पातळीवर राज्यशासन कार्य करते. भारतात २९ घटकराज्ये असून त्यांचा कारभार तेथील राज्यशासन करते.

**पार्श्वभूमी :** भारताचा भौगोलिक विस्तार मोठा आहे आणि लोकसंख्येचे स्वरूपही बहुजिनसी आहे. भाषा, धर्म, चालीरिती व प्रादेशिक स्वरूप यांत विविधता आहे. अशा वेळी एकाच केंद्रीय ठिकाणावरून राज्यकारभार करणे सोईचे ठरणार नाही हे विचारात घेऊन संविधानाने भारतासाठी संघराज्य व्यवस्था स्वीकारली. घटकराज्यांची निर्मिती भाषेच्या आधारावर करण्याचे निश्चित झाले. त्यानुसार भाषावार प्रांतरचना झाली.


भारतातील सर्वच घटकराज्यांच्या शासन यंत्रणेचे राजकीय स्वरूप सारखेच आहे. अपवाद जम्मू आणि काश्मीरचा आहे. महाराष्ट्राच्या संदर्भात आपण घटकराज्यांमधील शासनसंस्थेचे स्वरूप समजून घेऊ.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

भारतात २९ घटकराज्ये असली तरी विधानसभांची संख्या ३१ आहे. कारण दिल्ली व पुदुच्चेरी या केंद्रशासित प्रदेशांत विधानसभा अस्तित्वात आहेत.

**राज्यशासनाचे विधिमंडळ :** केंद्रीय पातळीवरील संसदेप्रमाणे राज्यशासन पातळीवर प्रत्येक राज्याचे विधिमंडळ आहे. केवळ सातच राज्यांतील विधिमंडळ दोन सभागृहांचे आहे. त्यात महाराष्ट्राचा समावेश आहे. विधिमंडळाच्या सदस्यांना आमदार म्हणतात.

**महाराष्ट्राचे विधिमंडळ :** महाराष्ट्रात विधानसभा आणि विधान परिषद ही दोन सभागृहे आहेत.



विधान भवन, मुंबई

**विधानसभा :** महाराष्ट्र विधिमंडळाचे हे पहिले सभागृह असून याची सभासद संख्या २८८ आहे. अँग्लो इंडियन समाजास पुरेसे प्रतिनिधित्व नसेल, तर राज्यपाल त्या समाजाचा एक प्रतिनिधी विधानसभेवर नेमतात. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी काही जागा राखीव असतात. निवडणुकीसाठी संपूर्ण महाराष्ट्राचे मतदारसंघात विभाजन केले जाते. प्रत्येक मतदार संघातून एक प्रतिनिधी निवडला जातो.

विधानसभेची मुदत पाच वर्षांची असते. अपवादात्मक परिस्थितीत विधानसभेच्या मुदतपूर्व निवडणुका होऊ शकतात.

वयाची २५ वर्षे पूर्ण केलेल्या कोणत्याही भारतीय नागरिकाला त्याचे महाराष्ट्रात वास्तव्य असल्यास विधानसभेची निवडणूक लढवता येते.

**विधानसभेचे अध्यक्ष :** विधानसभेचे कामकाज अध्यक्षांच्या नियंत्रण व मार्गदर्शनाखाली चालते. निवडणुकीनंतर नव्याने अस्तित्वात आलेल्या विधानसभेचे सदस्य आपल्यापैकी एकाची अध्यक्ष व एकाची उपाध्यक्ष म्हणून निवड करतात. सभागृहाचे

कामकाज शिस्तबद्‌ध पद्‌धतीने पार पडावे यासाठी कार्यक्रमपत्रिका तयार करण्यापासून बिगर संसदीय वर्तन करणाऱ्या सदस्यांना निलंबित करण्यापर्यंतची अनेक कार्ये अध्यक्षांना करावी लागतात. अध्यक्षांच्या अनुपस्थितीत ही जबाबदारी उपाध्यक्ष पार पाडतात.

महाराष्ट्र विधिमंडळाची वर्षातून कमीत कमी तीन अधिवेशने होतात. अर्थसंकल्पाविषयीचे आणि पावसाळी अधिवेशन मुंबई येथे होते, तर हिवाळी अधिवेशन नागपूर येथे होते.

**विधान परिषद :** महाराष्ट्र विधिमंडळाचे हे दुसरे सभागृह असून ते अप्रत्यक्षरीत्या समाजातील विविध घटकांकडून निवडले जाते. महाराष्ट्र विधान परिषदेची सदस्य संख्या ७८ आहे. यांतील कला, साहित्य, विज्ञान, समाजसेवा या क्षेत्रांतील तज्ज्ञ व्यक्ती राज्यपाल नेमतात तर उरलेले प्रतिनिधी विधानसभा, स्थानिक शासनसंस्था, शिक्षक-मतदार संघ, पदवीधर मतदार संघाकडून निवडले जातात.

विधान परिषद पूर्णतः बरखास्त होत नाही. यातील ठरावीक सदस्य संख्या दर दोन वर्षांनी निवृत्त होते व तेवढ्याच जागांसाठी निवडणुका होऊन ती पदे भरली जातात. विधान परिषदेचे कामकाज विधान परिषद सभापतींच्या नियंत्रण व मार्गदर्शनाखाली चालते. सभापतींच्या अनुपस्थितीत उपसभापती ही जबाबदारी पार पाडतात.

**महाराष्ट्राचे कार्यकारी मंडळ :** महाराष्ट्राच्या कार्यकारी मंडळात राज्यपाल, मुख्यमंत्री व मंत्रिमंडळाचा समावेश होतो.

**राज्यपाल :** केंद्रीय पातळीवर राष्ट्रपती ज्याप्रमाणे नामधारी प्रमुख असतात त्याचप्रमाणे घटकराज्य पातळीवर राज्यपाल नामधारी प्रमुख असतात.

राज्यपालांची नियुक्ती राष्ट्रपतींकडून होते व त्यांची मर्जी असेतोपर्यंतच ते अधिकारावर राहू शकतात. राज्यपालांनाही कायदेविषयक काही महत्त्वाचे अधिकार आहेत. उदा., विधानसभा व विधान परिषदेने संमत केलेले विधेयक राज्यपालांच्या स्वाक्षरीनंतरच कायद्यात रूपांतरित होते. विधिमंडळाचे अधिवेशन बोलावण्याचा अधिकार राज्यपालांना असतो. विधिमंडळाचे अधिवेशन चालू नसताना एखादा कायदा करण्याची गरज निर्माण झाल्यास राज्यपाल तसा अध्यादेश काढू शकतात.

**मुख्यमंत्री व मंत्रिमंडळ :** विधानसभेत ज्या पक्षाला स्पष्ट बहुमत मिळते त्या पक्षाचा नेता मुख्यमंत्री म्हणून निवडला जातो. मुख्यमंत्री आपल्या विश्वासू सहकाऱ्यांना मंत्रिमंडळात सामील करून घेतात. मुख्यमंत्री हे प्रधानमंत्र्यांप्रमाणे कार्यकारी प्रमुख असतात. राज्याचा संपूर्ण कारभार राज्यपालांच्या नावाने चालतो. परंतु प्रत्यक्षात मात्र संपूर्ण कारभार मुख्यमंत्री करतात.

### मुख्यमंत्र्यांची कार्ये

**मंत्रिमंडळाची निर्मिती :** बहुमत सिद्‌ध झाल्यानंतर मुख्यमंत्र्यांना प्रथम आपले मंत्रिमंडळ तयार करावे लागते. हे काम आव्हानात्मक असते. कारण मंत्रिमंडळ अधिकाधिक प्रातिनिधिक होण्यासाठी सर्व प्रदेशांना, विविध सामाजिक घटकांना (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय, महिला, अल्पसंख्याक इत्यादी) सामावून घ्यावे लागते. स्पष्ट बहुमत नसल्यास काही पक्ष एकत्र येऊन सरकार स्थापन करतात. अशावेळी सर्व घटकपक्षांना मंत्रिमंडळात स्थान देण्याचे अवघड काम मुख्यमंत्री पार पाडतात.

**खातेवाटप :** मंत्रिमंडळाची निर्मिती केल्यानंतर मुख्यमंत्र्यांना निवडलेल्या मंत्र्यांना खात्यांचे वाटप करावे लागते. खातेवाटप करतानाही मंत्र्यांचा राजकीय अनुभव, प्रशासकीय कौशल्य, त्यांची लोकमताची जाण, नेतृत्व इत्यादी बाबींचा विचार करावा लागतो.

**खात्यांमध्ये समन्वय :** मुख्यमंत्री व त्यांचे मंत्रिमंडळ एकत्रितरीत्या विधानसभेला जबाबदार असल्याने कार्यक्षम कारभाराची अंतिम जबाबदारी मुख्यमंत्र्यांवर असते. खात्या-खात्यांमध्ये सहकार्य व समन्वय नसेल तर त्याचा परिणाम शासनाच्या

कामगिरीवर होतो. म्हणून मुख्यमंत्र्यांना खात्यांमधील वाद दूर करून सर्व खाती एकाच दिशेने काम करत आहेत किंवा नाहीत हे पाहावे लागते.

**राज्याचे नेतृत्व :** प्रधानमंत्री ज्याप्रमाणे देशाचे नेतृत्व करतात त्याप्रमाणे मुख्यमंत्री राज्याचे नेतृत्व करतात. आपल्या राज्यातील लोकांचे हित, त्यांच्या समस्या व अडीअडचणी लक्षात घेऊन त्यानुसार नवीन धोरणांची निर्मिती मुख्यमंत्र्यांनी करायची असते. राज्यातील जनता मुख्यमंत्र्यांकडे 'आपले प्रश्न सोडवणारी व्यक्ती' म्हणून पाहत असते. राज्याच्या प्रश्नांची दखल घेऊन त्यावर शासनाच्या वतीने उपाययोजनेचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिल्यास जनतेला दिलासा मिळतो.

महाराष्ट्र राज्य हे भारतातील एक प्रागतिक राज्य आहे. शिक्षण, उद्योग, सेवाक्षेत्र, आरोग्यसेवा आणि सामाजिक सुरक्षितता इत्यादींबाबत ते आघाडीवर आहे. दहशतवादी कारवाया आणि काही भागांतील नक्षलवादी चळवळ ही आपल्या राज्यापुढे असणारी दोन मोठी आव्हाने आहेत.

## स्वाध्याय

**१. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

(१) महाराष्ट्र विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन ......... येथे होते.
(अ) मुंबई (ब) नागपूर
(क) पुणे (ड) औरंगाबाद

(२) राज्यपालांची नियुक्ती ......... कडून होते.
(अ) मुख्यमंत्री (ब) प्रधानमंत्री
(क) राष्ट्रपती (ड) सरन्यायाधीश

(३) राज्य विधिमंडळाचे अधिवेशन बोलवण्याचा अधिकार ......... यांना असतो.
(अ) मुख्यमंत्री (ब) राज्यपाल
(क) राष्ट्रपती (ड) सभापती

**२. तक्ता पूर्ण करा.**

| अ. क्र. | सभागृहे | कार्यकाल | सदस्य संख्या | निवडणुकीचे स्वरूप | प्रमुख |
|---|---|---|---|---|---|
| १. | विधानसभा | | | | |
| २. | विधान परिषद | | | | |

**३. टीपा लिहा.**

(१) राज्यपाल (२) मुख्यमंत्र्यांची कार्ये

**४. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) विधानसभेच्या अध्यक्षांचे कार्य स्पष्ट करा.
(२) संविधानाने भारतासाठी संघराज्य व्यवस्था का स्वीकारली ?
(३) खातेवाटप करताना मुख्यमंत्र्यांना कोणत्या बाबींचा विचार करावा लागतो ?

**उपक्रम**

महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळास भेट देऊन विविध मंत्री व त्यांच्या खात्याचा कारभार याविषयी माहिती मिळवा.

98RNDE

# ६. नोकरशाही

**जिल्हाधिकाऱ्यांनी जमावबंदीचा आदेश दिला.**

महापालिका आयुक्तांनी अंदाजपत्रक मांडले.

वित्त सचिवांचा राजीनामा

**विभागीय आयुक्त महसुलाचा आढावा घेणार**

वरील चौकटीत जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त, वित्त सचिव, विभागीय आयुक्त अशा काही पदांचा उल्लेख आहे. शासनाच्या प्रशासन यंत्रणेतील हे सनदी अधिकारी असतात. त्यांची कार्ये काय असतात, असा प्रश्न तुम्हांला पडला असेलच ना ?

कार्यकारी मंडळाची भूमिका स्पष्ट करणाऱ्या प्रकरणात आपण पाहिले की प्रधानमंत्री व त्यांचे मंत्रिमंडळ नव्या कायद्याचे प्रस्ताव तयार करते, तसेच धोरणही ठरवते. शासनाची धोरणे प्रत्यक्ष कार्यवाहीत आणणारी व कार्यकारी मंडळाच्या नियंत्रणाखाली असणारी एक प्रशासकीय यंत्रणा 'नोकरशाही' म्हणून ओळखली जाते. प्रस्तुत पाठात आपण नोकरशाहीचे महत्त्व समजून घेणार आहोत.

कोणत्याही देशातील शासनसंस्थेला मूलभूत अशी दोन प्रकारची कार्ये पार पाडावी लागतात.

(१) देशाचे परकीय आक्रमणापासून व अंतर्गत सुरक्षाविषयक धोक्यापासून संरक्षण करून नागरिकांना सुरक्षित ठेवणे.

(२) नागरिकांना विविध प्रकारच्या सेवा पुरवून त्यांचे दैनंदिन जीवन अधिक सुरळीत करणे की ज्यायोगे त्यांना आपला व समाजाचा विकास साध्य करता येईल.

यांपैकी पहिल्या कामासाठी देशाची संरक्षण यंत्रणा सज्ज असते. या सेवा अंतर्गत सुरक्षिततेसाठी नागरी सेवेला मदत करतात. त्यातील सेवांना आपण 'लष्करी सेवा' म्हणतो. दुसऱ्या कामासाठी प्रशासकीय यंत्रणा उभी केली जाते. त्यास आपण 'सनदी सेवा' म्हणतो. सनदी सेवकांच्या या मोठ्या यंत्रणेला नोकरशाही असेही म्हटले जाते.

संसदीय लोकशाहीत लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी आणि मंत्री यांच्यावर प्रशासनाची जबाबदारी असते. शासनाची कामे विविध खात्यांकडून पार पाडली जातात. प्रत्येक खात्याचा एक मंत्री असतो व तो त्या खात्याचा राजकीय प्रमुख असतो. जनतेचा प्रतिनिधी या नात्याने मंत्र्याने आपल्या खात्याचा कारभार लोकहिताला प्राधान्य देऊन करायचा असतो. मंत्री त्या विषयातील तज्ज्ञ नसेलही परंतु त्याला व्यापक लोकहित काय आहे याची जाणीव असते. मंत्र्याच्या खात्याचे सचिव आवश्यक अशी तज्ज्ञता किंवा योग्य सल्ला देतात. हे सचिव सनदी सेवेतून नेमले जातात. लोकांची इच्छा आणि प्रशासकीय तज्ज्ञता यांचा समन्वय अशा प्रकारे संसदीय पद्धतीत साधला जातो.

## नोकरशाहीचे स्वरूप

- **कायमस्वरूपी यंत्रणा :** कर गोळा करणारी, पर्यावरणाचे रक्षण करणारी, कायदा व सुव्यवस्था राखणारी, आपल्याला सामाजिक सुरक्षितता देणारी ही नोकरशाही आपले काम सातत्याने करत असते. याचे कारण ती कायमस्वरूपी असते. दर निवडणुकांनंतर नवे प्रधानमंत्री व मंत्रिमंडळ सत्तेवर येऊ शकते, परंतु त्यांच्या नियंत्रणाखालील नोकरशाही बदलत नाही. तिचे अस्तित्व कायमस्वरूपी असते.

- **राजकीयदृष्ट्या तटस्थ :** नोकरशाही राजकीयदृष्ट्या तटस्थ असते. याचा अर्थ असा की कोणत्याही पक्षाचे शासन अधिकारावर येवो, त्या शासनाच्या धोरणांची अंमलबजावणी नोकरशाहीने

त्याच कार्यक्षमतेने व निष्ठेने केली पाहिजे. त्या संदर्भात सनदी सेवकांनी राजकीय भूमिका घ्यायच्या नाहीत अथवा आपल्या राजकीय मतांनुसार काम करायचे नाही. एखादा पक्ष निवडणूक हरल्यामुळे सत्तेवरून दूर होतो व दुसऱ्या पक्षाचे सरकार अधिकारावर येते. पहिल्या सरकारची काही धोरणे हे नंतरचे सरकार बदलू शकते. अशा परिस्थितीत नोकरशाहीने तटस्थ राहून आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे.

• **अनामिकता :** अनामिकता म्हणजे एखाद्या धोरणाच्या यश अथवा अपयशाला नोकरशाहीला थेटपणे जबाबदार न ठरवता त्याचे स्वरूप अनामिक ठेवणे होय. आपल्या खात्याचा कारभार कार्यक्षमतेने चालवणे ही मंत्र्यांची जबाबदारी असते. एखाद्या खात्याच्या अकार्यक्षम कारभारालाही मंत्र्यांनाच जबाबदार धरले जाते. सनदी सेवकांवर जाहीर टीका होत नाही. संसद ही खात्याच्या गैरव्यवहारांसाठी मंत्र्यांना जबाबदार धरते. या संदर्भातील उत्तरदायित्व मंत्री स्वतः घेतात व नोकरशाहीला संरक्षण देतात.

## भारतातील नोकरशाहीचे महत्त्व

भारतातील नोकरशाहीची रचना अतिशय व्यापक व गुंतागुंतीची आहे. स्वातंत्र्योत्तर काळापासून जे अनेक महत्त्वाचे बदल करण्यात आले त्यांची अंमलबजावणी या यंत्रणेने प्रभावीपणे केली आहे. आज आपल्याला जे अनेक चांगले सामाजिक बदल दिसतात त्याचे एक कारण म्हणजे भारतीय नोकरशाहीने ते धोरणांच्या अंमलबजावणीतून सामान्य नागरिकांपर्यंत आणले आहेत. नोकरशाहीमुळे राज्यव्यवस्थेला स्थैर्य लाभते. पाणीपुरवठा, सार्वजनिक स्वच्छता, वाहतूक, आरोग्य, शेती सुधारणा, प्रदूषणास प्रतिबंध अशा अनेक सेवा आपल्याला सातत्याने विनाखंड मिळत असतात. त्यामुळे समूहाच्या दैनंदिन जीवनाला स्थैर्य लाभते.

दुसरे असे की, नोकरशाही हीसुद्धा समाजपरिवर्तनाचे एक साधन आहे. स्त्रियांचे सक्षमीकरण, बालकांचे संरक्षण, दुर्बल घटकांसाठीच्या योजना इत्यादींबाबतीत शासन जे कायदे करते ते प्रत्यक्षात आणण्याचे काम नोकरशाही करते. धोरणांच्या अंमलबजावणीतून सामाजिक बदल घडून येतात.

नोकरशाहीची समाजाच्या लोकशाहीकरणाच्या प्रक्रियेतही महत्त्वाची भूमिका असते. राखीव जागांचे धोरण राबवल्याने अनेक दुर्लक्षित समाजघटक आता मुख्य प्रवाहात आले आहेत. निर्णय प्रक्रियेतील त्यांचा सहभागही वाढला आहे. त्यामुळे समाजाचे लोकशाहीकरण होण्यासाठी जसे प्रगतिशील कायदे व धोरण यांची आवश्यकता असते तशीच नोकरशाहीच्या कार्यक्षम सहभागाचीही असते.

**सनदी सेवांचे प्रकार :** भारतात सनदी सेवांचे प्रमुख तीन प्रकार आहेत.

**(१) अखिल भारतीय सेवा :** भारतीय प्रशासकीय सेवा (IAS), भारतीय पोलीस सेवा (IPS) आणि भारतीय वन सेवा (IFS) यांचा यात समावेश होतो.

**(२) केंद्रीय सेवा :** या केंद्रशासनाच्या अखत्यारीतील असतात. भारतीय विदेश सेवा (IFS), भारतीय महसूल सेवा (IRS) इत्यादींचा त्यात समावेश असतो.

**(३) राज्यसेवा :** या राज्यशासनाच्या अखत्यारीत असतात. उपजिल्हाधिकारी, गटविकास अधिकारी, तहसीलदार इत्यादी प्रशासकीय अधिकारी स्पर्धापरीक्षांमधून निवडले जातात.

गुणवत्ता व कार्यक्षमता या निकषांच्या आधारे सनदी सेवकांची निवड व्हावी म्हणून भारतीय संविधानाने लोकसेवा आयोगासारख्या स्वतंत्र यंत्रणा निर्माण केल्या आहेत. केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) अखिल भारतीय सेवा व केंद्रीय सेवांसाठी स्पर्धा परीक्षा घेऊन उमेदवार निवडते व त्यांची नेमणूक शासन करते. महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) महाराष्ट्रातील सनदी सेवांसाठी स्पर्धा

परीक्षांद्‌वारा उमेदवार निवडते व त्यांच्या नेमणुकीची शिफारस शासनाला करते.

नोकरशाही आणि सनदी सेवांमधूनही समाजातील सर्व घटकांना संधी मिळावी म्हणून अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती, महिला, इतर मागासवर्गीयांना आणि दिव्यांगांना आरक्षण देऊन सेवांमध्ये येण्याची संधी दिली आहे. सामाजिक विषमतेमुळे दुर्बल घटक सनदी सेवेतील संधींपासून वंचित राहून नयेत म्हणून ही तरतूद करण्यात आली आहे.

**मंत्री व सनदी सेवक :** मंत्री व खात्याचे सनदी सेवक किंवा सचिव, उपसचिव पदांवरील व्यक्ती, यांच्यातील संबंध कशा प्रकारचे असतात यावरही त्या-त्या खात्याची कार्यक्षमता अवलंबून असते. खात्यासंबंधी निर्णय मंत्री घेतात परंतु त्यांना निर्णय घेण्यासाठी आवश्यक ती सर्व माहिती सनदी सेवक देतात. सनदी सेवकांचे अर्थात नोकरशाहीचे माहितीवर पूर्ण नियंत्रण असते. एखाद्या योजनेसाठी किती आर्थिक तरतूद उपलब्ध आहे हे सनदी नोकरच सांगू शकतात. धोरणांच्या यशापयशाचा इतिहासही त्यांना माहीत असतो. त्यामुळे मंत्री मोठ्या प्रमाणावर सनदी सेवकांवर अवलंबून असतात. मंत्र्यांनीही सनदी सेवकांशी संवाद राखल्यास व परस्परांच्या संबंधात विश्वास, पारदर्शकता असल्यास खात्याचा कारभार कार्यक्षम रीतीने होऊ शकतो.

## स्वाध्याय

**१. पुढील विधाने चूक की बरोबर ते ओळखून चुकीची विधाने दुरुस्त करून लिहा.**

(१) संसदीय लोकशाहीत लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी आणि मंत्री यांच्यावर प्रशासनाची जबाबदारी असते.

(२) केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) महाराष्ट्रातील सनदी सेवांसाठी स्पर्धा परीक्षेद्‌वारे उमेदवार निवडतात.

**२. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

(१) सनदी सेवांमध्येही राखीव जागांचे धोरण आहे.


(२) सनदी सेवकांनी राजकीयदृष्ट्या तटस्थ असणे गरजेचे आहे.

**३. खालील प्रश्नांची २५ ते ३० शब्दांत उत्तरे लिहा.**

(१) खात्याचा कारभार कार्यक्षमतेने चालण्यामागील मंत्री व सनदी सेवकांची भूमिका स्पष्ट करा.

(२) नोकरशाहीमुळे राज्यव्यवस्थेला स्थैर्य कसे लाभते हे स्पष्ट करा.

**४. पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




**५. नोकरशाहीचे स्वरूप स्पष्ट करा.**

**उपक्रम**

तुमच्या परिसरातील सनदी सेवेत कार्यरत असणाऱ्या एखाद्या अधिकाऱ्याची मुलाखत घेण्यासाठी प्रश्नावली तयार करा व मुलाखत घ्या.

991JF2









महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

इतिहास व नागरिकशास्त्र इ.८ वी (मराठी माध्यम)

₹ ४२.००